सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, २९ मार्च २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १२० । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मोदी-ट्रम्प यांच्या संभाषणात मस्कचा सहभाग नाही

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील तणावाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात २४ मार्च रोजी दूरध्वनीवर चर्चा झाली. या चर्चेत पश्चिम आशियातील परिस्थिती, सुरक्षा आणि शांतता राखण्याच्या प्रयत्नांवर विचारांची देवाणघेवाण झाली. मात्र, चर्चेत अमेरिकी उद्योजक एलन मस्क सहभागी नव्हते, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली. यापूर्वी एका अमेरिकन वृत्तसंस्थेने या संभाषणात एलन मस्क उपस्थित होते, असा दावा केला होता. परंतु, परराष्ट्र मंत्रालयाने हा दावा फेटाळत तो दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्ट केले आहे. ■

### तुळजाभवानी मंदिर २२ तास खुले राहणार



**तुळजापूर :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेली तुळजापूरची तुळजाभवानी मंदिर आता २२ तास खुले राहणार आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेनिमित्त येथे उत्सव साजरा करण्यात येतो. यंदा हा उत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल दरम्यान साजरा होणार आहे. मंदिर प्रशासनाने भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी मंदिर २२ तास खुले ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असे मंदिर व्यवस्थापक तसेच तुळजापूरच्या तहसीलदार माया माने यांनी सांगितले. यंदा दर्शनासाठी मंदिराचे दरवाजे रोज मध्यरात्री १ वाजता उघडले जातील आणि रात्री ११ वाजता बंद केले जातील. केवळ दोन तासांच्या विश्रांतीनंतर पुन्हा दर्शन सुरू राहील. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बिडकर पायरीमार्गे दर्शन मंडपात सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

### अयोध्येतील यज्ञशाळेला आग; अनेक मंडप जळून खाक

**अयोध्या :** अयोध्येत धार्मिक कार्यक्रमादरम्यान यज्ञ सुरू असताना येथील यज्ञशाळेला आग लागली. या आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे परिसरातील अनेक मंडप जळून खाक झाले. यज्ञकुंडात अर्पण केलेल्या एका नारळाचा जोरदार स्फोट झाला आणि त्याच्या ठिणग्या बाजूच्या कापडी मंडपावर पडल्यामुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. यज्ञशाळेत विधी सुरू असताना पूर्णाहुतीच्या वेळी एका नारळाचा स्फोट झाला. या स्फोटात आगीच्या ठिणग्या छतपर्यंत उडाल्या आणि बाजूच्या मंडपावर पडल्या. उन्हामुळे आगीने काही मिनिटांतच संपूर्ण यज्ञशाळेला विळखा घातला. बाजूला असलेले अनेक तात्पुरते मंडप आणि भक्तांच्या निवासाची सोय असलेले तंबू या आगीच्या भक्ष्यस्थानी गेले. हा महायज्ञ उत्तरप्रदेशचे मंत्री दयाशंकरसिंह यांनी आयोजित केला होता. ■

# इराणचे आखाती देशांवर पुन्हा हल्ले

**सौदी अरब, कुवेत, ओमानवर क्षेपणास्त्र-ड्रोनचा मारा | हवाई, लष्करी तळ, रडार प्रणाली लक्ष्य | अमेरिकेचे २२ सैनिक जखमी**

◆ **दुबई, २८ मार्च**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरुद्ध हल्ल्याला दहा दिवसांचा विराम दिल्याचा आणि दोन्ही देशांत युद्धबंदीसाठी वाटाघाटी सुरू असल्याची माहिती दिली होती. त्यानंतरही युद्धाची तीव्रता कमी झालेली नाही. युद्धाच्या ३० व्या दिवशी इस्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानसह १४ शहरांत जोरदार हल्ले चढविले. याला प्रत्युत्तर देत इराणने आखाती देश संयुक्त अरब अमिरात अर्थात् यूएई, ओमान, कुवेत आणि कतारमधील अमेरिकेचे लष्करी तळ तसेच, विमानतळांवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्र व ड्रोनचा मारा केला. यात अमेरिकेचे २२ सैनिक जखमी झाले आहेत.



इराणने शनिवारी अबू धाबी आणि दुबईतील खलिफा इकॉनॉमिक झोनजवळ क्षेपणास्त्रांचा मारा केला, यामुळे पाच इमारतींचे नुकसान, तर सहा नागरिक जखमी झाले. दुसरीकडे ओमान येथील सलालाह बंदरावर ड्रोनचा मारा करण्यात आला, यात चार परदेशी नागरिक जखमी झाले. सौदी अरबच्या संरक्षण मंत्रालयाने इराणच्या हल्ल्याची माहिती देताना सांगितले की, राजधानी रियाधच्या सीमा भागात क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा करण्यात आला. एक बॅलेस्टिक क्षेपणास्त्र नष्ट करण्यात यश आले. हल्ल्यात पायाभूत सुविधा आणि अमेरिकन लष्करी तळाचे नुकसान झाले. कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या ड्रोन हल्ल्यात रडार प्रणालीचे नुकसान झाले. याशिवाय बहरीनमध्ये सहा ड्रोन आदळल्याने निवासी इमारती आणि पाच सरकारी प्रकल्पांना आग लागली.? ◂(वृत्तसंस्था)



### अबू धाबीत पाच भारतीय नागरिक जखमी

संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबू धाबीमध्ये शनिवारी इराणने डागलेले एका क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्यात आले. क्षेपणास्त्राचे अवशेष एका परिसरात कोसळल्याने यात पाच भारतीय नागरिक जखमी झाले आणि दोन ठिकाणी आग लागली. ही घटना खलिफा इकॉनॉमिक जवळ घडली. दुसरीकडे इस्रायलने दक्षिण लेबनॉनमधील दहशतवादी हिजबुल्लाच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत हल्ल्याची तीव्रता वाढवली. शनिवारी झालेल्या हल्ल्यात सात नागरिकांचा मृत्यू झाल्याचे लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे. ■

### तेहरान विद्यापीठ उद्ध्वस्त

इराणची राजधानी तेहरानमधील इराण युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीवर अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी पहाटे संयुक्त क्षेपणास्त्राचा मारा केला. यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाल्याची माहिती इराणच्या सरकारी प्रवक्त्याने दिली. याशिवाय तेहरानमधील अनेक ठिकाणी स्फोट झाले, यात ४५ नागरिक जखमी आहे. इराणने प्रत्युत्तर देत इस्रायलची राजधानी तेल अवीव आणि पाच शहरांवर क्लस्टर बॉम्बचा मारा केला. दक्षिण इस्रायलमधील कुसैफा भागात २५ नागरिक जखमी झाले. ■

### २४०० निष्पाप नागरिकांचा मृत्यू : अराघची

इस्रायल-अमेरिकेच्या हल्ल्याचा निषेध करताना इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले, निवासी भागांवर सातत्याने हल्ले केले जात आहे. आतापर्यंत २४०० निष्पाप नागरिकंना प्राण गमवावा लागले. अमेरिका आणि इस्रायलला हल्ल्याचा मोठी किंमत मोजावी लागेल. त्यांनी शैक्षणिक संस्थानांही लक्ष्य केले, यात इराणच्या विद्यापीठाची इमारत उद्ध्वस्त झाली. दोन मोठ्या पोलाद कारखान्यांवर, एका वीज प्रकल्पावर आणि नागरी अणू ठिकाणांवर त्यांनी क्षेपणास्त्रांचा मारा केला. ■

# रामदास आठवलेंच्या नेतृत्वाखाली बड्या नेत्यांची एकजूट!

**रिपब्लिकन राजकारणात मोठी उलथापालथ**

◆ **मुंबई, २८ मार्च**

रिपब्लिकन राजकारणातील विखुरलेली शकले एकत्र करून पक्षाला राष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आता मोठी राजकीय खेळी खेळली आहे. मुंबईतील पत्रकार संघातील एका सोहळ्यात पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्या एका मोठ्या गटासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही दिग्गज नेत्यांनी आठवलेंच्या उपस्थितीत रिपब्लिकन पक्षात (आरपीआय) जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे आंबेडकरी चळवळीत मोठी खळबळ उडाली असून, आठवलेंनी दिलेली एकजुटीची हाक भविष्यातील नव्या राजकीय समीकरणांची नांदी मानली जात आहे.

प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पक्षाला मोठा धक्का देत मिलिंद सुर्वे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह आठवलेंच्या पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला. केवळ रिपब्लिकन गटच नव्हे, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जीवन जाधव यांनीही आपल्या समर्थकांसह आठवलेंचे नेतृत्व स्वीकारल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. यावेळी बोलताना रामदास आठवले भावुक झाले. बाबासाहेबांच्या स्वप्नातील रिपब्लिकन पक्ष साकारण्यासाठी आता सर्व छोट्या संघटनांनी आणि विचारवंतांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



या सोहळ्याला अविनाश महातेकर, गौतम सोनवणे आणि सिद्धार्थ कासारे यांसारख्या दिग्गज नेत्यांची उपस्थिती होती. या मोठ्या राजकीय 'इनकमिंग'मुळे मुंबईसह राज्यातील आंबेडकरी चळवळीला नवीन बळ मिळाले असून, विखुरलेले गट आता खरोखरच आठवलेंच्या निळ्या झेंड्याखाली एकत्र येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**लक्ष्य राष्ट्रीय पक्षाचे!**

रामदास आठवले यांनी यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या 'नॅशनल प्लॅन'चाही खुलासा केला. नागालॅण्ड आणि मणिपूरनंतर आता आणखी दोन राज्यांत मान्यता मिळताच रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळणार आहे.

भाजपा, काँग्रेस आणि आपनंतर आपला पक्ष देशातील पाचवा मोठा राष्ट्रीय पक्ष म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्या पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्ष 'गन्ना किसान' या चिन्हासह उतरला असून, काही राज्यांत स्वबळावर तर, काही ठिकाणी भाजपाला पाठिंबा देण्याची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# काँग्रेसमधून आलेले हिमंता बिस्व सरमा झाले भाजपाचे मुख्यमंत्री

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २८ मार्च**

आसामचे विद्यमान मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या नेतृत्वात भाजपा राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक लढवत आहे. बिस्व सरमा हे तसे मूळचे काँग्रेसी. पण, २०१५ मध्ये काँग्रेस सोडून त्यांनी भाजपात प्रवेश केला आणि आज ते राज्यातील भाजपाचा प्रमुख चेहरा आणि नेते झाले आहेत.

२००१ मध्ये बिस्व सरमा यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला काँग्रेस नेते म्हणून आसाममधून प्रारंभ केला. २००१ ची विधानसभा निवडणूक ते जालुकबारी विधानसभा मतदारसंघातून जिंकले. त्यानंतर २००६ आणि २०११ अशा सलग दोन विधानसभा निवडणुकीत ते काँग्रेसतर्फे या मतदारसंघातून विजयी झाले. तरुण गोगोई यांच्या मंत्रिमंडळात बिस्व सरमा यांनी कृषी, वित्त, शिक्षण आणि आरोग्य मंत्री म्हणून प्रदीर्घ काळ काम केले.



२०११ नंतर सरमा यांचे तेव्हाचे मुख्यमंत्री व काँग्रेस नेते तरुण गोगोई यांच्याशी मतभेद व्हायला सुरुवात झाली. गोगोई यांची राज्यावरची पकड सुटली आहे, काँग्रेसने तरुण आणि नव्या नेतृत्वाला संधी दिली पाहिजे, अशी भूमिका सरमा यांनी घेतली होती. पण, ती काँग्रेसच्या नेतृत्वाने मान्य केली नाही. तरुण गोगोई यांनी हटवून तरुण नेत्याला काँग्रेस संधी देत नसल्यामुळे बिस्व सरमा नाराज झाले. २०१५ मध्ये त्यांनी काँग्रेस सोडली. येथूनच राज्यात काँग्रेसची घसरण सुरू झाली. बिस्व सरमा यांच्या राजीनाम्याने फक्त आसाममधीलच नाही तर, संपूर्ण ईशान्य भारतातील राजकीय समीकरणे बदलली.

२३ ऑगस्ट २०१५ रोजी बिस्व सरमा यांनी भाजपात प्रवेश केला. २०१६ मध्ये भाजपाने त्यांना 'नॉर्थ ईस्ट डेमोक्रेटिक अलायन्स'चा (नेडा) प्रमुख बनवले. बिस्व सरमा यांच्या व्यूहरचनेमुळे ईशान्य भारतातील अनेक राज्यांत भाजपाची सरकारे स्थापन झाली.

२०१६ ची निवडणूक बिस्व सरमा यांनी जालुकबारी मतदारसंघातून लढवली आणि जिंकली. याच निवडणुकीनंतर राज्यात पहिल्यांदा भाजपाचे सरकार आले. सर्बानंद सोनोवाल मुख्यमंत्री झाले. सोनोवाल यांच्या मंत्रिमंडळात बिस्व सरमा यांचा समावेश झाला. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत बिस्व सरमा पाचव्यांदा जालुकबारी विधानसभा मतदारसंघातुन विजयी झाले. भाजपाने सोनोवाल यांना दिल्लीत केंद्रीय मंत्री बनवत मुख्यमंत्रिपदाची माळ हिमंता बिस्व सरमा यांच्या गळ्यात घातली. भाजपाचा हा निर्णय संपूर्ण ईशान्य भारतासाठी मैलाचा टप्पा ठरला. ईशान्य भारतातील राजकारणात बिस्व सरमा यांचा दबदबा वाढला. बिस्व सरमा भाजपासाठी राजकीय ॲसेट ठरले. ■

# मौलाना अर्शद मदानी यांच्या विधानाने काँग्रेसची गोची





◆ **नवी दिल्ली, २८ मार्च**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्याबाबत जमियत-उलेमा-ए-हिंदचे प्रमुख मौलाना अर्शद मदानी यांच्या विधानाने काँग्रेसची विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला बारा दिवसांचा अवधी उरला असताना मोठी गोची झाली आहे.

बिस्व सरमा यांची मानसिकता रा. स्व. संघाची असल्यामुळे त्यांना काँग्रेसची उमेदवारी देऊ नये, अशी विनंती आपण सोनिया गांधी यांना पत्र पाठवून केली होती, असा दावा अर्शद मदानी यांनी केला होता. या आरोपामुळे आपण बिस्व सरमा यांना अडचणीत आणत आहे, असा मदानी यांचा समज होता. पण, आपल्या या दाव्याने त्यांनी काँग्रेसला अडचणीत आणले तर, बिस्व सरमा यांचा राजकीय फायदा करून दिला आहे. या आरोपाने बिस्व सरमा यांचे भाजपातील



राजकीय वजन आणखी वाढले. बिस्व सरमा आतापर्यंत जी राजकीय भूमिका घेत आले, त्याला अप्रत्यक्षपणे बळ मिळाले.

मुल्ला मौलवींच्या शिफारसींवर काँग्रेसमध्ये उमेदवारीचे वाटत केले जात होते, असा आरोप करण्याची आयती संधी या आरोपामुळे भाजपाला मिळाली आणि मुस्लिम तुष्टीकरणाच्या ज्या आरोपापासून काँग्रेस स्वतःची सुटका करून घेण्याच्या प्रयत्नात होती, त्या आरोपावर मदानी यांनी एकप्रकारे शिक्कामोर्तब केले. काँग्रेसचे राजकारण मुल्ला मौलवींच्या इशाऱ्यावर आणि मुस्लिम मतांवर चालत असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे. काँग्रेसमध्ये उमेदवारी वाटप मौलवी यांच्या शिफारसीवरून केले जाते, काँग्रेसचे उमेदवार मुल्ला मौलवी निश्चित करतात, असा आरोप भाजपा आयटी सेल प्रमुख अमित मालवीय यांनी करत काँग्रेसची अडचण केली आहे.

हिमंता बिस्व सरमा यांनीही मदानी यांच्या या विधानावर जोरदार हल्ला चढवला. जमियत ही काँग्रेसची 'बी टीम' आहे, असा आरोप करत अर्शद मदानी यांना बांगला देशात हाकलण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. १९१९ मध्ये स्थापन झालेली जमियत-उलेमा-ए-हिंद ही देशातील मुस्लिमांची सर्वांत मोठी संघटना मानली जाते.

विशेष म्हणजे मी काँग्रेसच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री असताना मदानी यांनी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण (टीईटी) उमेदवारांच्या नियुक्त्या होऊ दिल्या नव्हत्या, असा आरोपही बिस्व सरमा यांनी केला. ◂(तभा वृत्तसेवा)

# भारताने श्रीलंकेला दिले ३८ हजार मेट्रिक टन इंधन

◆ **नवी दिल्ली, २८ मार्च**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे भारतासह शेजारील राष्ट्रांनाही ऊर्जा संकटाचा सामना करावा लागत आहे. श्रीलंकेचाही यात समावेश आहे. त्याने भारताकडे मदत मागितली आणि भारतानेही पुन्हा एकदा शेजारधर्म पार पाडत ३८ हजार टन इंधन पाठवले.

यात २० हजार मेट्रिक टन डिझेल आणि १८ हजार मेट्रिक टन पेट्रोलचा समावेश आहे. कोलंबोतील भारतीय उच्चायुक्ताच्या हवाल्याने ही माहिती दिली. श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांनी २४ मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संपर्क साधला होता. यानंतर शनिवारी भारताने श्रीलंकेला मदत केली. या दोन्ही नेत्यांच्या चर्चेत पश्चिम आशियातील संघर्षावर भाष्य करण्यात आले. युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी खंडित झाली असून, एकमेकांना ऊर्जा सहकार्य करण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दिसानायके यांच्या चर्चेपूर्वी परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर आणि श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिता हेराथ यांच्यात फोनवरून संवाद झाला होता. ◂(वृत्तसंस्था)

### उजव्या ऐवजी डॉक्टरांनी कापले डाव्या हाताचे बोट

**पंढरपूर :** पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात एका बालकाच्या शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणाचा गंभीर प्रकार घडला. बालकाच्या उजव्या हाताच्या बोटावर शस्त्रक्रिया करण्याचे ठरले होते. मात्र, डॉक्टरांच्या चुकीमुळे डाव्या हाताचे निरोगी बोट कापले. शाहू सुनील दंदाडे या बालकाला दोन्ही हातांना सहा-सहा बोटे होती. काही दिवसांपासून शाहूच्या उजव्या हाताच्या सहाव्या बोटामध्ये वेदना होत होत्या. पालकांनी त्याला पंढरपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. ■





**चंद्रपूर/सिंदेवाही :** क्रिकेटचा देव मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनी ताडोबा येथे भेट दिल्यानंतर शनिवारी थेट सिंदेवाही गाठले. नव्याने सुरू झालेल्या कच्चेपार येथील सफारी गेटची माहिती मिळताच त्यांनी ताडोबावरून सिंदेवाही येथे या गेटला खास भेट दिली. त्यानंतर यांनी गेटमधून जंगल सफारीचा आनंद घेतला. सचिन तेंडुलकर सध्या ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या निसर्गसौंदर्यात रमला आहे. चिमूर येथील बांबू रिसॉर्टमध्ये तीन दिवसांच्या मुक्कामी आलेल्या सचिनला शुक्रवारी सकाळी मदनापूर गेटवरून सफारी करताना व्याघ्रसम्राज्ञी 'जुनाबाई'चे तिच्या पिल्लांसह दर्शन झाले. जुनाबाईच्या प्रेमात पडलेल्या सचिनसाठी हा क्षण अत्यंत आनंददायी ठरला.

# माउली पालखीचे ८ जुलैला प्रस्थान

**आषाढी वारीचे वेळापत्रक जाहीर**

◆ **पंढरपूर, २८ मार्च**

वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या आषाढी वारीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. यंदाच्या पालखी सोहळ्याचे नियोजन पंढरपूर येथे झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले. चैत्र वारीच्या पृष्ठभूमीवर आळंदी संस्थान व प्रमुख महाराज मंडळींच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान ८ जुलैला होणार असल्याची घोषणा करण्यात आली.

वारकरी परंपरेनुसार चैत्र शुद्ध दशमीच्या दिवशी आषाढी यात्रेचे नियोजन केले जाते. त्यानुसार शनिवारी बैठक पार पडली. या बैठकीसाठी आळंदी संस्थांचे विश्वस्त तथा पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, भावार्थ देखणे, पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या विश्वस्त ॲड. माधवी निगडे, वासकर महाराज यासह शेकडो महाराज मंडळी दिंडी सोहळा प्रमुख उपस्थित होते.

यावर्षी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ८ जुलैला आळंदी येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असल्याचे निश्चित झाले आहे. विशेष म्हणजे, यंदा प्रस्थानाच्या वेळेत बदल करण्यात आला असून सायंकाळी ४ ऐवजी दुपारी ३ वाजता पालखी मार्गस्थ होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)


# पारदर्शकता, कालमर्यादा, विश्वासार्हतेच्या त्रिसूत्रीवर काम करावे

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन | उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा गौरव**

◆ **मुंबई, २८ मार्च**

राज्यातील नागरिकांना सर्व शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच माध्यमातून मिळण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करताना प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसूत्रीच्या आधारावर सर्व विभागांनी काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृह येथे १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत निवडलेली उत्कृष्ट कार्यालये व सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांचा देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह सर्व मंत्रालय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव सचिव प्रामुख्याने आभासी स्वरूपात उपस्थित होते.



देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाने एक राज्य, एक पोर्टल ही संकल्पना राबवावी. शासनाच्या अनेक वेगवेगळ्या संकेतस्थळांमुळे नागरिकांचा होणारा संभ्रम टाळण्यासाठी सर्व सेवांचे एकत्रीकरण असलेले एकच पोर्टल माहिती व तंत्रज्ञान विभागाने तयार करावे. सर्व शासकीय सुविधा नागरिकांना सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राधान्याने काम करावे.

महाआयडी प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांसाठी एक विशिष्ट महाआयडी तयार करण्यात येईल. केवळ एका आयडीच्या आधारावर सर्व शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. ज्यामुळे डेटा फिल्टर होऊन सेवांचा दुरुपयोग थांबण्यास मदत होईल. यासोबतच अनेक विभागांचे कामकाज हे बहुतेक प्रमाणात ई-ऑफीस झाले असून, ते लो पेपर वरून नो पेपरवर नेण्यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, अशा सूचनाही यावेळी फडणवीस यांनी दिल्या.

'महासारथी' मुळे सर्व शासकीय डेटा एकत्रित होण्यास मदत

या कार्यक्रमादरम्यान माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या महासारथी या संकेतस्थळाचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. फडणवीस म्हणाले, हे संकेतस्थळ म्हणजे आपली डेटा बँक आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून सर्व शासकीय डेटा एकत्रित करण्यात आला असून, त्याद्वारे एकमेकांशी संवाद साधता येईल. तसेच नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्सचेंज तयार करीत असून, ज्यामुळे डाटा ड्रिव्हन निर्णय प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार आहे.

**महा-विस्तार हे एआय ॲप्लिकेशन देशात पथदर्शक**

एआय आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे अहोरात्र अविरत सेवा देण्यासाठी जनरेटिव्ह एआय आणि चॅटबॉट्स, ब्लॉकचेन यांचा वापर वाढवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# भोंदू अशोक खरातमुळे दोन्ही राकाँत जुंपली

**एकमेकांच्या नेत्यांना सहआरोपी करण्याची मागणी**

◆ **मुंबई, २८ मार्च**

भोंदू अशोक खरातच्या कृष्णकृत्यांची झळ आता दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांना बसू लागली असून, एकमेकांच्या नेत्यांना सहआरोपी करण्याची मागणी राकाँ च्या शरद पवार गट आणि अजित पवार गटाकडून करण्यात येत आहे.

या आरोप-प्रत्यारोपांमुळे सिन्नरच्या या भोंदूचे राजकीय धागेदोरे नक्की कुठे आणि कुणापर्यंत पोहोचले आहेत, यावरून राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी रूपाली चाकणकर आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना या प्रकरणात सहआरोपी करण्याची मागणी केली आहे. केवळ राजीनामा देऊन पाप धुतले जात नाही. चाकणकर आणि तटकरे हे सतत या भोंदू खरातच्या



संपर्कात होते. विशेष म्हणजे, आमदार माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपद मिळू नये म्हणून खरातने तटकरेंकडे फिल्डिंग लावली होती का? याचा खुलासा झालाच पाहिजे, असा खळबळजनक आरोप लवांडे यांनी केला.

**आधी जयंत पाटलांना आत टाका!**

लवांडे यांच्या आरोपांना अजित पवार गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी जशास तसे उत्तर दिले आहे. दुसऱ्याचे बघायचे वाकून, ही शरद पवार गटाची जुनी प्रवृत्ती आहे, असा टोला लगावत त्यांनी थेट जयंत पाटलांचे नाव घेतले.

भोंदू खरातच्या ट्रस्टला पाणी मिळाले तेव्हा जलसंपदा मंत्री जयंत पाटील होते. त्यांचे खरातसोबतचे असंख्य फोटो आणि भेटींचे पुरावे उपलब्ध आहेत. जर कुणाला सहआरोपी करायचे असेल, तर सर्वांत आधी जयंत पाटलांना करा, अशी मागणी परांजपे यांनी केली. तसेच, विकास लवांडे हे रोहित पवारांच्या सांगण्यावरून वळवळ करत असल्याची खोचक टीकाही त्यांनी केली. ◂(तभा वृत्तसेवा)

### चौकशीचा फेऱ्यात कोण?

अशोक खरात विरोधात महायुती सरकार कठोर पावले उचलत असून, स्वतः गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यावर लक्ष ठेवून आहेत. रूपाली चाकणकर यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले असले, तरी विरोधकांनी या प्रकरणाचे भांडवल करत सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. दुसरीकडे, जुन्या काळातील कनेक्शन काढून सत्ताधाऱ्यांनी विरोधकांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात खेचले आहे. आता एसआयटीच्या तपासात नक्की कोणत्या नेत्याचे नाव अधिकृतरीत्या समोर येते आणि खरातला अभय देणारा तो राज्यातील अत्यंत मोठा नेता नेमका कोण, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे लागले आहेत आणि राकाँच्या दोन्ही गटांत यावरून कलगीतुरा रंगू लागला आहे. ■

### फुटीरतावादी नेता शब्बीर शहाला जामीन

◆ **नवी दिल्ली, २८ मार्च**


पटियाला हाऊस न्यायालयाने शनिवारी काश्मिरी फुटीरतावादी नेता शब्बीर शहाला मनी लॉंड्रिंग प्रकरणात जामीन मंजूर केला. विशेष न्यायाधीश (एनआयए) प्रशांत शर्मा यांनी एक लाख रुपयांच्या जामीनपत्रावर आणि एक लाख रुपयांच्या सुरक्षा बंधपत्रावर त्याची सुटका केली. शहा २०१९ पासून कोठडीत होता. एनआयएने २०१७ मध्ये शहावर दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणात आरोप ठेवले होते. त्यानंतर, ईडीनेही मनी लॉण्ड्रिंगचा गुन्हा दाखल केला. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी त्याला दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणात जामीन मंजूर केला होता. ईडीचा खटला हा पूर्वी दाखल केलेल्या एनआयएच्या खटल्यावर आधारित होता. ◂(वृत्तसंस्था)


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
आसमंतसह
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


आजचा सामना
मुंबई वि. कोलकाता
सायं.७ वाजता
वानखेडे मैदान, मुंबई



### विचारपुष्प



एखादा समाज केवळ त्याच्या उच्च आदर्शांनी आणि तत्त्वज्ञानानेच नव्हे, तर त्या आदर्शांच्या ठोस आणि प्रभावी अंमलबजावणीने विश्व वंद्य ठरतो. भारतमातेचे सुपुत्र म्हणून आपण असाच एक सामर्थ्यवान हिंदू समाज घडवला पाहिजे.

**प्रा. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

### महत्त्वाचे

#### जगावर आर्थिक मंदीचे सावट

**न्यू यॉर्क** : मध्यपूर्वेतील संघर्षामुळे इंधनाचे दर सातत्याने वाढत आहे आणि परिस्थिती दीर्घकाळ अशीच राहिल्यास जगावर आर्थिक मंदीचे संकट येऊ शकते. जगभरात महागाईचा दर उच्चांक गाठण्याची शक्यता जागतिक बँकेच्या अहवालातून व्यक्त करण्यात आली. भारतातील महागाई सहा ते सात टक्क्यांच्या वर जाऊ शकते. यामुळे अर्थव्यवस्थेवर दबाव वाढण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली. जागतिक बँकेने आर्थिक वर्षाचा शेवटचा अहवाल शुक्रवारी प्रसिद्ध केला. यात म्हटले की, सध्याची परिस्थिती केवळ एक तात्पुरता चढ-उतार नाही, तर जागतिक स्तरावरील एका मोठ्या बदलाचे लक्षण आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेचा विकासदर घसरण्याची शक्यता आहे.

# बंगालमधील घुसखोरीसाठी तृणमूल काँग्रेस जबाबदार

**अमित शाह यांचे ममता सरकारविरुद्ध आरोपपत्र • १४ विविध प्रकरणांतील सहभागाची दिली माहिती, • भ्रष्टाचार-गैरकारभारासाठी ठरवले जबाबदार**

**कोलकाता, २८ मार्च**

पश्चिम बंगालमधील घुसखोरीसाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष जबाबदार आहे. त्यांनी देशाची सुरक्षा धोक्यात आणत घुसखोरीला प्रोत्साहन दिले. गेल्या पंधरा वर्षांपासून बंगाल अराजकतेचे केंद्र बनले आहे. घुसखोर, गुन्हेगार आणि भ्रष्टाचारी लोकांसाठी बंगाल आश्रयस्थान बनले आहे, यामुळे राज्य विकासापासून अनेक दशके मागे गेल्याचा आरोप करीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी तृणमूल सरकारविरोधातील भाजपाचे आरोपपत्र प्रसिद्ध केले.

'अभियोजना' नावाचा दस्तऐवज सादर करीत शाह यांनी तृणमूल सरकारच्या कार्यकाळातील भ्रष्टाचार आणि गैरकारभाराशी संबंधित आरोपपत्र प्रसिद्ध करीत तृणमूल सरकारच्या १५ वर्षांतील १४ कथित प्रकरणांचा गोशवारा मांडला.

पत्रपरिषदेत शाह म्हणाले, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका केवळ राज्यासाठीच नव्हे, तर देशाच्या सुरक्षेसाठीही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ममता यांच्या १५ वर्षांच्या राजवटीत राज्य घुसखोरीचे केंद्र बनले आहे. आसाममध्ये भाजपा सरकार सत्तेवर आल्यानंतर तेथून घुसखोरीचे मार्ग बंद झाले आणि आता पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी रोखण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

राज्य सरकार सीमा सुरक्षा मजबूत करण्याच्या प्रयत्नांमध्ये अडथळा आणत आहे. केंद्र सरकारकडून अनेकदा पत्रव्यवहार करूनही ममता सरकारने सीमा कुंपणासाठी जमीन दिली नाही.



बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकार विरोधातील आरोपपत्र नागरिकांसमोर सादर करताना अमित शाह

#### भीती, दहशतीवर चालतो कारभार

**तृणमूलचे राजकारण खोटेपणा, दहशत आणि हिंसाचारावर आधारित आहे. सामान्यतः, सरकार लोककल्याणकारी कामांच्या आधारावर निवडली जातात. परंतु, तृणमूल सरकारच्या शब्दकोशात याचा उल्लेखच नाही. भीती, दहशत आणि अत्याचार यावर आधारित बंगालचा कारभार सुरू आहे. भाजपा २०११ पासून तृणमूलविरोधात लढत आहे आणि मला खात्री आहे की, यावेळी बंगालची जनता भाजपाला पूर्ण बहुमताने सत्तेत आणेल.**

#### राष्ट्रीय सुरक्षा आणली धोक्यात

**आरोपपत्रात तृणमूल काँग्रेसचा गैरकारभार, टोळीयुद्ध आणि राज्याला भ्रष्टाचाराची प्रयोगशाळा कशी बनवली याचा समावेश आहे. पश्चिम बंगाल हे एकमेव राज्य आहे जिथून घुसखोर भारतात प्रवेश करून देशभरात अशांतता निर्माण करत आहेत. तृणमूल सरकारने घुसखोरांना आश्रय देऊन राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणली आहे. स्वतःला पीडित म्हणून दाखवण्याचा ममताचा डाव पश्चिम बंगालच्या जनतेने ओळखल्याचे शाह म्हणाले.**

#### 'सोनार बांगला'चे आश्वासन हवेत

'सोनार बांगला'चे स्वप्न दाखवून ममता यांनी जनतेचे शोषण केले. विकासाच्या अभावामुळे बंगालमधील उद्योगाला घरघर लागली आहे. राज्य आता भ्रष्टाचाराची प्रयोगशाळा व गुन्हेगारी टोळ्यांचे केंद्र बनले आहे. आरोपपत्रातून राज्यातील अराजकता, अनागोंदी, आर्थिक संकट आणि विशेषतः घुसखोरीसारख्या गंभीर समस्या बंगाली जनतेच्या लक्षात आणून दिल्या जातील, असे शाह म्हणाले. राजकारणासाठी सीमावर्ती भागांच्या लोकसंख्येच्या रचनेत फेरफार करण्याची परवानगी दिल्याचा आरोप त्यांनी केला.

आगामी निवडणूक म्हणजे भीती आणि विश्वास यांच्यातील लढाई आहे.


तृणमूल सरकारने राज्याला अराजकता, अत्याचार आणि भ्रष्टाचाराच्या दलदलीत ढकलले, असा आरोप अमित शाह यांनी केला. यावेळी पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य उपस्थित होते. *(वृत्तसंस्था)*

# भारत सभ्यतावादी, आध्यात्मिकदृष्ट्या प्रेरित देश

**दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन**

**चंदीगड, २८ मार्च**

भारत केवळ एक लष्करी राष्ट्र नाही; सभ्यतेवर आधारित, सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या प्रेरित देश आहे. ही बाब जगात प्रस्थापित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. पण, या प्रयत्नांची सुरुवात आपल्या कुटुंबातून आणि समाजातून करावी लागेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.



भारतीय विचार, संस्कृती आणि समकालीन जागतिक दृष्टिकोनावर लक्ष केंद्रित करणारा एक महत्त्वाचा बौद्धिक संवाद म्हणून पंचनाद संशोधन संस्थेने शुक्रवारी चंदीगड येथील एनआयटीटीटीआर सभागृहात भारतीय कथन या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, युद्धाची कथा सुंदर असते, पण युद्ध पाहणे चांगले नाही. जो युद्ध सुरू करतो, तोच ते संपविण्याची मागणी करतो. संपूर्ण जग रामायणातून विचार आणि आचरणाची शुद्धता शिकू शकते. रामायण पुस्तकांमध्ये नाही, ते धार्मिक आचरणात आहे. ते भारताच्या संस्कृती आणि सभ्यतेत उपलब्ध आहे. एक शक्तिशाली देश असूनही, भारताने कधीही कोणत्याही देशावर आक्रमण केले नाही.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बठिंडा येथील पंजाब केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती, प्राध्यापक डॉ. जगबीर सिंग यांनी भूषवले. यावेळी पंचनादचे अध्यक्ष प्राध्यापक ब्रज किशोर कुथियाला उपस्थित होते. *(वृत्तसंस्था)*

#### दलाई लामा यांची सदिच्छा भेट

दत्तात्रेय होसबळे यांनी हिमाचल दौऱ्याच्या पहिल्या दिवशी धर्मशाळा येथे दलाई लामा यांची सदिच्छा भेट घेतली. त्यानंतर त्यांनी तिबेट सरकारच्या संसदेला भेट दिली. तेथे त्यांचा औपचारिक परिचय करून देण्यात आला. त्यानंतर त्यांनी कोतवाली बाजार येथील सामुदायिक सभागृहात देवभूमी मैत्री संघाने आयोजित केलेल्या धार्मिक परिषदेत भाग घेतला.या परिषदेत दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, बुद्ध म्हणाले, 'ईशः धर्म सनातन!' सनातनाची मुळे निसर्गात आहेत. मानवसेवा हा धर्म पवित्रता, करुणा, तपश्चर्या आणि त्यागावर आधारित आहे. आपल्या सर्वांचे ध्येय एकच आहे. सर्व थोर पुरुषांनी वेळोवेळी धर्माची स्थापना आणि रक्षण करण्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. श्री गुरू तेग बहादूर यांनी धर्माच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्याच धर्माच्या रक्षणासाठी परमपूज्य दलाई लामा जगात शांततेचा संदेश पसरवत आहेत. म्हणून, प्रत्येकाने धर्माच्या मार्गाचे अनुसरण केले पाहिजे.

# पाकिस्तान अद्याप दहशतवाद्यांचा बालेकिल्ला

**अमेरिकेच्या अहवालाने फाडला बुरखा**

**वॉशिंग्टन, २८ मार्च**

अनेक वर्षांच्या लष्करी कारवाया आणि धोरणात्मक उपाययोजनांनंतरही पाकिस्तानमधून कार्यरत अनेक दहशतवादी गट समूळ नष्ट झाले नसल्याचे अमेरिकी काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

पाकिस्तानच्या भूमीवरून कार्यरत अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या दहशतवादी संघटनांवर अंकुश ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न अपयशी ठरले आहेत. अहवालात दहशतवादी गट पाच मुख्य प्रकारांमध्ये विभागले आहेत. जागतिक स्तरावर सक्रिय, अफगाणिस्तानवर लक्ष केंद्रित करणारे, भारत आणि काश्मीरवर लक्ष केंद्रित करणारे, देशांतर्गत दहशतवाद करणारे आणि सांप्रदायिक संघटना असा त्यांचा उल्लेख आहे.

अहवाल तयार करणारी संस्था, सीआरएस ही अमेरिकी काँग्रेसची स्वतंत्र संशोधन शाखा आहे. ही शाखा काँग्रेसच्या सदस्यांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी अहवाल देते, परंतु हा अहवाल काँग्रेसची अधिकृत भूमिका दर्शवत नाहीत. पाकिस्तानातील दहशतवादी गटांपैकी १५ गटांपैकी १२ गट अमेरिकेच्या कायद्यानुसार विदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित आहे. *(वृत्तसंस्था)*







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



रोखठोक

# महाराष्ट्रातील संस्कृतिसंघर्ष

**दिनेश गुणे**

'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' प्रतिभावंत संवेदनशील समाजसुधारक साने गुरुजी यांच्या मानवतेचे अध्यात्म सांगणाऱ्या या काव्याच्या ओळी ओठावर खेळवत महाराष्ट्राच्या अनेक पिढ्या सुसंस्कारित झाल्या. महाराषष्ट्र धर्माची पताका फडकवत ठेवणाऱ्या संस्कारांची शिदोरी या शिकवणुकीने मनामनाच्या झोळीत जमा झाली. काळ कसा बदलत जातो पाहा. आता या ओळी गुणगुणताना, खरा तो हा शब्द उच्चारल्यानंतर, कोणा खराताची आठवण व्हावी आणि बदलत्या काळासोबत सुरू झालेल्या संस्कृतीच्या ऱ्हासाने मने खंतावत जावीत असे काहीसे चित्र आता दिसू लागले आहे. महाराष्ट्राच्या समाजजीवनाची काही वैशिष्ट्ये आहेत. या समाजजीवनात दोन संस्कृतींचा सुंदर मिलाफ झालेला दिसतो. यापैकी एक संस्कृती अध्यात्माची आहे, तर दुसरी संस्कृती मनोरंजनाची आहे. एकाच समाजजीवनातील या दोन संस्कृतींचे प्रवाह समंजसपणे हातात हात घालून पिढ्यापिढ्यांपासून वाहत आले, पण त्यामध्ये कधीही संघर्ष झाला नाही. ज्या अभिमानाने महाराष्ट्र अध्यात्म संस्कृतीचा उल्लेख टाळ संस्कृती असा करतो, त्याच अभिमानाने महाराष्ट्राच्या लोककलांना आश्रय देऊन त्यांचा आदर करणाऱ्या चाळ संस्कृतीचा उल्लेखही केला जातो. सकाळी, सणासुदीच्या दिवसांत आणि धार्मिक वातावरणात ज्या श्रद्धेने महाराष्ट्राच्या गावोगावीच्या मंदिरांत घुमणारे टाळ चिपळ्यांचे नाद आध्यात्मिकतेची साक्ष देतात, त्याच गावात, संध्याकाळच्या समयी एखाद्या जत्रेत रंगणाऱ्या फडात घुमणाऱ्या चाळ-घुंगरांचा नाद राज्याच्या लोकसंस्कृतीची साक्ष देतात. मात्र, हातात हात घालून एकमेकांसोबत चालणाऱ्या या दोनही संस्कृतींचा कधीही संघर्ष झाला नाही. या दोन्ही संस्कृतींनी एकमेकांचा आदर केला आणि त्या संस्कृतीच्या साधकांनी दोनही संस्कृतींची पालखी आलटून पालटून खांद्यावर वाहत पुढच्या पिढ्यांच्या हाती सोपविली. आता काळ बदलला. संस्कृतिसंगमाचा हा संस्कार संपुष्टात येत चालला असून संस्कृतिसंघर्षाचा काळ सुरू झाल्याचे चित्र महाराष्ट्राला काहीसे विषण्ण करणारे ठरू पाहत आहे. महाराष्ट्राच्या या संस्कृतिसंगमालाच, महाराष्ट्र धर्म म्हणून कौतुकाने म्हटले जात होते. आजही अनेकांच्या मुखातून महाराष्ट्र धर्माचा गजर होत असतो. महाराष्ट्र धर्म जपण्याची गरजही वारंवार व्यक्त होत असते. पण वर्तमानात जे काही पाहावयास मिळते, ते म्हणजे महाराष्ट्र धर्म नाही, याची जाणीव त्रासदायक आहे. खरा तो एकच धर्म असे म्हटल्यावर कोणा खराताच्या नवउद्योगांचे चित्र नजरेसमोर यावे, या एकाच बाबीतून ही उद्वेगजनक वस्तुस्थिती आता महाराष्ट्र अनुभवत आहे. ही स्थिती म्हणजे, एक प्रकारे महाराष्ट्रातील संस्कृतिसंघर्ष आहे. हे सांस्कृतिक परिवर्तन नव्हे, तर संस्कृतीच्या विनाशाची वाटचाल ठरणार आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेत जुन्या गोष्टी नव्या तेजाने अधिकाधिक उजळ होत असतात. असे परिवर्तन त्या गोष्टींचे गुण अधिक समृद्धही करत असतात. नव्या संस्कृतिसंघर्षात दिसणारे परिवर्तन ओंगळवाणे आहे. बदलाची ही प्रक्रिया समाजजीवनाचे संस्कार उजळणारी नव्हे, तर काळवंडून टाकणारी आहे. म्हणून, खरातसारख्या प्रकरणांबाबत समाजाने सजग असावयास हवे. महाराष्ट्र धर्मास काळिमा फासणाऱ्या अशा प्रवृत्ती ही एक सामाजिक विषवल्ली आहे. अशा विषवल्ली वेळीच ठेचून काढल्या पाहिजेत, असे मत यापूर्वी अनेकदा महाराष्ट्राच्या कायदेमंडळात उभय बाजूंनी व्यक्त केले जात होते. आजही त्याबाबत दुमत दिसत नाही. तरीही, कायदेमंडळाच्या घुमटाखालीदेखील विषवल्लींचा शिरकाव होण्याच्या भीतीचे संकेत देणाऱ्या काही घटना घडताना दिसतात, तेव्हा विषवल्ली ठेचण्याचे काम सोपे नाही, ते एक आव्हान आहे आणि ते सामूहिकरीत्या, एकत्रितपणे आणि निर्धारपूर्वकच पार पाडले पाहिजे, ही बाब अधोरेखित होते.



महाराष्ट्राच्या विधिमंडळातील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील कामकाजाच्या अखेरच्या आठवड्यावर याच संस्कृतिसंघर्षाच्या चिंतेचे सावट दाटले होते. चमत्कार, बुवाबाजीच्या नावाने समाजाला वेठीस धरणाऱ्या, महिलांच्या मानसिक किंवा अन्य कोणत्याही अपरिहार्यतेचा गैरफायदा घेत आपल्या विकृत कामना पूर्ण करून धनाच्या राशी गोळा करणाऱ्या कोणा कॅप्टन खरात नावाच्या एका भोंदूने आध्यात्मिकतेचा आव आणत समाजाच्या श्रद्धांना वेठीस धरले आणि महाराष्ट्र धर्माची परंपरा एका परीने पुरती लयास गेली. असे प्रकार याआधीही महाराष्ट्रात घडले आहेत आणि ते उघडकीस आल्यानंतर प्रत्येक वेळी महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि संस्कारांच्या इतिहासाचे पाढे वाचले गेले आहेत. अशा प्रकारांनी यावरच घाला घातल्याची चिंता व्यक्त झाली आहे आणि काळ पुढे सरकताच, त्या गोष्टी इतिहासजमा होऊन त्याच्याच पुनरावृत्तीची आठवण करून देणाऱ्या नव्या गोष्टी घडत गेल्या आहेत. अशा घटनांच्या इतिसाहात डोकावून पाहिले, तर खरात नावाच्या भोंदूने महाराष्ट्राला दिलेला सांस्कृतिक धक्का ही एका परीने त्याच इतिहासाची पुनरावृत्ती ठरेल. म्हणूनच, महाराष्ट्राच्या विधिमंडळात कामकाजाच्या अखेरच्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याच मुद्यावरील एका चर्चेवरील उत्तरात व्यक्त केलेल्या भावना हे या संस्कृतिसंघर्षाच्या संकेतांची चिंता व्यक्त करणारे ठरले. कारण, व्यक्ती किंवा समाजाचे चारित्र्य हीच जेव्हा सापेक्ष आणि संशोधनाची बाब ठरते, तेव्हा कोणास चारित्र्यवान ठरवावे वा कोणास चारित्र्यहीन ठरवावे याचाच संभ्रम वाढण्याची आणि कालपरवापर्यंत अनैतिक मानल्या जाणाऱ्या एखाद्या धंद्यांवरही चारित्र्याचा मुलामा चढविण्याची चढाओढ सुरू होणे हा शहाजोगपणा ठरण्याचीच शक्यता अधिक! मुळात चारित्र्याच्या संकल्पनाच व्यक्ती, समूहाच्या विचार-संस्कारांनुसार वेगवेगळ्या असतात. चारित्र्याच्या परंपरागत समजुतींनुसार, ज्या ठिकाणी चारित्र्यवान व्यक्ती असणे अपेक्षित असते, तेथे बसणाऱ्यांकडून अनेकदा अपेक्षाभंगाचेच दुःख पदरी पडल्याचा अनुभव येत असतो. मंदिराचे पुजारी भाविकांची हत्या करतात आणि मंदिरांच्या आवारात, मूर्तींच्या पायाशी मृतदेहांची विल्हेवाट लावतात अशा बातम्या जेव्हा कानावर आदळतात, तेव्हा चारित्र्यवान कोणास ठरवावे हा प्रश्न पडून संभ्रमच वाढत असतो. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन अध्यात्माच्या नावावर दुकाने सुरू करून संस्कृती नासविणारे उद्योग सुरू केले जातात, तेव्हा, ज्या संकल्पनेबाबतचा संभ्रमच अधिक बळावतो. आता तसेच होऊ लागले असल्याने, संस्कृतिसंघर्षाची ही चिंता अधिकच बळावली आहे. म्हणूनच, मुख्यमंत्र्यांच्या त्या भाषणाची नोंद समाजमनात व्हावयास हवी.

गेल्या आठवडाभरात विधिमंडळात खरात प्रकरणाचे वेगवेगळे पडसाद उमटले. अनेक सदस्यांनी चिंता व्यक्त केली. या प्रकरणात दिवसागणिक समोर येणारी माहिती नवनवे धक्के देणारी माहिती समोर येत आहे. २५ मार्च रोजी त्यावर सविस्तर निवेदन करताना मुख्यमंत्र्यांनीही महाराष्ट्र धर्माचा पुनरुच्चार केला. महाराष्ट्राला समासुधारक, संतांची मोठी परंपरा लाभली आहे. या संतांनी अंधश्रद्धांवर कठोर प्रहार केले आहेत याचे अनेक दाखलेही मुख्यमंत्र्यांनी दिले. खरात प्रकरणाची संपूर्ण पाळेमुळे खणून काढून या व्यक्तीला आणि अशा प्रवृत्तींना कायमची जरब बसेल अशी कारवाई केली जाईल, अशी निःसंदिग्ध ग्वाही त्यांनी दिलीच, पण राज्यात जे काही घडते आहे, ते पाहता आपण कोठे जात आहोत याचा विचार करण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत त्यांनी बदलत्या सामाजिक परिस्थितिविषयी चिंतादेखील व्यक्त केली. महाराष्ट्र ही सश्रद्ध समाजाची भूमी आहे. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील सूक्ष्म भेदरेषा ओळखली पाहिजे. ती लक्षात आली नाही तर काय स्थिती होते हे खरात प्रकरणातून उघड झाले आहे. एक प्रकारे अंधश्रद्धेमुळे विवेकाचे भान कसे हरवते हे या प्रकरणातून दिसून आले आहे. आपल्या संतपरंपरेने ईश्वराचे अस्तित्व नाकारलेले नाही, तर अंधश्रद्धेवर प्रहार केले. ज्ञानेश्वर माउलींनी विश्वबंधुत्वाचा संदेश दिला, अंधश्रद्धेचा अंधकार नष्ट व्हावा अशी प्रार्थना पसायदानातून केली. तुकोबारायांनी साधूंची लक्षणे दाखवून दिली. आजच्या परिस्थितीत ही संतांची शिकवण महत्त्वाची आहे. खरात प्रकरणातून सरकार आणि समाजासाठी नवी शिकवण मिळाली आहे. महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी, वाढविण्यासाठी अंधश्रद्धा, भोंदूगिरीला स्थान मिळू देऊ नये यासाठी प्रयत्न करण्याची गरजही त्यांनी यावेळी अधोरेखित केली. सध्याच्या फोफावत्या विकृतींच्या संकटात असा सजगपणा दाखविण्यासाठी सरकार आणि समाजाच्याही सावधगिरीची गरज आहे. अन्यथा, ज्यास महाराष्ट्र धर्म म्हटले जाते, ती संस्कृती भविष्यात शोधावी लागेल. सज्ञान व्यक्तीस स्वयंआचरणाचे स्वातंत्र्य असल्याने व त्या स्वातंत्र्याचा त्याने विवेकाने वापर करावा असेच गृहीतच असल्याने विकृतांचे चाळे सुरू झाले तरी समाजाच्या झुंडी तिकडे वळाव्यात असे अजिबातच कोणासही अपेक्षित नसणार. उलट, अशा परिस्थितीत, समंजस समाजाने व व्यक्तींनी नेमका विचार करण्याची गरज अधोरेखित होते. म्हणजे, समजा, एकाच गल्लीत एखादे प्रार्थनास्थळ आहे आणि त्याच्याच शेजारी डान्सबार आहे, तर कोठे जाण्यात आपले हित आहे आणि कोठे जाण्याने आपल्यासह आपल्या कुटुंबीयांसही मनस्ताप होणार आहे, एवढा सारासार विचार करून निर्णय घेण्याची मुभा प्रत्येकाला आहे. अखेर, आपल्या व्यक्तिगत आयुष्याची घडी बिघडवायची की, सांभाळायची हे ठरविण्याएवढा विवेक प्रत्येकासच असतो. तसा विवेक न बाळगल्यास त्याचे परिणाम आपणास भोगावे लागतात, हे प्रत्येकासच स्वच्छपणे अनुभवता येत असते. या प्रकरणातून समोर येणारे नवनवे वास्तवही असेच अनुभव समाजासमोर ठेवणार आहे.

राजकारणात काही शब्द असे असतात, जे काळानुसार अधिक गाजतात; पण त्यांचा अर्थ मात्र धूसर होत जातो. ''महाराष्ट्र धर्म'' हा तसाच एक शब्द ठरू पाहात आहे. सत्ताधारी किंवा विरोधकांकडून वेगवेगळ्या प्रसंगी हा शब्द अभिमानाने उच्चारला जातो. परंतु, या शब्दामागील मूल्यांचा आजच्या वास्तवाशी किती संबंध उरला आहे, हा प्रश्न आजच्या काळातील वास्तवाकडे पाहताना अधिक महत्त्वाचा ठरतो. मुळात, ''महाराष्ट्र धर्म'' ही संकल्पना केवळ धार्मिक नव्हती. ती राज्यकारभारातील नैतिकतेची आणि समाजजीवनातील समतेची होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेत, 'धर्मसंकल्पने'त कर्तव्य, न्याय आणि प्रजाहिताच्या जबाबदारीची जाणीव अधोरेखित झालेली होती. 'हिंदवी स्वराज्य' ही कल्पना कोणत्याही एका धर्माची नव्हे, तर सर्वसामान्यांच्या सन्मानाची होती, तसाच 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द समावेशक आणि प्रगतिशील होता. हीच परंपरा पुढे संतसाहित्यात अधिक दृढ झाली. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या विचारांतून समाजाला समतेचा, सहिष्णुतेचा आणि मानवतेचा संदेश मिळाला. जात-पात, उच्च-नीच यांच्या पलीकडे जाऊन 'माणूस' हीच खरी ओळख आहे, हा विचार महाराष्ट्राच्या संस्कृतीचा गाभा ठरला. पुढे महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्यातून या 'महाराष्ट्र धर्मा'ला आधुनिक अर्थ दिला. आजकाल मात्र, हा शब्द अनेकदा भावनिक आवाहनापुरताच संकुचित होत असावा असे दिसते. यामुळे या शब्दाच्या मूळ संकल्पनेचा गाभाच हरवेल की काय, अशी भीतीही व्यक्त होते. कारण, महाराष्ट्र धर्म या संकल्पनेत महाराष्ट्राच्या संस्कृतिसंगमाचा इतिहास आहे. हा शब्द या परंपरा आणि संस्कृतीचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प ठरला पाहिजे. आजच्या वास्तवाचे चित्र मात्र, काहीसे संमिश्र दिसते. एका बाजूला महाराष्ट्र औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात देशात आघाडीवर आहे. विविधतेला स्वीकारण्याची परंपरा अजूनही टिकून आहे. परंतु दुसऱ्या बाजूला, जातीय तणाव, ग्रामीण-शहरी दरी, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी आणि राजकीय ध्रुवीकरण या समस्या ठळकपणे दिसतात. समाजजीवनातील पारदर्शकतेचा अभाव आणि शासन, प्रशासनातील सुशासनाचा अभाव, अंधश्रद्धा, काळी जादू आदींचा सुळसुळाट आणि थेट शासकांच्या शयनगृहापर्यंत पोहोचलेल्या अनैतिकतेच्या व्यवहारांचे आरोप यामुळे जनतेचा परस्परांवरील विश्वासही डळमळीत होताना दिसतो. बुवाबाजी किंवा भोंदूगिरीसारखे संस्कृतीला आव्हान देणारे धंदे कधीच एकट्या व्यक्तीच्या जोरावर उभे राहत नाहीत. त्यामागे अनेक अदृश्य शक्तींच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संरक्षणाचे कवच असते. या संरक्षणामुळेच, बुवाबाजी हा केवळ आध्यात्मिक क्षेत्रास विळखा घालणारा उद्योग राहिलेला नाही. तो एक संघटित, आखणीबद्ध पद्धतीने चालविणारा जाणारा, सत्ता, संपत्ती यांच्या जोरावर समाजावर वर्चस्व गाजविणारा कॉर्पोरेट धंदा बनू पाहत आहे. अशा परिस्थितीत, 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द केवळ घोषणांपुरता मर्यादित राहता कामा नये. तो आचरणात आला पाहिजे, अशी भावना बळावत जाते. समाजात विषमता वाढत असेल, दुर्बल घटकांना न्याय मिळत नसेल, सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा कमी होत असेल आणि श्रद्धा आणि अंधश्रद्धांमधील सूक्ष्म भेदरेषेच्या काठावरच्या सामान्यांचे धर्म, भक्तीच्या नावावर पिळवणूक, शोषण होत असेल, तर 'महाराष्ट्र धर्म' हा शब्द केवळ प्रतीकात्मक उरतो. हा शब्द म्हणजे महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय ठरावा, यासाठी तो केवळ इतिहासाचा वारसा म्हणून नव्हे, तर वर्तमानातील कृतीतून जपला गेला पाहिजे. समाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवले पाहिजे, समाजाने परंपरेने जतन केलेली समतेची सांस्कृतिक मूल्ये प्रत्यक्षात आणली पाहिजेत. शिक्षण, सामाजिक न्याय आणि आर्थिक संधी यामध्ये सर्वसमावेशकता निर्माण झाली, तरच महाराष्ट्र धर्म खऱ्या अर्थाने जिवंत राहील. अन्यथा, तो इतिहासाच्या गौरवगाथेतला एक सुंदर पण अपूर्ण अध्याय ठरेल.

dineshgune@gmail.com

---

## रविवारची पत्रे

### अंधश्रद्धा, भोंदू आणि सुज्ञ समाजाची गरज

भारतात 'आध्यात्मिक मार्गदर्शक' यांच्या नावाखाली घडणाऱ्या वादग्रस्त आणि धक्कादायक घटना आता नवीन राहिलेल्या नाहीत. वेळोवेळी अशा अनेक प्रकरणांचा पर्दाफाश होतो आणि समाजाला धक्का बसतो. सध्या चर्चेत असलेले कॅप्टन अशोक प्रकरण असो किंवा यापूर्वी उघडकीस आलेली अनेक प्रकरणे असोत, या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट दिसून येते की अंधश्रद्धा आणि आंधळा विश्वास यांचा गैरफायदा घेणारी मंडळी समाजात सक्रिय आहेत. ही समस्या केवळ एका धर्मापुरती मर्यादित नाही; सर्व धर्मांमध्ये अशा प्रकारच्या घटना कधी ना कधी समोर येताना दिसतात. आध्यात्मिकतेच्या नावाखाली लोकांना फसवण्याचा हा प्रकार समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

मानवाच्या आयुष्यात अध्यात्माला आणि श्रद्धेला एक महत्त्वाचे स्थान आहे. संकटाच्या काळात किंवा मानसिक अस्थिरतेच्या काळात माणूस एखाद्या आध्यात्मिक आधाराच्या शोधात असतो. ही एक नैसर्गिक आणि मानवी प्रवृत्ती आहे. अनेक संत, विचारवंत आणि आध्यात्मिक गुरूंनी समाजाला योग्य दिशा दिली आहे, लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. परंतु या पवित्र आणि संवेदनशील क्षेत्राचा गैरफायदा घेणारे काही भोंदू लोकही निर्माण झाले आहेत. ते आध्यात्मिकतेचा मुखवटा लावून लोकांच्या भावना, श्रद्धा आणि अडचणींचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करतात.

आज प्रश्न असा निर्माण होतो की हे भोंदू लोक इतक्या सहजपणे लोकांना कसे फसवू शकतात? विशेषतः आश्चर्याची गोष्ट म्हणजे अनेकदा या जाळ्यात सापडणारे लोक सुशिक्षित असतात. चांगल्या पदांवर काम करणारे, उच्च शिक्षण घेतलेले किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेले लोकही या प्रकारांना बळी पडतात. यामागे केवळ अज्ञान नसून मानसिक आणि सामाजिक कारणेही असतात. अनेक वेळा लोक वैयक्तिक अडचणी, कौटुंबिक समस्या, आर्थिक ताण किंवा आरोग्याच्या समस्या यामुळे अस्वस्थ असतात. अशा वेळी एखादी व्यक्ती ''मी तुमच्या सर्व समस्या दूर करतो'' असे सांगते, तेव्हा त्या व्यक्तीवर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती वाढते.

समाजाला फक्त शिक्षित नव्हे तर सुज्ञ असणे गरजेचे आहे. सुज्ञ समाज म्हणजे असा समाज जो कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारत नाही. तो प्रश्न विचारतो, विचार करतो आणि मग निर्णय घेतो. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये सूक्ष्म पण महत्त्वाचा फरक असतो. श्रद्धा ही विवेकबुद्धीच्या आधारावर असते, तर अंधश्रद्धा विवेकाला बाजूला ठेवून आंधळ्या विश्वासावर आधारित असते. भोंदू किंवा तथाकथित आध्यात्मिक गुरू यशस्वी होण्याचे एक मोठे कारण म्हणजे लोकांचा भावनिक कमकुवतपणा. जेव्हा एखादी व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर असते किंवा संकटात असते, तेव्हा तिला त्वरित उपाय हवा असतो. या मानसिकतेचा फायदा घेऊन काही लोक स्वतःला चमत्कारी शक्ती असलेले म्हणून मांडतात. ते लोकांना सांगतात की त्यांच्या सर्व समस्या एका विशिष्ट विधीने किंवा कृतीने दूर होतील. काही वेळा ते भीतीचे वातावरण निर्माण करतात. ''हे केले नाही तर तुमच्यावर संकट येईल'', ''देव रागावेल'' किंवा ''कुटुंबावर विपत्ती येईल''. अशा भीतीमुळे लोक तर्कशुद्ध विचार न करता त्यांचे म्हणणे मान्य करतात. प्रत्येक व्यक्तीने स्वतःला काही प्रश्न विचारणे गरजेचे आहे. मी जे मानतो ते का मानतो? कोणतीही गोष्ट ऐकून मी लगेच विश्वास ठेवतो का? माझा निर्णय भीतीवर आधारित आहे का, की विचारांवर? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे मिळाल्यास अनेक अंधश्रद्धा आपोआप दूर होतील. आजच्या काळात शिक्षण, विज्ञान आणि माहितीची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. इंटरनेट, पुस्तके आणि विविध माध्यमांमुळे ज्ञान मिळवणे सोपे झाले आहे. तरीही अंधश्रद्धेचे अस्तित्व कायम आहे, याचा अर्थ केवळ माहिती पुरेशी नाही. त्या माहितीचा वापर करण्याची वृत्ती आणि विचार करण्याची सवय विकसित करणे आवश्यक आहे.

**अनिरुद्ध राम निमखेडकर**/९९७०८३५७२४

### चारों जुग परताप तुम्हारा

''चारों जुग परताप तुम्हारा, है परसिद्ध जगत् उजियारा'' अशा शब्दांत हनुमंतरायाचा गौरव गोस्वामी तुलसीदासांनी हनुमान चालीसामध्ये केला आहे. या चौपाईचा भावार्थ लक्षात घेता गोस्वामी तुलसीदास हनुमंतरायांचे गुणगान करताना म्हणतात. चारही युगांचे वैभव हे तुमचेच आहे. आपल्या धर्मग्रंथांमध्ये आणि पुराणांमध्ये हनुमंतांच्या महतीचे सविस्तर वर्णन आले आहे. त्यात असे म्हटले जाते की, चारही युगांमध्ये भगवंत भक्तीचे मूर्तिमंत रूप असलेले, हनुमंत या कलियुगामध्ये जिवंत असून आपल्यामध्ये उपस्थित आहेत. सतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलियुग अशा चार युगांपैकी सतयुगात पवित्र अशा रूपात अस्तित्वात असलेल्या हनुमंताची शिव म्हणून पूजा केली जात जात असे आणि भगवान शिवाच्या आठ रुद्र अवतारांपैकी त्यांना शंकर सुवन, केसरीनंदन या नावाने ओळखले जात असे.



त्रेतायुगात अंजनीसुत हनुमंतांना मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांचा सहवास व माता सीतेचे प्रेम प्राप्त झाले. याशिवाय रामायणाच्या संदर्भानुसार, प्रभू श्रीराम लंकेवर विजय मिळवून अयोध्येत परत आले आणि सुग्रीव, बिभीषण, अंगद यासारख्या आपल्या वीर सहकाऱ्यांचे आभार मानू लागले. तेव्हा प्रभू श्रीरामाने प्रत्येकाला काहीतरी भेटवस्तू दिल्या. प्रसंगी हनुमंतरायांना भेट देण्याची वेळ आली तेव्हा, प्रभू श्रीरामांनी सांगितले, हे प्रिय हनुमंता! जोपर्यंत या भूतलावर रामकथेचे पठन, श्रवण, गायन होईल तोपर्यंत माझा आत्मा या देहात राहो आणि मी माझ्या भौतिक रूपात प्रत्येक रामकथेत उपस्थित राहून तुमच्या दिव्य खेळाचा आनंद घेत राहील. या प्रभू रामचंद्राच्या विधानामुळे कलियुगी हनुमंतराय चिरंजीव आहेत.

श्रीमद्भगवदानुसार, कलियुगात पृथ्वीवर हनुमंतरायाचे निवासस्थान गंधमाधन पर्वतावर सांगितले जाते. ''धर्म रक्षति रक्षितः'' हे तत्त्व सर्व मानवी जीवनाचे साधन बनविण्यासाठी हनुमंतराय पृथ्वीवर वास्तव्य करतात. ते धर्म आणि भक्तांचे रक्षण व रामकाजासाठी. कलियुगात भूतलावर हनुमंतरायांनी वास्तव्य केल्याची एक दुसरी कथा सांगितली जाते. गोस्वामी तुलसीदासांनी रामचरित मानसाच्या लेखन व गायनाने प्रसन्न होऊन हनुमंतराय गोस्वामी तुलसीदासांवर प्रसन्न झाले. तेव्हा गोस्वामी तुलसीदास भक्तिभावाने कळवळा करून हनुमंतरायांना म्हणू लागले की, मला प्रभू श्रीरामाचे दर्शन घडवा. गोस्वामी तुलसीदासांच्या विनंतीला हनुमंतराय प्रसन्न होऊन, मोठ्या चलाखीने चित्रकुटात श्रीरामाचे दर्शन घडविले. तसा उल्लेख स्वतः गोस्वामी तुलसीदास रामचरितमानस ग्रंथात करतात. तर द्वापारयुगात महाभारत पर्वकाळात धर्म संस्थापनेसाठी हनुमंतराय अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर स्वार झाले होते. हनुमंतरायांचे कार्य केवळ भक्ती, सामर्थ्य, तत्परता, बुद्धिमत्ता, विद्वत्ता, दास्यभक्ती या गुणवैशिष्ट्यानेच परिपूर्ण नसून; तर ते उत्तम कुटनीतीज्ञ, नेतृत्वी, युद्ध कौशल्यकलेने पारंगत होते. याशिवाय हनुमंतरायांच्या कार्याची प्रेरणा म्हणून आज आपणास पारमार्थिक, ऐहिक, आत्मोन्नतीसारख्या सर्व आघाड्यांवर प्रभुत्व आणि अद्भुत व्यवस्थापन शास्त्राचे आत्मदर्शन सुद्धा देते.

**शशिकांत तोटे**/९९३०८३५४५८

●● ●●

### धुरंधरचा क्षात्रधर्म

गुरुवार, १९ मार्च २०२६. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक असा दिवस, ज्याने दशकानुदशके पोसलेल्या सेक्युलर वृत्तीच्या चिंध्या केल्या. धुरंधर २ प्रदर्शित झाला आणि एका क्षणात संपूर्ण देशातील चित्रपटगृहांचे रूपांतर राष्ट्रभक्तीच्या रणांगणात झाले. ज्याप्रमाणे सूर्याच्या उदयाने अंधकाराचे साम्राज्य लयाला जाते, त्याचप्रमाणे धुरंधरच्या या प्रखर राष्ट्रवादाने दशकानुदशके फोफावलेल्या हिंदुद्वेष्ट्या मानसिकतेचा थरकाप उडाला आहे. हा चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजन नसून, तो या देशातील सांस्कृतिक दहशतवादाविरुद्ध पुकारलेले एक धर्मयुद्ध आहे.

**चित्रपटसृष्टीचा कायापालट** : धुरंधर मालिकेने चित्रपटसृष्टीची बुरसटलेली चौकट मोडून काढली आहे. चित्रपट शुक्रवारीच प्रदर्शित झाला पाहिजे, हा पाश्चिमात्य आणि बॉलिवूडचा नियम मोडून काढत, गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर गुरुवारी चित्रपट प्रदर्शित करण्याचे धाडस आदित्य धर यांनी दाखवले.

**खानदानी कारस्थानाचा अंत आणि हिंदू अस्मितेचा उदय** : दशकानुदशके बॉलिवूडने सलीम-जावेद प्रवृत्तीच्या लेखणीतून एक विशिष्ट अजेंडा राबवला. ज्यामध्ये रहीम चाचा हा देवदूत असायचा आणि कपाळावर टिळा लावणारा हिंदू हा हवस का पुजारी किंवा विश्वासघातकी असायचा. दुसऱ्या बाजूला पडद्यावरचा मुल्ला किंवा मौलवी हा नेहमीच अत्यंत नेक, इमानदार आणि शब्दाचा पक्का दाखवला गेला. हा जो मानसिक गुलामगिरीचा खेळ सुरू होता, त्याला धुरंधरने पूर्णविराम दिला आहे. त्याऐवजी धुरंधरने हिंदूंचे क्षात्रतेज दाखवून दिले. आज चित्रपटगृहात जेव्हा भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार कंधहार प्रकरणातील आतंकवाद्याला गुडघ्यावर टेकवून त्याच्याकडून ''भारत माता की जय'' वदवून घेतात, तेव्हा होणारा टाळ्यांचा कडकडाट हा त्या जुन्या, कुजलेल्या व्यवस्थेच्या कानशिलात लगावणारा एक सणसणीत टोला आहे.

**घुसकर मारेगा** : हा केवळ संवाद नाही, तर वास्तव : उरी आणि पुलवामा येथील भ्याड हल्ल्यांनंतर भारताने केलेले सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक हे जागतिक राजकारणातील मैलाचे दगड ठरले. शत्रूला त्याच्या सुरक्षित स्थळी जाऊन कंठस्नान घालण्याची जी क्षमता भारताने दाखवली, तिचेच भव्य दर्शन धुरंधर घडवतो. दहशतवादाशी कोणतीही तडजोड न करण्याचे आणि शत्रूच्या भूमीवर जाऊन त्याचा समूळ नायनाट करण्याचे हे धोरण हिंदू जनमानसाला आश्वासक वाटते. पाकिस्तानमध्ये तिथल्या सरकारने या चित्रपटावर बंदी घातली असली, तरी तिथली जनता चोरून हा चित्रपट पाहत आहे. हाच धुरंधरचा आणि हिंदू विचारांचा विजय आहे.

**नव्या पिढीचे वैचारिक प्रबोधन** : धुरंधरने भारतीयांना एका अत्यंत संवेदनशील आणि विस्मृतीत गेलेल्या वास्तवाची प्रखर जाणीव करून दिली आहे. ती म्हणजे, शत्रूच्या भूमीवर जाऊन स्वतःचा जीव तळहातावर घेऊन लढणारे अज्ञात भारतीय वीर. असे शेकडो रॉ एजंट्स किंवा गुप्तहेर आहेत, जे आपली ओळख पुसून, कुटुंबाचा त्याग करून पाकिस्तानसारख्या नरकामध्ये भारतासाठी डोळ्यांत तेल घालून पहारा देत आहेत. या अनाम वीरांना ना कधी पदक मिळते, ना त्यांचे नाव वृत्तपत्रात येते. मात्र, भारताचे रक्षण करण्यासाठी ते शत्रूच्या गोटात शिरून बलिदान देतात. धुरंधरने या अज्ञात वीरांच्या त्यागाला वंदन केले आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या मनात या छुप्या सैनिकांबद्दल कृतज्ञतेची भावना जागृत झाली आहे.

**विरोधकांचा जळफळाट** : हा चित्रपट मोदींचा प्रपोगंडा आहे, असे ओरडणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, जनतेला जे आवडते तो प्रपोगंडा नसून ते सत्य असते. पुढची २५ वर्षे केंद्रात सत्ता मिळण्याची शक्यता मावळल्याने जसे राजकीय विरोधक वैफल्यग्रस्त झाले आहेत, तशीच अवस्था आज हिंदुद्वेष्ट्या निर्मात्यांची झाली आहे. धुरंधरने जे यश मिळवले आहे, त्याच्या आसपासही हे पुरोगामी चित्रपट फिरकू शकत नाहीत. हीच नियतीची चपराक आहे. धुरंधरने सिद्ध केले आहे की, इथून पुढे चित्रपटगृहात केवळ तोच टिकेल, जो या मातीचा आणि संस्कृतीचा सन्मान करेल.

**अपर्णा जगताप**/पुणे

●● ●●

### युद्ध : सत्तेचा माज की हव्यास

सध्या सुरू असलेले अमेरिका, इस्रायल, इराण युद्ध म्हणजे मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि मानव जातीच्या नाशासाठी उचललेले अविचारी पाऊल आहे. राजकारणात प्रत्येकाला सत्ता हवी असते. मग ते राजकारण गावातील असो की राष्ट्राचे असो, त्या सत्तेचा स्वतःच्या स्वार्थासाठी, महत्त्वाकांक्षेसाठी आणि अहंकारासाठी उपयोग केला जातो. ज्या जनतेच्या जीवावर हे नेते सत्तेत येतात त्यांचा विचार यात गौण असतो. अहंकार, ईर्ष्या आणि हव्यास या तीन मानवी दोषांची एकत्रित परिणती म्हणजे आताचे युद्ध. अमेरिका एक प्रगत देश आहे. जगात त्याचा दबदबा आहे. तरीसुद्धा अमेरिकेला पूर्ण जग आपल्याच आधिपत्याखाली असावे असे वाटते. काही शतकांपूर्वी ब्रिटननेही हेच केले होते. आज स्थिती काय आहे? अमेरिकेच्या युद्धाची आणखी एक खुमखुमी म्हणजे आखातातील तेलावर आधिपत्य. म्हणजे माझं ते माझं आणि तुझं तेही माझंच, ही वृत्ती किती भयानक आहे. कदाचित अमेरिकेतील एपिस्टिन फाईलवरून लक्ष हटविण्यासाठी सुद्धा हे आक्रमण असू शकते. इस्रायल हा इराणचा प्रचंड द्वेष करतो. त्याला पूर्ण इराणच नष्ट करायचा आहे. त्यासाठी अमेरिकेला त्याने उचकावले. इराण काही धुतल्या तांदळासारखा नाही, पण त्याला स्वतःचे रक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. आक्रमण करणारे दोन्ही देश अन्वस्त्रधारी आहेत. पण इराणने अणुबॉम्ब बनवू नये म्हणून आक्रमण करतात हेच मुळी आश्चर्य आहे. सुरुवातीला या युद्धाचे गांभीर्य कोणालाच नव्हते. पण जसजसे युद्ध लांबू लागले तसे त्याचे गांभीर्य वाढले आणि काळजी वाटू लागली. आखाती देशात बरेच भारतीय नागरिक नोकरीनिमित्त आणि मुले शिक्षणासाठी आहेत. इराण सतत अमेरिकेच्या बेस कॅम्पवर हल्ला करायला लागला तस तशी भारतीयांची काळजी वाढायला लागली. चार-पाच दिवसात युद्ध संपेल असे सर्व जण मानत होते. पण युद्ध सुरू करणे आपल्या हातात आहे, ते थांबवणे नाही. दहा दिवसानंतर युद्धाच्या झळा भारतात पोहोचल्या तसे सर्व चिंतित झाले आणि पुढच्या दहा दिवसांनी त्याचे चटके बसायला लागले.

या युद्धात पाकिस्तान मध्यस्थी करणार हे ऐकून हसावे की रडावे हेच कळले नाही. परंतु एक मात्र खरे की या परिस्थितीचा फायदा उचलून पाकिस्तान भारताविरोधात नक्की काहीतरी आगळिक करू शकतो. त्यासाठी सर्वांनी सावध राहणे गरजेचे आहे. युद्धबंदी झाली तरी जिंकणारा लवकर विसरतो. पण हरणारा कधीही आपला पराभव विसरत नाही. त्याची जखम कायम भळभळत राहते. हे युद्ध लवकर थांबावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना करूया. हे युद्ध लवकर संपले नाही तर आज सिलेंडर, पेट्रोलच्या रांगा लागल्या, उद्या बँकेत आणि एटीएमसमोर रांगा लागतील. पुन्हा कोरोना काळासारखे येरे माझ्या मागल्या, असे होईल.

**माधवी पत्की**/नागपूर

---

## नवा विचारमार्ग देणारा 'गीता रहस्य'

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्थान केवळ स्वातंत्र्यलढ्यातील नेते म्हणून मर्यादित नाही. ते एक महान तत्त्वज्ञ आणि समाजमन घडवणारे चिंतकही आहेत. त्यांच्या 'गीता रहस्य'ने भारतीय समाजाला नवा विचारमार्ग दिला. या ग्रंथाच्या निर्मितीमागे दीर्घकाळ चाललेले तात्त्विक चिंतन, गीतेच्या मूळ संदेशाचा शोध आणि समाजाला निष्क्रियतेतून बाहेर काढण्याची तीव्र जाणीव दडली होती. ३० मार्चच्या गीता रहस्य जयंतीनिमित्त घेतलेला वेध.**

लोकमान्य टिळक यांना भगवद्गीतेचा परिचय लहान वयातच झाला आणि त्यावेळीच त्यांच्या मनात एक मूलभूत प्रश्न निर्माण झाला. गीता अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करण्यासाठी सांगितली गेली असताना, तिचा अर्थ कर्मसंन्यास किंवा निवृत्ती असा कसा लावला जातो, याबद्दल त्यांना शंका वाटू लागली. त्या काळात आदी शंकराचार्य यांच्या निवृत्तिमार्गी भाष्यांचा प्रभाव प्रबळ होता आणि मोक्षप्राप्तीसाठी कर्मत्याग आवश्यक आहे, ही धारणा समाजात खोलवर रुजली होती; परंतु टिळकांच्या विवेकशील बुद्धीला हा विचार अपूर्ण वाटत होता. त्यांनी गीतेतील प्रसंग, तिचा ऐतिहासिक संदर्भ आणि अर्जुनाच्या मनस्थितीचा विचार करून एक वेगळा निष्कर्ष गाठला. त्यांच्या मते, गीता ही कर्मत्यागाचा नव्हे, तर कर्तव्यकर्माचा उपदेश करणारी आहे. या प्रश्नाने त्यांच्या आयुष्यभराच्या चिंतनाला दिशा दिली आणि पुढे मंडालेच्या तुरुंगात असताना या चिंतनाचे रूपांतर 'गीता रहस्य'मध्ये झाले. तुरुंगातील कठीण परिस्थितीत हा ग्रंथ लिहिणे ही केवळ बौद्धिक कामगिरी नव्हती, तर मानसिक आणि आध्यात्मिक सामर्थ्याची कसोटी होती. एकांतवास, मर्यादित साधने, संदर्भग्रंथांची अनुपलब्धता आणि शारीरिक-मानसिक त्रास या सगळ्या अडचणी असूनही टिळकांनी स्मरणशक्ती, अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हा ग्रंथ पूर्ण केला. अनेकांना तुरुंगवास नैराश्य देतो; परंतु टिळकांनी त्याच काळाला सर्जनाचे साधन बनवले. त्यामुळे 'गीता रहस्य' ही केवळ एक तात्त्विक मांडणी नसून त्यांच्या जीवन दृष्टिकोनाची साक्ष देणारी कृती ठरते. या ग्रंथाचा मुख्य संदेश जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडवून आणणारा आहे.

टिळकांनी गीतेचा केंद्रबिंदू म्हणून कर्मयोग मांडला; परंतु तो एकांगी स्वरूपात नव्हता. त्यांच्या मते, ज्ञान, कर्म आणि भक्ती हे तीनही योग एकमेकांशी घट्ट जोडले आहेत. त्यांचा समन्वय साधल्याशिवाय जीवनाचे खरे सार समजत नाही. ज्ञानाशिवाय केलेले कर्म दिशाहीन ठरते, तर भक्तीशिवाय ज्ञान कोरडे आणि निर्जीव बनते. त्याचप्रमाणे कर्माशिवाय ज्ञान आणि भक्ती यांना प्रत्यक्ष जीवनात अर्थ राहत नाही. म्हणूनच टिळकांनी या तिन्ही योगांचा एकात्मिक विचार मांडला आणि त्यातूनच परिपूर्ण जीवनमार्ग उभा राहतो, असे स्पष्ट केले. टिळकांच्या या विचाराचा समाजावर मोठा परिणाम झाला. भारतीय समाजावर दीर्घकाळ निवृत्तिमार्गाचा प्रभाव राहिल्यामुळे निष्क्रियता, संसारत्याग आणि कर्मापासून दूर राहण्याची वृत्ती वाढीस लागली होती. टिळकांनी या मानसिकतेला धक्का देत कर्मप्रधान जीवनाची संकल्पना पुढे आणली. त्यांनी सांगितले की, समाजाच्या उभारणीसाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याचे पालन करणे आवश्यक आहे. या विचारामुळे स्वातंत्र्यलढ्यातील कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळाली. देशासाठी केलेले कार्य हाच खरे कर्मयोग आहे, अशी भावना समाजात दृढ झाली. त्यामुळे 'गीता रहस्य' हा ग्रंथ केवळ आध्यात्मिक न राहता तो राष्ट्रवादाचा आणि सामाजिक जागृतीचा आधार बनला. टिळकांनी नैतिकतेचा एक व्यापक दृष्टिकोन मांडला. त्यांच्या मते, व्यक्तीच्या आचरणात शुद्ध बुद्धी, शुद्ध इच्छा आणि शुद्ध आचरण यांचा समावेश असला पाहिजे. अशा व्यक्तीच समाजाचे नेतृत्व करू शकतात आणि समाजाला योग्य दिशा देऊ शकतात.

'गीता रहस्य'मधील तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक मोक्षासाठी मर्यादित राहत नाही, तर समाजधारणेचा पाया ठरते. व्यक्ती आणि समाज यांच्यातील नाते अधिक सुदृढ करण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाची भूमिका बजावतो. आजच्या काळातही या ग्रंथाचे महत्त्व तितकेच आहे. आधुनिक जीवनातील ताणतणाव, स्पर्धा आणि नैतिक द्वंद्व यामुळे माणूस अनेकदा गोंधळून जातो. अशा वेळी 'गीता रहस्य' आपल्याला कर्तव्य पार पाडताना फलाची अपेक्षा न ठेवण्याचा, विवेकाने निर्णय घेण्याचा आणि श्रद्धेने जीवन जगण्याचा मार्ग दाखवते. त्यामुळे या ग्रंथाकडे केवळ आध्यात्मिक ग्रंथ म्हणून न पाहता जीवन व्यवस्थापनाचा एक शाश्वत मार्गदर्शक म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. त्यांनी भारतीय समाजाला निष्क्रियतेतून क्रियाशीलतेकडे नेण्याचा प्रयत्न केला. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांच्या समन्वयातून त्यांनी जीवनाचा एक संतुलित आणि सशक्त मार्ग दाखवला. हा संदेश आजही तितकाच जिवंत आणि प्रेरणादायी आहे. व्यक्तीच्या उन्नतीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत आणि राष्ट्रनिर्मितीपासून आत्मिक समाधानापर्यंत सर्वत्र या ग्रंथाचा प्रभाव जाणवतो. भारतीय तत्त्वज्ञानाच्या अखंड परंपरेत भगवद्गीता हा ग्रंथ अत्यंत मध्यवर्ती स्थान राखतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला असला, तरी गीता ही निवृत्तीनंतर अभ्यासावी, अशी समजूत दृढ झाली. ती केवळ चुकीची नाही तर धोकादायकही आहे. कारण गीता हा जीवन कसे जगावे, कर्तव्य कसे पार पाडावे, नैतिकतेचा मार्ग कसा स्वीकारावा याचे मार्गदर्शन करणारा ग्रंथ आहे. त्यामुळे ती तरुण वयातच आत्मसात करणे अधिक आवश्यक ठरते.

'गीता रहस्य' हा केवळ ग्रंथ नसून जीवन जगण्याची दिशा देणारा दीपस्तंभ आहे. टिळकांनी मांडलेला ज्ञान-कर्म-भक्ती यांचा समन्वय आजही तितकाच प्रभावी आणि आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा स्वीकार केल्यास व्यक्ती घडेल, समाज उभा राहील आणि राष्ट्र अधिक सक्षम बनेल. त्यामुळे गीतेचा अभ्यास केवळ वाचनापुरता मर्यादित न ठेवता आचरणात उतरवणे हीच खरी काळाची गरज आहे.

**प्रा. मुक्ता पुरंदरे**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे ८ जुलै रोजी पंढरपूरला प्रस्थान



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा ८ जुलै रोजी पंढरपूरला प्रस्थान ठेवणार आहे आणि दि. २४ जुलै रोजी पंढरपूरला पालखी सोहळा पोहचणार आहे. या वर्षी प्रस्थानाची वेळ दुपारी तीनची आहे. १७ दिवस मुक्काम, ४ गोल तर ३ उभे रिंगण होणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख ड. राजेंद्र उमाप यांनी दिली आहे. तर आषाढी एकादशी २५ जुलै रोजी साजरी होणार आहे. येथील संत ज्ञानेश्वर महाराज मठात आळंदी संस्थानची बैठक पार पाडली.

ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता शेकडो मैल पायी चालत सावळ्या विठुरायाचे दर्शन घेण्यास भाविक आसुसलेला असतो. शेतकरी जसा मृग नक्षत्र किंवा पावसाची वाट पहात असतो. तशी वारकऱ्यांना आषाढी यात्रेची आस लागलेली असते. अनेक वर्षांपासून चैत्र दशमीला आषाढी यात्रेची तयारी, प्रस्थान आणि इतर विषयांवर आळंदी देवस्थानची बैठक होते. या प्रमाणे येथील संत ज्ञानेश्वर महाराज मठात बैठक पार पडली. या बैठकीला आळंदी संस्थेचे सर्व विश्वस्त आणि दिंडी समाजाचे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते. श्री. उमाप यांनी पालखी सोहळ्याचा कार्यक्रम जाहीर केला. ज्येष्ठ वद्य अष्टमी अर्थात बुधवारी (दि. ८ जुलै) आळंदी येथून प्रस्थान, ९ व १० जुलै पुण्यात मुक्काम, ११ व १२ जुलै सासवड मुक्कामी, दि. १३ जुलै रोजी जेजुरी, दि. १४ जुलै रोजी वाल्हे मुक्कामी राहणार आहे. दि. १५ जुलै रोजी नीरा स्नान करून पालखी लोणंद येथे मुक्कमी पुढे दि. १६ जुलै रोजी लोणंद येथून पुढे दुपारी पालखी चांदोबाचा लिंब येथे सोहळ्यातील पहिले उभे रिंगण होऊन पालखी तरडगाव येथे मुक्कामी येणार आहे. दि. १७ जुलै रोजी फलटण, तर १८ जुलै रोजी बरड येथे पालखी विसावणार आहे. १९ जुलै रोजी नातेपुते येथे पालखी मुक्कामी राहणार आहे. दि २० जुलै रोजी पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होऊन पालखी माळशिरस येथे मुक्कामी असेल. दि. २१ जुलै रोजी खडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण होऊन वेळापूर येथे पालखी विसावणार आहे. दि. २२ जुलै रोजी ठाकुरबूवा समाधीजवळ तिसरे गोल रिंगण आणि टप्पा येथे बंधू भेट होऊन पालखी भंडीशेगाव मुक्कामी आहे.

दि. २३ जुलै रोजी बाजीराव विहीर येथे गोल आणि उभे रिंगण होऊन पालखी वाखरी येथे विसावणार आहे. दि. २ रोजी म्हणजेच आषाढ दशमीला दुपारी उभे रिंगण होऊन सर्व संतांच्या पालखी पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहेत. दि. २५ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा होणार आहे.

या बैठकीत विविध अडचणी, समस्या शासनस्तरावर मांडून निराकरण करू, असा निर्णय झाला आहे असे असले तरी आता भाविकांना विठुरायाचे दर्शन आणि पायी वारीची ओढ लागली आहे.

## संघर्ष योद्धा युथ फाऊंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना टोपी वाटप

**मंद्रूप, दि. २८ मार्च -**

संघर्ष योद्धा युथ फाऊंडेशन, मंद्रूप यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी टोपी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत सुमारे २०० गरजू विद्यार्थ्यांना पांढऱ्या टोपींचे वाटप करण्यात आले. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना होणारा त्रास लक्षात घेऊन ही मदत देण्यात आली. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश उन्हाळ्याच्या तीव्रतेपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करणे आणि त्यांना आवश्यक वस्तू उपलब्ध करून देणे हा होता. विद्यार्थ्यांनी व पालकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमावेळी संघर्ष योद्धा युथ फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अभिषेक कोरे तसेच खय्युम मोमीन, ज्ञानदीप केवटे, मरुळाराध्य हिरेमठ, प्रसाद खांडेकर, शाम गोसावी, सचिन सुतार, शशिकांत रकटे, अजय साठे, अल्ताफ बाजे, शंतनू जोडमोटे, ओम कोरे व हर्षद केवटे उपस्थित होते.

## सीबीएसई शाळेसाठीचे अनुदान प्रलंबित

**सोलापूर, दि.२८ मार्च-**

महापालिकेकडे केंद्र सरकारकडून सीबीएसई शाळेसाठी प्राप्त झालेले १ कोटी रुपयांचे अनुदान गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहे. नालंदा नगर येथे महापालिकेची शाळेसाठी आरक्षित जागा उपलब्ध असून, त्याठिकाणी सीबीएसई धर्तीवरील शाळा तात्काळ सुरु करावी, अशी मागणी नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी केली.

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
विविध अभियांत्रिकी कार्य

निविदा सूचना क्र.: 10-20226-SrDENS, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहे. कामाचे नाव: 1. सोलापूर येथील पोर्टर चावी कॉलनीमधील बालविकास शाळेची दुरुस्ती. 2. सोलापूर नियंत्रण कार्यालयाच्या वर पहिल्या मजल्यावर कवच एनएमएस आणि फ्ट सेटअप रूमचे बांधकाम. 3. होटगी स्टेशन येथील पीएफ क्रमांक 2 आणि 3 वरील विद्यमान सेवा इमारतीमधील खोल्यांचे नूतनीकरण. 4. सिद्धेश्वर रेल्वे ऑफिसर्स क्लब, सोलापूर येथे मानक लॉन टेनिस कोर्ट, स्क्वॅश कोर्ट आणि बॅडमिंटन हॉलसह क्रीडा पायाभूत सुविधांसाठी प्रस्ताव. कामाचा अंदाजित खर्च: रू. 4,10,92,425.53, अनामत रक्कम: रू. 8,21,900.00, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने, देखभाल कालावधी: 24 महिने, www.Ireps.gov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 16.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, www. Ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 16.04.2026 रोजी 15:30 वाजता. इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/दुरुस्त्या पाहण्यासाठी त्यांनी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.Ireps.gov.in

डीआरएम (वर्क्स), सोलापूर
मं. रे. प्र. (कार्य), सोलापुर

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 10

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः देवळाली तालुका भूम व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसने कळिवण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** जि. धाराशिव सब डि व ता. भूमपैकी मौजे देवळाली येथील घरजागा ग्रामपंचायत मिळकत नं. ३३ याचे क्षेत्र १३६0.00 चौ. फूट याची चतुःसिमा पुर्वेस - सामाईक रस्ता, दक्षिणेस - भावकी रस्ता व पोपट कदम, पश्चिमेस - गावठाण व इतर व उत्तरेस - लक्ष्मण पांडुरंग कदम येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. गोकुळ बलभिम कदम यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. श्री. गोकुळ बलभिम कदम हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. केशव गोकुळ कदम यांच्या नांवे दिनांक ०९/०३/२०२६ रोजी बक्षीसपत्र दस्त क्रमांक ५४८/२०२६ अन्वये हस्तांतरीत केलेली आहे. सदरचा दस्त हा भूम येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदलेला आहे. सदर व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचीही, कसलीही कायदेशीर हक्काहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करतील. सदरचा गहाणखताचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसवणूक होऊ नये, म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक २८/०३/२०२६

सही/-
**श्री. प्रवीण परशुराम करंजकर**
**ॲडव्होकेट, बार्शी**

## जाहीर नोटीस

ॲड. वंदना एन. जगनाडे,
ॲड. अनिकेत एम. तायडे,
बाशी जिल्हा व सत्र न्यायालय

सोलापूर जिल्ह्यातील विशेषतः बार्शी तालुका व आसपासच्या तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, आमचे पक्षकार जयेश बाबासाहेब हांडे, रा. वाकडी, ता. परांडा, जि. धारशिव व रामचंद्र जनार्दन परबत, रा. तडवळे, ता. माढा, जि. सोलापूर यांनी, जि. सोलापूर, ता. बार्शी पैकी भोइंजे येथील गट नं. ९४ च्या जमिनीपैकी क्षेत्राच्या खरेदीचा व्यवहार, त्या जमिनीचे मालक श्रीमंत कृष्णा कदम, रावसाहेब त्रींबक लटके, कौसल्या महादेव गायकवाड, छबूबाई अरुण ढेकळे, बापूसाहेब त्रींबक लटके, अनंतराव त्रींबक लटके, मंदा सीताराम पाटील, लाडाबाई सतीश पाडुळे, अनुराधा सतीश पाडुळे व रोहन सतीश पाडुळे यांचे सोबत ठरवलेला आहे. आमचे पक्षकारांनी गट नं. ९४ संदर्भात कागदपत्रांची चौकशी करता, सदरची जमीन त्यांना त्याच्या आईकडून वारसाहक्काने आल्याचे दिसून आले. ही जमीन निर्वेध, निओखमी असल्याची हमी वरील व्यक्तींनी आमच्या पक्षकारास दिली. आमचे पक्षकार वर नमूद व्यक्तींच्या हिस्स्यापुरतीच जमीन खरेदी करणार आहेत. याउपरही, कोणाचीही फसवणूक होऊ नये, या उदात्त विचाराने, आमचे पक्षकार ही जाहीर नोटीस देत आहेत.

सबब ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत, जि. सोलापूर, ता. बार्शी पैकी भोइंजे येथील गट नं. ९४ च्या जमिनीसंदर्भात कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास पुराव्यासह हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाची काही हरकत तक्रार न आल्यास, कोणाची काहीही तक्रार नाही, असे समजून, आमचे पक्षकार जि. सोलापूर, ता. बार्शी पैकी भोइंजे येथील गट नं. ९४ पैकी श्रीमंत कृष्णा कदम, रावसाहेब त्रींबक लटके, कौसल्या महादेव गायकवाड, छबूबाई अरुण ढेकळे, बापूसाहेब त्रींबक लटके, अनंतराव त्रींबक लटके, मंदा सीताराम पाटील, लाडाबाई सतीश पाडुळे, अनुराधा सतीश पाडुळे व रोहन सतीश पाडुळे यांच्या कायदेशीर हिस्स्याच्या क्षेत्राची खरेदी करून घेतील, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. ता. २८/०३/२०२६

सही/-
**जयेश बाबासाहेब हांडे, रा. वाकडी, ता. परांडा, जि. धारशिव व रामचंद्र जनार्दन परबत, रा. तडवळे, ता. माढा, जि. सोलापूर यांचेतर्फे ॲड., बार्शी.**
**ॲड. वंदना एन. जगनाडे,**
**ॲड. अनिकेत लक्ष्मीकांत तायडे**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

अनिल श्रीपती पाटमास वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | १४७/२०२५ | २) माणिक रंगनाथ वाघे (मयत) वारस<br>२ अ) मालन माणिक वाधे, वय-६१, धंदा-शेती, रा. वाघे वस्ती, टेंभूर्णी ता. माढा जि.सोलापूर | ३,५७,९७४ | १०/०४/२०२६ |
| २ | १४७/२०२५ | २) माणिक रंगनाथ वाघे (मयत) वारस<br>२ ब) संजय माणिक वाघे, वय-३८, धंदा-शेती, रा.वाघे वस्ती, टेंभूर्णी ता. माढा जि. सोलापूर | ३,५७,९७४ | १०/०४/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील **प्रतिवादी नं. २ अ व २ ब** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ अ व २ ब ची नोटीस घर बंद अपूर्ण पत्ता** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी वार शुक्रवार रोजी दिनांक १०/०४/२०२६ सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

## जाहीर नोटीस

**ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट, कुर्डूवाडी**
**ता. माढा जि. सोलापूर**

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

आझाद जब्बार तांबोळी वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २९/२०२५ | २) नजीर मलिक तांबोळी वय-६२, धंदा-शेती, रा. चव्हाण वस्ती, पाटकुल रस्ता, टाकळी सिकंदर ता. गोहोळ जि. सोलापूर | २,१५,३०३ | १०/०४/२०२६ |
| २ | २९/२०२५ | ३) अन्वर मकबूल तांबोळी (मयत) वारस<br>३ ब) शहजादी मकबुल तांबोळी, वय-५०, धंदा-हॉटेल, रा. व्यंकटेश नगर, इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे | २,१५,३०३ | १०/०४/२०२६ |
| ३ | २९/२०२५ | ३) अन्वर मकबूल तांबोळी (मयत) वारस<br>३ क) मुमताज अन्वर तांबोळी, वथ-३९, धंदा-हॉटेल, रा.व्यंकटेश नगर, इंदापूर ता. इंदापूर जि.पुणे | २,१५,३०३ | १०/०४/२०२६ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २, ३ ब व ३ क यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. २ ची नोटीस अपूरा पत्ता या कारणाने व नं. ३ ब व ३ क ची नोटीस मालक घेत नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक १०/०४/२०२६** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे मा. लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय - प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

सही/-
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**GANDHI NATHA RANGJI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE, SOLAPUR**
13, Budhwar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur-413002
Phone College: [0217] 2624900-01 Prathisthan:- [0217]2327040
E-mail: gnrhme09@gmail.com Website: www.gnrhmcsolapur.org

**Wanted**

**Applications are invited for**

| Name of Post | Subject | Qualification | Experience | Vacancies |
|---|---|---|---|---|
| Professor | Surgery | MD (Hom.) | Associate Prof. Experience of 5 years. | 01 (Open) |
| Associate Professor | Physiology | MD (Hom.) | Assistant Prof. Experience of 5 years. | 01 (Open) |
| Associate Professor | FMT | MD (Hom.) | Assistant Prof. Experience of 5 years. | 01 (Open) |
| Associate Professor | Organon of Medicine | MD (Hom.) | Assistant Prof. Experience of 5 years. | 01 (Open) |
| Associate Professor | Practice of Medicine | MD (Hom.) | Assistant Prof. Experience of 5 years. | 01 (Open) |
| Assistance Professor/ Lecturer | Pharmacy | MD (Hom.) | NTET Exam. Pass | 01 (Open) |
| Assistance Professor/ Lecturer | Practice of Medicine | MD (Hom.) | NTET Exam. Pass | 01 (Open) |

Qualification, experience and pay scales are as per NCH New Delhi/ MUHS, Nashik Norms. Eligible candidates should send resume and copies of qualifications Creatificates at lecturer post is having compulsory NTET examination passed all the above certificates at College Office within 15 days submit in the college from the date of publication of Advertisement.

Sign/-
Mr. Sanjay S. Gandhi
President

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
विविध अभियांत्रिकी कार्य

निविदा सूचना क्र.: 11-20226-SrDENS, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहे. कामाचे नाव: 1. (अ) एडीईएन/केएलबीजी उपविभागांतर्गत वाडी येथील कुन्नोर पंप हाऊसच्या 300 मिमी व्यासाच्या 9000 मीटर लांबीच्या पाईपलाईनची बदली. (ब) (i) एडीईएन/केएलबीजी उपविभागांतर्गत बाबलाड पंप हाऊस ते केएलबीजी फिल्टर प्लांटपर्यंतच्या 200 मिमी व्यासाच्या 4500 मीटर लांबीच्या पाईपलाईनची बदली. ळळ शहाबाद पंप हाऊस ते शहाबाद फिल्टर प्लांट पर्यंत 200 मिमी व्यासाची 3650 मीटर लांबीची पाईपलाईन बदलणे, एडीईएन/केएलबीजी उपविभाग. 2. सोलापूर रेल्वे रुग्णालयात स्टोअर, डॉर्मिटरी आणि बाग विकासाचे बांधकाम. कामाचा अंदाजे खर्च: रू. 9,11,22,469.86, अनामत रक्कम रू. 18,22,500.00, काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने, देखभाल कालावधी: 24 महिने, www.Ireps.oov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 20.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, www. lraps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 20.04.2026 रोजी 15:30 वाजता. इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/दुरुस्त्या पाहण्यासाठी त्यांनी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.Ireps.gov.in.

डीआरएम (बांधकाम), सोलापूर
मं. रे. प्र. (कार्य),सोलापुर

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 11

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
सेप्टिक टाक्यांची साफसफाई व दुरुस्ती काम

निविदा सूचना क्रमांक: 04-2026-SrDENC सोलापूर विभागातील सेप्टिक टाकी. कामाचा अंदाजे खर्च: रू. 1,67,05,800.93 अनामत रक्कम: रू. 3,34,200.00 कामाचा पूर्णत्वाचा कालावधी: 12 विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहे. कामाचे नाव: सेप्टिक टाक्यांची स्वच्छता आणि किरकोळ दुरुस्ती देखभाल कालावधी: 12 महिने www.Ireps.gov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 17.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. www.Ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 17.04.2026 रोजी 15:30 वाजता. इच्छुक निविदाकारांना सूचित केले जाते की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/दुरुस्त्या पाहण्यासाठी त्यांनी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.Ireps.gov.in

डीआरएम (बांधकाम), सोलापूर
मं. रे. प्र. (कार्य), सोलापुर

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 12

## नावात बदल

मी. **सैफन समीर गाडीवान** याद्वारे घोषित करतो की माझे जुने नाव **सैफनसाब समीर गाडीवान** बदलून **सैफन समीर गाडीवान** असे करण्यात आले आहे. **रा.** २५०/४ क गट, गोदुताई विडी घरकुल मु . पो. कुंभारी, जि. सोलापूर - ४१३००६ (महाराष्ट्र राज्य)

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
दूरसंचार केबलची सुरक्षा

निविदा सूचना क्रमांक: SUR-N-T-2025-26-49 डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहे:- क्र. अनु.: 1 कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध पूल/आधार भिंतींच्या कामांमधील एस अँड टी केबल्स/गिअर्सचे संरक्षण/स्थलांतर. कामाचा खर्च: रू.68,18,889.41 निविदा अर्जाची किंमत: शून्य जमा करावयाची किमान रक्कम रू. 1,36,400.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने www.Ireps.gov.in वर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 28.04.2026 रोजी 15:30 वाजता. तपशील आयरेप्स वेबसाइटवर उपलब्ध आहे. काही दुरुस्त्या/सुधारणा असल्यास, त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष हाताने आणलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदा सादर करणाऱ्यांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवावे आणि त्याची www.Ireps.gov.in वर नोंदणी करावी. ईएमडी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे निविदा सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः सुपूर्द करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या.

डीआरएम (एस अँड टी)
व.मं.वि.अ. (जी)

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 08

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
विविध अभियांत्रिकी कार्य

निविदा सूचना क्र.: 09-2026-SrDENCO विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहे. कामाचे नाव: १) तिलाटी स्थानकावरील शंटिंग नेकचा विस्तार करून त्याचे डीएन गुड्स लूप लाईनमध्ये रूपांतर करणे. २) बीआरबी येथे अतिरिक्त लूप लाईन्सची तरतूद करणे. ३) जिथे अनुकूल क्रॉसओव्हर उपलब्ध आहे तेथे लूप लाईनचे कॉमन लूप लाईनमध्ये रूपांतर करणे (१. एसव्हीजी, २. केयूएल, ३. डीयूडी, ४. बीओटी, ५. एमकेपीटी, ८. एजी, ७. डब्ल्यूकेए, ८. बीएलएनआय, ९. जेएनटीआर आणि १०. बीजीव्हीएन) ४) घामी - लातूर-लातूर रोड सेक्शन दरम्यान नवीन ब्लॉक स्टेशनची निर्मिती. कामाचा अंदाजे खर्च रू. २९,०६,१७,८४६.०४ अनामत रक्कम: रू. ५८,१२,४००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १८ महिने देखभाल कालावधी: १२ महिने निविदा सूचना क्र.: १०-२०२६-एसआरडीईएनसीओ कामाचे नाव: १) सोलापूर विभागाच्या डीयूडी-डब्ल्यूडी सेक्शनमधील पूल क्र. ५६१/२ डीएन (स्पॅन ३ X ५.६० मी), ५७७/१ डीएन (स्पॅन २X ६.१० मी), ५८१/१ डीएन (स्पॅन २ X ६.१० मी) आणि ५८७/२ यूपीडीएन (स्पॅन ५ X ८.१० मी) या कमानी पुलांची बॅरलची लांबी वाढवून आणि रिटेनिंग वॉल, विंग वॉल व बॅलास्ट रिटेनरचे बांधकाम करून सुधारणा करणे. (पुनर्निमंत्रण) २) सोलापूर विभागातील ०४ ओआरएन-३ पुलांची पुनर्बांधणी (५३६/१ए, ५८९/२, ५८९/३डीएन एसयूआर-डब्ल्यूडी विभाग आणि ४२७/३ केडब्ल्यूव्ही-एमआरजे विभाग). (पुनर्निमंत्रण) कामाचा अंदाजित खर्च: २०,०७,४७,८४८.४६ अनामत रक्कम: ४०,१५,०००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १८ महिने देखभाल कालावधी: ४८ महिने www.Ireps.gov.in वेबसाइटवर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि ओळ: ०९-२०२६-एसआरडीईएनसीओ, १०-२०२६-एसआरडीईएनसीओ-२०.०४.२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख व वेळ: ०९-२०२६-SrDENCo, १०.२०२६-SIDENCO-२०.०४.२०२६ रोजी १५:३० वाजता. इच्छुक निविदाकारांना सूचित करण्यात येते की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/दुरुस्त्या पाहण्यासाठी, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: www.Ireps.gov.in.

डीआरएम (बांधकाम), सोलापूर
मं. रे. प्र. (कार्य),सोलापुर

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे 13

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

याद्वारे, बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २२/१२/२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, या सूचनाद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, २५/०३/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- केम**<br>**कर्जदार:**<br>**१.श्री. सुरेश जगन्नाथ देवकर.**<br>**प्रोपा. सुरेश जगन्नाथ देवकर**<br>पत्ता :-मु. पो. केम<br>ता. करमाळा, जि. सोलापूर-४१३२२३<br><br>**२. श्री.जगन्नाथ पांडुरंग देवकर (जामीनदार)**<br>पत्ता :-मु. पो. केम<br>ता. करमाळा, जि. सोलापूर-४१३२२३.<br><br>**३. श्री.भालचंद्र त्रिंबक गुयल (जामीनदार**<br>पत्ता :-मु. पो. केम<br>ता. करमाळा, जि. सोलापूर-४१३२२३ | **सुरक्षाः -**<br>श्री. जगन्नाथ पांडुरंग देवकर यांच्या नावे असलेल्या मालमत्तेचे गहाण.<br>नोंदणी जिल्हा सोलापूर, उपजिल्हा करमाळा येथील केम गावात स्थित असलेले जमिनीचे सर्व तुकडे, ज्यांचे क्षेत्रफळ ४४०० एकर असून सर्व्हे क्रमांक ४१२, मालमत्ता क्रमांक २०८६, घर क्रमांक १६१८ आहे.<br><br>**सीमा खालीलप्रमाणेः -**<br>उत्तर:- ४१३<br>पूर्व: - गट क्र. ४१६<br>पश्चिम: - गट क्र. ४११/६/१<br>दक्षिण: - रस्ता.<br><br>CERSI ID :- 200117923540 | **मागणी सूचना**<br>दिनांक २२.१२.२०२५<br>खातेवहीतील शिल्लक:<br>रु. १९,७०,८३५.९३ + न आकारलेले व्याज : रु. १,१७,८८८.००/-<br><br>**एकूण** = रु.२०,८८,७२४.००/-<br>**(रुपये वीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार सातशे चोवीस फक्त )** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 25/03/2026**

सही/-
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**
मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे
## जाहीर फेरलिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दि. ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार संजय चंद्रकांत बणजगोळे प्रोप्रा. वैशाली गंगाधर बणजगोळे रा.१) जी. १३६, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर २) ३०/६२, पद्मा नगर, सोलापूर व जामीनदार यांना पाठवून रक्कम रु.८२,४८,७८०,६० या वर दिनांक १७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर धकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत "अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

**कर्जदार-**
संजय चंद्रकांत बणजगोळे प्रोप्रा, वैशाली गंगाधर बणजगोळे
जामीनदार-
१. गंगाधर चंद्रकांत बणजगोळे रा.१) जी.१३६, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर २) रा.३०/६२, पद्मा नगर, सोलापूर
२. मल्लिनाथ महादेव मोरडे रा. मुस्ती ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत |
|---|---|---|
| गंगाधर चंद्रकांत बणजगोळे | मौजे दहिटणे ता. उत्तर सोलापूर येथील गट क्र.१७/१अ/ प्लॉट नं.२१ व २४ क्षेत्र १.८५८७ हे.आर.चौ.मी. आकार रु. ११३.०० पैसे यांसी<br>चतु:सीमा पूर्वेस- रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ३० व ३५<br>पश्चिमेस - रस्ता उत्तरेस प्लॉट नं. २२ व २३ | ६,००,०००/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर<br>६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२<br>**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. २९/०४/२०२६**<br>वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत<br>**निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. २९/०४/२०२६ सायं. ५:०० वा** | |
| ३१.०५.२०२५ अखेर येणेबाकी | रु. १,७८,२७,००५/- दि.०१.०६.२०२५ पासून पुढील होणारे व्याज, दंड व्याज व इतर खर्च | |

टिप- १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. २८/०४/२०२६ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. २. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले. जातील. ३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. ४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक : २८/०३/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पारंपरिक कुस्ती खेळ जपण्याबरोबर आपल्या मातीचासुद्धा मान वाढवूया

- आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन
- महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेला दिमाखात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च -**

कुस्तीमुळे शिस्त आणि जिद्द वाढते. कुस्तीमध्ये अनेक डावपेच असतात. कुस्ती आपल्या शरीराला ताकद व ऊर्जाही देते. कुस्तीमुळे आपल्या संस्कृतीचे दर्शन घडते. महाराष्ट्र केसरीसारख्या स्पर्धामुळे महिला कुस्तीला नवीन ओळख मिळत आहे. स्पर्धा सोलापुरात होत असल्याचा मोठा आनंद आहे. पारंपारिक खेळ जोपासण्याबरोबरच आपल्या मातीचासुध्दा मान वाढवूया, असे प्रतिपादन अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

निर्झरा केअर फाउंडेशनच्यावतीने संस्थापिका स्वाती अळ्ळीमोरे -साखरे यांनी आयोजित केलेल्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेला शनिवारी सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर मोठ्या दिमाखात प्रारंभ झाला. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते हनुमानाच्या मूर्तीचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करुन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

खेळाडूंच्या मदतीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल. देशात सर्वच क्षेत्रांमध्ये आज महिलांनी आपला झेंडा फडकवलेला आहे. कुस्ती क्षेत्रात सुद्धा आता महिला मागे राहिलेल्या नाहीत. महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींनी हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावरील आखाड्यात यावे, असे आवाहनही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, आमदार देवेंद्र कोठे,जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार,हिंद केसरी योगेश दोडके,कृषी सभापती रामप्पा चिवडशेट्टी, झेडपी सदस्य नेताजी खंडागळे,महाराष्ट्र केसरी बापूसाहेब लोखंडे सातारा, जिल्हाध्यक्ष कुस्ती सम्राट असलम काझी, महाराष्ट्र केसरी मुन्नालाल शेख बोरामणी, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, मौला शेख, महाभारत केसरी केसरी योगेश बोंबाळे, पुणे केसरी समीर कोळेकर, उमेश सूळ, कुस्ती निवेदक युवराज केचे यांच्यासह आयोजक स्वाती अळ्ळीमोरे साखरे, उद्योजक सागर कत्ते, नगरसेवक गणेश वानकर,सुधीर थोबडे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते,नगरसेवक विनोद भोसले, नागेश खरात, डॉ. शैलेश पाटील वानकर, पंच प्रमुख दिनेश गुंड, किसन मेकाले, भीमराव बाळगे, सोमनाथ पटणे, केदार विभुते,सोमनाथ अळ्ळीमोरे,लसुधा अळ्ळीमोरे,मोहन पाटील यांच्यासह कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.



### वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्पर्धेचे आयोजन

वडील सिद्धाराम साखरे हे स्वतः ज्येष्ठ कुस्तीपटू, पोलीस अधिकारी व समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांच्या स्मरणार्थ निर्झरा केअर फाऊंडेशनची २०२३मध्ये स्थापना केली. सोलापूर जिल्ह्यामध्ये कुस्तीसाठी चांगले नैपुण्य आहे. मात्र अव्वल दर्जाच्या सुविधा, आखाडे व स्पर्धांचे व्यासपीठ अभावी या खेळाडूंना अपेक्षेइतके आंतरराष्ट्रीय दर्जाचे करिअर करता येत नाही, हे लक्षात घेऊनच आम्ही निर्झरा फाऊंडेशनतर्फे कुस्तीगिरांच्या विकासासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही ही महिलांची महाराष्ट्र केसरी स्पर्धा घेत आहोत.असे निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक स्वाती अळ्ळीमोरे-साखरे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### धोनी आयपीएलचे पहिले दोन आठवडे मुकणार



**नवी दिल्ली :** चेन्नई सुपर किंग्जचा (सीएसके) मानबिंदू असलेला एम.एस. धोनी पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे आयपीएलचे पहिले दोन आठवडे मुकण्याची शक्यता आहे, असे या फ्रँचायझीने शनिवारी सांगितले. धोनी सध्या पोटरीच्या स्नायूंच्या ताणावरील उपचारांसाठी पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहे. परिणामी, तो टाटा आयपीएल २०२६ चे पहिले दोन आठवडे मुकण्याची शक्यता आहे, असे सीएसकेने म्हटले आहे. २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यापासूनही धोनीने आयपीएल खेळणे सुरूच ठेवले आहे. सीएसकेचा प्रत्येक हंगामातील प्रवास संपल्यानंतर, या ४४ वर्षीय खेळाडूचे आयपीएलमधील भवितव्य हा नेहमीच चर्चेचा एक महत्त्वाचा विषय बनतो. धोनी केवळ आयपीएलच खेळत असल्याने, सामन्यांसाठी आवश्यक असलेली शारीरिक तंदुरुस्ती टिकवून ठेवणे त्याच्यासाठी अधिकच कठीण जाते.

# सांगलीच्या अपेक्षा पाटीलची विजयी सलामी

## महाराष्ट्र महिला केसरी : ५३ किलो गटात सोलापूरच्या शिवानी करचेची सलामी



सोलापूर : अहिल्यानगरची सोनाली मंडलिक आणि सांगलीची अपेक्षा पाटील यांच्यातील लढतीचा क्षण (छाया : केवल तिवारी)

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च.**

कै. सिद्धराम साखरे यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र केसरी ७६ किलोच्या गटात सलामीची लढत अहिल्यानगरची सोनाली मंडलिक आणि सांगलीची अपेक्षा पाटील यांच्यात झाली. मध्यंतरास सोनाली २-० गुणाने आघाडीवर होती. त्यानंतर मात्र विजेतेपदाची दावेदार असलेल्या अपेक्षाने मुसंडी मारत ६-३ गुणाने कुस्ती जिंकली. निर्झरा केअर फाऊंडेशनने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर यांच्या सहकार्याने ही स्पर्धा हरिभाई देवकरण मैदानावर आयोजित केली आहे. शनिवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत ५३ किलो गटात सोलापूरची शिवानी करचे हिने पुण्याच्या अवंती रानवडे हिला ६-५ असे हरवले.

**दुसऱ्या फेरीत पोहोचलेले गटनिहाय मल्ल**

| | |
|---|---|
| ५० किलो | तेजा मदने (छ. संभाजीनगर), तृप्ती गुरव (कोल्हापूर), आकांशा जाधव, अर्पिता गोळे (पुणे), भाग्यश्री मासुळे (धुळे), गौरी पाटील (कोल्हापूर), अनुष्का हासपे (सातारा), कोमल पटेल (ठाणे). |
| ५३ किलो | श्रावणी लव्हटे (कोल्हापूर), दिव्या धावडे (अहिल्यानगर), सोनामिका पाटील (जळगाव), राजनंदिनी रनवरे (सातारा), मधुरा वाईंगडे (कोल्हापूर), तुळशी पाथरे (नाशिक शहर). |
| ५५ किलो | समृद्धी निलवे (मुंबई उपनगर ). |
| ५७ किलो | सलोनी खोपडे (पुणे), सिमरन कोरी (मुंबई उपनगर), तन्वी मगदूम (कोल्हापूर). |
| ५९ किलो | धनश्री फंड (अहिल्यानगर), निर्मिती मुऱ्हे (पिंपरी चिंचवड), अमेघां घरत (रायगड). |
| ६२ किलो | प्रगती गायकवाड (पिंपरी चिंचवड), संस्कृती शिरसाट (नाशिक), राधिका ढेरे, राधिका ढेरे (कोल्हापूर). |
| ६५ किलो | दिव्या कुंभार,विशाखा चव्हाण ( पुणे ), अश्विनी गर्जे (बीड). |
| ६८ किलो | शिवानी मेटकर (कोल्हापूर), आराधना नाईक (सांगली). |
| ७२ किलो | सावरी सातकर (पुणे), वेदांतिका पवार (सातारा). |
| ७६ किलो महाराष्ट्र केसरी गट | वेदिका ससाणे, सृष्टी भोसले (कोल्हापूर), प्रतीक्षा बागडी (सांगली). |

### संघाला सामने जिंकवून देणे हेच ध्येय : रघुवंशी



अंगकृष रघुवंशी

**मुंबई :** मी ज्या संघाकडून खेळतो, त्या संघाला सामने जिंकवून देणे हेच माझे एकमेव ध्येय आहे,. असे कोलकाता नाईट रायडर्सचा युवा यष्टिरक्षक-फलंदाज अंगकृष रघुवंशी म्हणाला. न्यूझीलंडचा टिम सेफर्ट व अद्याप आंतरराष्ट्रीय स्तरावर न खेळलेला भारतीय खेळाडू तेजस्वी दहिया असे दोन तज्ज्ञ यष्टिरक्षक केकेआर संघात आहेत. अशा परिस्थितीत केकेआरसाठी रघुवंशीची यष्टिरक्षणाची कौशल्ये अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. इतर संघांप्रमाणेच केकेआरलासुद्धा आयपीएलच्या प्रारंभीच्या टप्प्यात आपल्या संघाचा योग्य समतोल साधण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. मी यष्टिरक्षणाचा कसून सराव करत असून भविष्यात यातून काय निष्पन्न होते, ते आपण पाहू, असे २१ वर्षीय रघुवंशी म्हणाला. भारतीय संघातील विविध प्रकारच्या क्रिकेट सामन्यांमध्ये स्थान मिळवण्यासाठीची स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत असतानाआणि यशस्वी जैस्वाल व तिलक वर्मा यांसारखे तज्ज्ञ फलंदाजही आपल्या गोलंदाजीच्या कौशल्यांवर सतत काम करत असताना रघुवंशीलाही एका कठीण स्पर्धेला सामोरे जावे लागणार आहे.

### आर. अश्विन एमएलसीमध्ये खेळणारा पहिला भारतीय

**सॅन फ्रान्सिस्को :** भारताचा दिग्गज ऑफ-स्पिनर रविचंद्रन अश्विन हा २०२६ च्या हंगामासाठी सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स संघासोबत करार केल्यानंतर, मेजर लीग क्रिकेट (एमएलसी) मध्ये खेळणारा पहिला भारतीय खेळाडू होण्यास सज्ज झाला आहे. अश्विन हा २०११ चा एकदिवसीय विश्वचषक आणि २०१३ ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या भारतीय संघाचा एक महत्त्वाचा सदस्य होता. एकूणच, त्याने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधील २८७ सामन्यांतून ७६५ आंतरराष्ट्रीय बळी मिळविले आहेत आणि कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक बळी घेणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो सातव्या क्रमांकावर आहे. सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्स संघाचा भाग बनण्याची जी संधी मला मिळाली, ती मी कोणत्याही परिस्थितीत गमावू शकत नव्हतो, असे अश्विन म्हणाला.



# विभागीय शालेय फिल्ड आर्चरी स्पर्धेत पुण्याचे वर्चस्व

### पं.स.सदस्या प्राजक्ता पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**मोडनिंब, दि. २८ मार्च-**

पुणे विभागीय शालेय फिल्ड आर्चरी स्पर्धेत पुण्याच्या धनुर्धरांनी यश मिळवत वर्चस्व राखले.

या स्पर्धा माढा तालुक्यातील अरण येथील यशोदा गुरुकुल च्या प्रांगणात पार पडल्या.या स्पर्धेचे उद्घाटन पं.स.सदस्या प्राजक्ता पाटील,फिल्ड आर्चरी अध्यक्षा सुप्रिया किरनाळे व महिला पालकांच्या हस्ते श्रीफळ व बाण मारुन केला. उपस्थितांचे स्वागत सोलापूर फिल्ड आर्चरी असोसिएशनचे सचिव प्रा.रमेश शिरसट यांनी केले. याप्रसंगी सोलापूर धनुर्विद्या संघटनेचे हरिदास रणदिवे, प्रशिक्षक सावता घाडगे, विठ्ठल माळी, सागर सुर्वे, राष्ट्रीय धनुर्धर रत्नतेज शिरसट सह पालक उपस्थित होते. या स्पर्धेतून लातूर येथे दि.२९ ते ३० मार्च रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ४२ जणांची निवड झाली आहे.

**स्पर्धेतील अंतिम गुणानुक्रमे खेळाडू : मुले व मुली :**

१४ वर्षांखालील : इंडियन राऊंड : स्वराज कणसे,हर्षद शेंडगे,सार्थक राऊत,आर्यन बनकर,आस्मी सावंत,वेदांती लोखडे,समीक्षा नामदास,सिद्धी लोणकर. रिकर्व्ह राऊंड : ओम गोयकर, भार्गवेश पवार, विहानसिंग रजपूत, आयुष शिंदे, स्वराली जाधवर,मृण्मयी ओहोळ, श्लोका ढोणे. कम्पाऊंड राऊंड : तनिष लेंडे,पार्थ पाटील,सौरिश पांडे,राजवीर जाधव,सानवी नलवडे,कृषिका पिंगलीली,ह्दिा राजगुरु.

१७ वर्षांखालील : इडियन राऊंड : विश्वजित गरगडे, अमित थंब, सूर्यतेज घाडगे,आदित्य शेळके, केतकी खोपकर, प्रगती चव्हाण.

रिकर्व्ह राऊंड : अवधूत गरगडे,मोहम्मद सुवेज देवळे, विवेक भोगल, विराज गावस, श्रेया तेली, शौर्या सुरवसे.

कम्पाऊंड राऊंड : ईशान शहा, धैर्यशिल दाभाडे, शिवम पानसरे, स्वानंदी गावडे, वंशिका भाटीया, मोहम्मद आनास पठाण.

# महिला संघाने अजिंक्यपद पटकावून राज्याच्या शिरपेचात रोवला मानाचा तुरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या अंडर २३ महिला संघाने अजिंक्यपद पटकावून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. २०२५-२६ हा हंगाम महाराष्ट्र महिला क्रिकेटसाठी ऐतिहासिक ठरला आहे. सीनियर टी २० आणि आता अंडर २३ वन-डे अशा दोन प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने विजेतेपद पटकावले आहे. निवड समितीच्या अध्यक्षा स्नेहल जाधव यांच्या नेतृत्वाखालील समितीने सलग दुसरी मोठी ट्रॉफी राज्याला मिळवून देत एक नवा मापदंड प्रस्थापित केला आहे.

**पारदर्शक निवड प्रक्रिया हेच यशाचे गमक**

विजयानंतर आपली प्रतिक्रिया देताना निवड समिती अध्यक्षा स्नेहल जाधव म्हणाल्या, निवड प्रक्रिया ही अत्यंत जबाबदारीची आणि संवेदनशील बाब असते. संघ निवडताना केवळ धावा किंवा विकेट्स न पाहता, प्रत्येक खेळाडूची मानसिक ताकद, फिटनेस आणि कौशल्य यांचा सखोल अभ्यास आम्ही केला. संपूर्ण निवड समितीने (सविता ठाकर, रेश्मा धामणकर, शर्मिला साळी, गौरी कुंते) अतिशय प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पद्धतीने काम केले. आज हा विजय मिळाला, तेव्हा आमच्या मेहनतीचे खरे फळ मिळाल्याची भावना आहे. हेड कोच हेमंत किणीकर आणि सर्व सपोर्ट स्टाफने खेळाडूंच्या कामगिरीत मोलाची भर घातली. अंडर २३ स्तरावरील ही कामगिरी खेळाडूंच्या करिअरसाठी 'टर्निंग पॉईंट' ठरेल. येथूनच राष्ट्रीय संघात जाण्याचा मार्ग मोकळा होतो, असा विश्वास स्नेहल जाधव यांनी व्यक्त केला.

थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्र अंडर २३ महिला संघाचा हा विजय म्हणजे सशक्त प्रणाली, कामगिरीवर आधारित निवड आणि संघभावनेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. आगामी काळात महाराष्ट्र महिला क्रिकेटची ही झेप अशीच कायम राहील, यात शंका नाही.

# अमृता आणि अपेक्षा जेतेपदासाठीच्या दावेदार



## गतविजेत्या भाग्यश्री फंडचे मत

## महिला महाराष्ट्र केसरी २०२६

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महिला महाराष्ट्र केसरी होण्यासाठी आता स्पर्धात्मकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अमृता पुजारी आणि अपेक्षा पाटील व वैष्णवी पाटील या यंदाच्या किताबावर दावेदारी करू शकतील, असे मत याआधीच्या पहिल्या तिन्ही महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धांचे जेतेपदाचे किताब जिंकणाऱ्या भाग्यश्री फंडने व्यक्त केले.

गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करीत विजेतेपद मिळवले होते. पण यंदा चौथ्यांदा महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती पुरस्कारावर दावा करणार नसल्याचे भाग्यश्रीने स्पष्ट केले. यासंदर्भात भाग्यश्री म्हणाली, माझा सध्या वजनी गट ५९ ते ६२ किलो आहे. महाराष्ट्र केसरी गटासाठी ६५ ते ७६ किलो वजनी गट पात्र ठरतो. इतके वजन वाढवणे आता अवघड असल्यामुळेच मी यावर्षी स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. महाराष्ट्र केसरी किताब जिंकण्यासाठी तू मागील तीन वर्षे कशी मेहनत घेतलीस, या प्रश्नाला



उत्तर देताना भाग्यश्री म्हणाली, ट्रिपल महाराष्ट्र केसरी किताबावर वर्चस्व राखणे, हे मुळीच सोप्पे नव्हते. गेली तीन वर्षे मी कसून मेहनत घेतली. वजन वाढवणे, विविध डाव-प्रतिडावांचा सराव करणे, लढतीचा सराव करणे याचा यात समावेश होता. पुरुषांमध्ये महाराष्ट्र केसरी झाल्यावर शासकीय नोकरी मिळते. मी ट्रिपल महाराष्ट्र केसरी झाली. पण अजूनही मला नोकरी नाही. आम्ही बरेच प्रयत्न केले. पण ते यशस्वी ठरले नाहीत, अशी खंत भाग्यश्रीने प्रकट केली.

# विजय चषक सिंगल विकेट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या वतीने दि. ३ एप्रिल २०२६ पासून सोलापुरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर जिल्हास्तरीय विजय चषक सिंगल विकेट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती चंद्रकांत रेम्बोर्सु यांनी पत्रकार परिषदेत दिली.

असोसिएशनच्या वतीने या वर्षापासून १९ वर्षावरील सर्व खेळाडूंसाठी सिंगल विकेट स्पर्धा घेण्यात येत आहे. विजेत्या खेळाडूस ११ हजार रुपये व ट्रॉफी, उपविजेत्या खेळाडूस ७ हजार रुपये व ट्रॉफी, बेस्ट विकेट किपर व बेस्ट फिल्टरसाठी प्रथम क्रमांक एक हजार रुपये, द्वितीय क्रमांक ५०० रुपये असे बक्षीस ठेवण्यात आली आहेत. ही स्पर्धा दि. ३ एप्रिल २०२६ पासून सुरू होत आहे. स्पर्धेसाठी ज्या खेळाडूंना फिल्डिंगसाठी यायचे आहे. त्यांना मानधन १ हजार रुपये देण्यात येणार आहे. या सामन्यासाठी प्रवेश फी ५०० रुपये आहे. प्रवेश फी भरण्याची तारीख दि. २८ मार्च ते १ एप्रिल २०२६ पर्यंत आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन चंद्रकांत रेम्बोर्सु यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस अनिल जाधव, संजय वडजे, राजू रंगम, राजेंद्र गोटे आदी उपस्थित होते.



# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

येथील टीचर्स क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ४० प्लस प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेस सुरुवात झाली. याचे उद्घाटन नगरसेविका वृषाली चालुक्य व अश्विनी राठोड यांच्या उपस्थितीत झाले. ही स्पर्धा डोणगाव पुष्प क्रिकेट मैदान, दयानंद महाविद्यालय व रेल्वे क्रिकेट मैदानावर आयोजित केली आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पांडुरंग गेजगे, रवी चव्हाण, अरविंद ताटे, भालचंद्र हंचाटे, सचिन क्षीरसागर, इस्माईल शेख, परशुराम कांबळे, सुनील शिंदे, अमित माने, श्रीकांत काशीद आदी प्रयत्नशील आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### करमाळा बसस्थानकातील चोरीचा गुन्हा उलगडा; महिला चोरट्यास अटक

**करमाळा, दि. २८ मार्च-**

करमाळा बसस्थानकात काही दिवसांपूर्वी घडलेल्या चोरीच्या घटनेचा उलगडा करण्यात करमाळा पोलिसांना यश आले असून, या प्रकरणी एका महिला आरोपीस अटक करण्यात आली आहे. शहरातील सावंत गल्ली येथील कमल शिवाजी खुळे या आपल्या मुलीकडे पुण्याला जाण्यासाठी परांडा-स्वारगेट बसमध्ये चढत होत्या. दि. २४ रोजी सकाळच्या सुमारास बस स्थानकात मोठी गर्दी असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅगेतून सुमारे ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, रोख ५०० रुपये तसेच अंदाजे १५ हजारांचे पैंजण असा मुद्देम ाल लंपास केला होता. या घटनेनंतर करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक रणजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण पथकाला तपासाच्या सूचना देण्यात आल्या. तपासादरम्यान पोलिसांनी बसस्थानकातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली असता, फिर्यादीच्या पाठीमागे संशयास्पद हालचाली करणारी एक महिला दिसून आली. त्यानुसार पुढील शोध घेतला असता महिला करमाळा तालुक्यातील मिरगव्हाण गुड्डी चैतन्य काळे असल्याचे निष्पन्न झाले. चौकशीदरम्यान तिने सदर चोरी केल्याची कबुली दिली असून, तिच्याकडून चोरी केलेला मुद्देम ालही जप्त करण्यात आला आहे. महिला आरोपीस अटक करण्यात आली असून, तपास मोहोळकर करीत आहेत.



### कै. सूर्यकांत माने-देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त पाणपोईचे उद्घाटन

**वेळापूर, दि. २८ मार्च-**

वेळापूर येथे सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कै. सूर्यकांतदादा माने-देशमुख यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कै. सूर्यकांतदादा माने देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरू करण्यात आलेल्या पाणपोईचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी कै सूर्यकांतदादा माने देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे व नूतन जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आशिष कांबळे चंद्रकांत जाधव व यशस्वी महिला व्यवसायिक श्रीमती अश्विनी माने या सर्वांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी अमृतराज माने देशमुख, अमरसिंह माने-देशमुख, बाळासाहेब धाईंजे, आनंदराव माने देशमुख, बाळासाहेब माने देशमुख, सुभाष जगताप, जयराज माने पाटील, विरकुमार दोशी, बप्पा पाटील, दत्तात्रय माने, गोपाळ घाडगे, संदीप माने देशमुख, पिनू एडगे, मेजर निशिकांत शिंदे, पांडुरंग घाडगे, पांडुरंग पनासे, उमेश भाकरे, सुनील गायकवाड, शैलेश भाकरे, विष्णुपंत पिसे, विश्वास वाघे, प्रशांत धोत्रे, श्रीधर देशपांडे, प्रवीण चव्हाण, अशोक साबळे, हरी मेटकरी, श्रीकृष्ण देशपांडे, गिरीश कुलकर्णी, सुदाम अंबुरे, ओंकार खराडे, सचिव दीपक माळवदकर ,क्लार्क शिवाजी आडत, विजय मिरगे, अशपाक मुलानी, धैर्यशील माने देशमुख, शंकरराव माने देशमुख, राहुल माने देशमुख, शरद साठे, राजकुमार बनसोडे, मेजर हिम्मतराव माने देशमुख, विश्वजीत माने देशमुख, सूर्यकांत भाकरे, सचिन भाकरे, दादासाहेब भाकरे, अनंत क्षीरसागर, वसंत क्षीरसागर, निखिल शिंदे, दत्तात्रेय माळी, महेश साठे, उत्तम साठे, शिवाजी माने-देशमुख, संतोष माने-देशमुख, मोहन काशीद, श्रीनिवास कदम पाटील उपस्थित होते.





### कीर्तन, शोभायात्रा व महाप्रसादाने श्रीराम जन्मोत्सवाची सांगता


**सांगोला, दि. २८ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम मंदिर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त शहरातील विविध भजनी मंडळांचे भजन, प्रवचन, गीत रामायण, सांगोला शहरातील महिलांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम, भारुड, नाट्य, नृत्य असे विविध कार्यक्रम पार पडले. गुरुवारी हभप शुभांगी कवठेकर यांचे जन्मोत्सवाचे कीर्तन झाले. त्यांना तबल्याची साथ दत्तात्रय बोत्रे यांनी तर हार्मोनियमची साथ शशिकांत लाटणे यांनी केली. दु.१२ वा. पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी श्रींच्या पालखीची भव्य शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. शुक्रवारी दुपारी महाप्रसादाने जन्मोत्सवाची सांगता झाली. या विविध कार्यक्रमांचा लाभ सांगोला शहर व तालुक्यातील भाविक भक्तांनी घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. सारंग वांगीकर, नामसाधना मंडळ व श्रीराम महिला भजनी मंडळ सदस्यांनी व श्रीराम भक्तांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### सिद्राम बल्ला

**सोलापूर, दि. २८ मार्च-**



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या माजी नगरसेविका कॉ. सुनंदा बल्ला यांचे पती सिद्राम बालाजी बल्ला यांचे दीर्घ आजाराने दि. २८ मार्च रोजी सकाळी ७ वाजता त्यांच्या दत्तनगर येथील राहत्या घरी निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ४ वाजता शांती चौक, पद्मशाली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते अशोक बल्ला यांचे वडील होत.

# चैत्री यात्रेसाठी ६ अतिरिक्त पत्राशेडची निर्मिती

### ● गहिनीनाथ महाराज औसेकर ● भाविकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

चैत्र शुद्ध कामदा एकादशी निमित्त दरवर्षी होणारी चैत्री यात्रा यंदा दि.२९ मार्च रोजी पार पडत असून, यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयी-सुविधांचा विचार करून श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीने सर्वंकष नियोजन केले आहे. सुलभ, सुरक्षित व जलद दर्शनासोबतच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

दर्शनरांग व्यवस्थापन अधिक सुसूत्र करण्यासाठी स्कायवॉकपासून पत्राशेडपर्यंत बॅरिकेटिंग करण्यात आले असून कायमस्वरूपी ४ व तात्पुरते ६ असे १० पत्राशेड उभारण्यात आले आहेत. यात्रा कालावधीत मंदिरातील पारंपरिक धार्मिक कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यात येत आहेत. श्रीरामनवमी निमित्त नवमी दिवशी हभप श्रीकांत महाराज पातकर (देहूकर फड - बिद्रीकर मंडळी) यांचे कीर्तन संपन्न झाले. द्वादशीला हभप आजरेकर महाराज यांचा नैवेद्य तर त्रयोदशीला हभप गुरु बाबासाहेब आजरेकर महाराज



यांचे कीर्तन होणार आहे. एकादशीच्या पहाटे श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेची नित्यपूजा अनुक्रमे सदस्य हभप प्रकाश जवंजाळ व सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न होणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेची रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह तैनात राहणार असून सिझफायर यंत्रणा, १५७ सीसीटीव्ही कॅमेरे, नियंत्रण कक्ष, वायरलेस प्रणाली, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, बॅग स्कॅनर मशीन, सार्वजनिक सूचना प्रणाली व चौकशी कक्ष कार्यरत ठेवण्यात आले आहेत. तसेच भाविकांसाठी अपघात विमा संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य सेवांसाठी पत्राशेड परिसरात तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष सुरू करण्यात आला असून उपजिल्हा रुग्णालयामार्फत दर्शन मंडप येथे आयसीयू सुविधा उपलब्ध ठेवण्यात आले आहे. वैष्णव चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्या सहकार्याने मोफत वैद्यकीय सेवा दिली जात असून दोन अद्ययावत रुग्णवाहिका वैद्यकीय पथकासह सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. स्वच्छतेसाठी मंदिर परिसर, दर्शनमंडप व तुकाराम भवन येथील कामे मंदिर कर्मचाऱ्यांमार्फत तर नगरप्रदक्षिणा मार्ग व दर्शनरांग परिसरातील स्वच्छता आउटसोर्सिंग पद्धतीने केली जात आहे. या उपक्रमात स्वकाम सेवा आळंदी व संत ज्ञानेश्वर सेवा मंडळ आळंदी या संस्थांचे सहकार्य लाभत आहे.

अन्नछत्रामध्ये दररोज दुपारी १२ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत अन्नदान सुरू राहणार आहे. तसेच दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी दर्शनरांगेतील भाविकांना लिंबू सरबत तसेच तांदूळ किंवा साबुदाणा खिचडी/उपीटचे वाटप करण्यात येत आहे. येथे बसण्याची व्यवस्था, मॅट, थंड पिण्याचे पाणी, तात्पुरते उड्डाणपूल, शौचालये, विश्रांती कक्ष व इतर अनुषंगीक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन कुलर व पंखे बसविण्यात आले आहेत. दर्शन प्रक्रिया गतिमान ठेवण्यासाठी अनुभवी कमांडोंची नियुक्ती करण्यात आली असून व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घालण्यात आले आहेत. भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजांची संख्या मर्यादित करून दर्शनाची वेळ सकाळी ६.०० ते रात्री १२.०० अशी वाढविण्यात आली आहे.

सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना अधिकाधिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य आमदार रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ॲड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, प्रणिताताई भालके, व्यवस्थापक संदेश भोसले, लेखाधिकारी मुकेश अनेचा व सर्व विभाग प्रमुख परिश्रम घेत असून, १२०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

#### १६०० भाविकांची निवास व्यवस्था

महिला भाविकांसाठी हिरकणी कक्ष व सॅनिटरी नॅपकिन सुविधा उपलब्ध असून श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू पुरेशा प्रमाणात उपलब्धक करून देण्यात येत आहेत. वेदांता, व्हिडिओकॉन व श्री विठ्ठल-रूक्मिणी भक्तनिवास येथे ३६१ खोल्यांमध्ये १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

# वैरागमध्ये द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा संवाद मेळावा

### माजी आ.राजाभाऊ राऊत यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. २८ मार्च-**

बार्शी तालुक्यातील द्राक्ष बागायतदारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि आधुनिक शेतीचे मार्गदर्शन करण्यासाठी वैराग येथे द्राक्ष उत्पादक शेतकरी संवाद मेळावा पार पडला. माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मेळाव्यात तालुक्यातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.



याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, बाजार समिती सभापती विजय गरड, पंचायत समिती उपसभापती संतोष निंबाळकर उपस्थित होते. यावेळी शिवाजी गायकवाड, दिलीप गांधी, झुंबर जाधव, अनिल डिसले, नगरसेवक वैजीनाथ आदमाने, संजय भड, रामेश्वर पाटील, यशवंत माने, चेतन काशिद, तुकाराम मोरे, फुलचंद पालखे, संजय आवारे, संतोष पाटील, डॉ. भारत पंके, भरतेश गांधी, लालासाहेब गव्हाणे, अशोक देशमुख, बापुसाहेब घोरपडे, अरुण सावंत, दिपक रोंगे, संदीप मिरगणे, किरण कांदे, पंकज पिसाळ, संचालक अभिजित कापसे, महेश बोधले, सचिव तुकाराम जगदाळे, आशिष काळे, प्रकाश पाटील, प्रवीण गायकवाड, श्रीमंत थोरात उपस्थित होते. कमी खर्चात अधिक आणि दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी छाटणी, पेस्टिंग, डिपिंग आणि घड व्यवस्थापनाचे अद्ययावत तंत्र. प्रतिकूल हवामान, ढगाळ वातावरण आणि वारंवार होणाऱ्या अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय. द्राक्ष प्रक्रिया उद्योग, बेदाणा निर्मिती आणि 'कोल्ड स्टोरेज'ची उपलब्धता यांवर भर देण्यात आला, जेणेकरून शेतकऱ्यांना बाजारपेठेत योग्य भाव मिळेल. यावर चर्चा करण्यात आली.

# महापालिका कामगार-कर्मचाऱ्यांनी कॅशलेस उपचारासाठी अंदाजपत्रकात तरतूद करा

### महापालिका कामगार क्रांती युनियनची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महापालिका कामगारांच्या थकित रकमा देणे आणि कॅशलेस उपचारासाठी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यात यावी, अशी मागणी म हापालिका कामगार क्रांती युनियन यांच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल, आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्याकडे कामगार नेते अशोक जानराव यांनी केली आहे.

पालिकेतील कामगार-कर्मचाऱ्यांचा ५ वा, ६ वा आणि ७ व्या वेतनश्रेणीतील फरकाची रक्कम तसेच वेळोवेळी जाहीर झालेला महागाई भत्ता लागू करून फरकाची रक्कम आणि इतर मिळून सुमारे २५० कोटी कामगारांची थकीत रक्कम देणे आहे. ही रक्कम कामगारांना देण्यासाठी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात तरतूद करून नियोजन करावे. पेन्शनरांसह सर्व कामगारांना नियमित थकबाकीची रक्कम वाटप करण्याचे नियोजन करावे असेही दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने जाहीर केलेला तीन टक्के महागाई भत्ता कामगारांना त्याच्या फरकाचे रक्कम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपूर्वी देण्याची घोषणा व्हावी.

लाड-पागे समितीच्या अहवालानुसार ज्या सफाई कामगारांची सेवा सलग १५ वर्षे झाली आहे, अशा सफाई कामगारांना मोफत घरे बांधून देण्याची योजना आहे.सन २०२६-२७ च्या बजेटमध्ये खास रकमेची व जागेची तरतूद करून सफाई कामगारांना मोफत घरे बांधून द्यावीत. महसूली उत्पन्नाच्या पाच टक्के रक्कम मागास विकास कल्याण निधीची तरतूद करावी, अशी मागणीही जानराव आणि पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने केली आहे.

# बार्शीत प्रतिसाद फाउंडेशनची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ मार्च-**

वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करत असताना सामाजिक कर्तव्याचे भान ठेवून बार्शीमध्ये प्रतिसाद फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे.





या अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांकरता विविध उपक्रम, समाज उपयोगी कार्य, महिलांसाठी विविध स्पर्धा तसेच मुलांना करिअर मार्गदर्शन असे विविध उपक्रम भविष्यात राबवले जाणार आहेत.सध्याचे बदलते सामाजिक स्वरुप पाहता वेळोवेळी समाज प्रबोधन पर उपक्रम राबवणार असल्याचे माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. देविदास इंगळे यांनी दिली.

फाउंडेशनचे अध्यक्ष म्हणून डॉ. देविदास इंगळे, उपाध्यक्ष डॉ. पवन कोळी, सचिव डॉ. विनायक हगरे, सहसचिव डॉ. प्रीतम इंगळे तसेच डॉ. कल्याणी इंगळे, डॉ. क्रांती कोळी डॉ, प्रियंका इंगळे, डॉ. दिपाली हगरे हे संघटनेचे सदस्य असणार आहेत.



# मोडनिंबमध्ये रेल्वे गाड्यांना थांबा

## वेताळ परिवाराचे आंदोलन तात्पुरते स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २८ मार्च-**

माढा तालुक्यातील मोडनिंब येथे ग्रामदैवत श्री वेताळ परिवाराकडून रेल्वे स्थानकावर पुणे, मुंबई, शिर्डी, कुलबुर्गी, मैसूर तसेच कोल्हापूर व सातारा येथे जाणाऱ्या गाड्यांना थांबा देण्यात यावा, तसेच श्री उमा विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ये-जा सुविधेसाठी भुयारी मार्ग उभारण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी शुक्रवारी ग्रामदैवत श्री वेताळ परिवार मोडनिंबच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा देत मोडनिंव रेल्वे स्थानकावर धाव घेतली.

मात्र, रेल्वे पोलिसांनी त्यांना स्थानकाच्या प्रवेशद्वारावरच अडवून आंदोलन करण्यास मज्जाव केला.यानंतर ग्रामदैवत श्री वेताळ परिवाराचे पदाधिकारी व रेल्वे अधिकारी यांच्यात सुमारे दहा ते पंधरा मिनिटे चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, संबंधित मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवाल पाठविण्याचे आश्वासन रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आले. पुणे, मुंबई, शिर्डी, कुलबुर्गी, मैसूर, कोल्हापूर व सातारा मार्गावरील गाड्यांना थांबा देणे, विद्यार्थ्यांसाठी भूयारी मार्ग उभारणे आदी मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, असेही सांगण्यात आले. या आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी रेल्वे रोको आंदोलन तात्पुरते मागे घेतले. तथापि, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास कोणत्याही क्षणी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामदैवत श्री वेताळ परिवाराने रेल्वे प्रशासनाला दिला असून, हीअंतिम नोटीस समजावी, असेही स्पष्ट करण्यात आले. या आंदोलनात ग्रामदैवत श्री वेताळ परिवाराचे प्रमुख प्रकाश गिड्डे, हनुमंत कुंभार, अनिल शिंदे, ऋषिकेश कोठावळे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, सुभाष वेदपाठक, माजी सरपंच बाबुराव सुर्वे, शंकर कोठावळे, सुरेश जाडकर, दत्ता जाडकर, राजकुमार खडके, महादेव थिटे, जयवंत ओहोळ, सावता माळी, दत्तात्रय जाडकर तर रेल्वे विभागाकडून सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक ए. के यादव, विभागीय सुरक्षा आयुक्त दिनेश कनोजिया, सहाय्यक पोलीसा निरीक्षक अरविंद कुमरे उपस्थित होते.

# घोषणांचा गाजावाजा की कामाचा लेखाजोखा; आता खरी अग्नीपरीक्षा

सोलापूर जिल्हा परिषदेच्या सभापती निवडीने जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा रंगत आणली. निवड प्रक्रिया संपली, नावे जाहीर झाली आणि लगेचच कोण खुश, झालं तर कोण नाराज याची चर्चा रंगू लागली. एकीकडे नवीन चेहऱ्यांना संधी मिळाल्याचं समाधान, तर दुसरीकडे अपेक्षित खातं न मिळाल्याची हलकीशी खंत-असं सगळंच चित्र या निवडीत पाहायला मिळालं.

यशवंतराव सभागृहात झालेली ही निवड प्रक्रिया म्हणजे जणू छोटेखानी राजकीय रंगभूमीच होती. अर्ज दाखल करतानापासूनच सगळ्यांची नजर कोणाला कोणतं खातं? यावर होती. संस्कृती सातपुते, अमृता वाघे, रामाप्पा चिवडशेट्टी आणि चेतनसिंह केदार-सावंत या चौघांच्या नावाभोवतीच चर्चेचा केंद्रबिंदू फिरत होता.निवड जाहीर झाली आणि चित्र स्पष्ट झालं. समाजकल्याण समि ती सातपुते यांच्या ताब्यात गेली, महिला व बालकल्याण समिती अमृता वाघे यांच्याकडे, कृषी व पशुसंवर्धन चिवडशेट्टी यांच्याकडे, तर आरोग्य व शिक्षणसारखं वजनदार खातं केदार-सावंत यांच्या पदरात पडलं.

पण खरी चर्चा झाली ती केदार-सावंत यांच्या बाबतीत. अर्ज दाखल करताना ते थोडे नाराजच दिसत होते. सतत फोनवर बोलणं, इकडून तिकडे फिरणं सगळ्यांच्याच नजरा त्यांच्यावर खिळल्या होत्या. काय चाललंय? असा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होता. शेवटी त्यांनी अपेक्षित असलेलं खातं मिळवलंच आणि त्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू सगळ्यांना दिसलं.दुसरीकडे राम ाप्पा चिवडशेट्टी यांना मात्र थोडं समाधान मानावं लागल्याची चर्चा रंगली. त्यांना नेमकं काय हवं होतं, यावर राजकीय वर्तुळात कुजबुज सुरूच आहे. मात्र त्यांनीही आपल्याकडे आलेल्या जबाबदारीला न्याय देण्याचा निर्धार दाखवला आहे.

या सगळ्या राजकीय घडामोडींमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे यांची एंट्रीही तितकीच महत्त्वाची ठरली. त्यांनी नूतन सभापतींना थेट संदेश दिला-जिल्हा परिषद म्हणजे मिनी मंत्रालय आहे. ते आता तुमच्या हातात आहे. त्यामुळे पदाची गरिमा राखा आणि काम करा. हा सल्ला म्हणजे एक प्रकारे जबाबदारीची जाणीव करून देणारा कानमंत्रच होता.गोरे यांनी स्पष्ट केलं की, निधीची कमतरता भासू देणार नाही, पण कामात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा अपेक्षित आहे. त्यामुळे आता या नव्या टीमसमोर खऱ्या अर्थाने कसोटीची वेळ आहे. नवीन सभापतींनी पदभार स्वीकारताच मोठमोठ्या घोषणा केल्या पारदर्शक कारभार करू, लोकाभिमुख निर्णय घेऊ, विकासाला गती देऊ ऐकायला सगळं भारी! पण जिल्ह्याच्या राजकारणात एक गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे-घोषणा करायला सोपं, पण त्या जमिनीवर उतरवणं तितकंच कठीण. आता खरी परीक्षा इथूनच सुरू होते. कारण वास्तव वेगळंच आहे. आजही अनेक गावांमध्ये रस्ते खड्डेमय आहेत, पाण्याचा प्रश्न कायम आहे, आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर नाहीत, शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे. म्हणजेच, कागदावर विकास वेगाने धावत असला तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी गाडी अजूनही अडकलेलीच दिसते.

म्हणूनच या नव्या टीमसमोर सगळ्यात मोठं आव्हान आहे. बोलणं कमी, काम जास्त! राजकारणात घोषणांचा पाऊस पडतो, पण जनतेला हवाय तो ठोस परिणाम. गावात पाणी आलं, रस्ता झाला, दवाखाना चालू झाला, शाळेत विद्यार्थी आणि शिक्षक आले. हीच खरी लोकाभिमुख

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

कामगिरी ठरते. पारदर्शक कारभाराची घोषणा देखील तितकीच महत्त्वाची आहे. कारण जिल्हा परिषद म्हणजे मिनी मंत्रालय असं म्हटलं जातं. इथूनच मोठमोठे निर्णय होतात, निधी वाटप होतं. त्यामुळे निधी कुठे जातो, कसा वापरला जातो, यावर जनतेचं बारकाईने लक्ष असतं. जर इथेच पारदर्शकता नसेल, तर मग जनतेचा विश्वास कसा टिकणार?

लोकाभिमुख निर्णय म्हणजे फक्त सभा-मेळावे नव्हेत, तर गावागावात जाऊन लोकांच्या अडचणी समजून घेणं. कधी शेतकऱ्याच्या बांधावर, कधी अंगणवाडीत, कधी शाळेत-तिथे जाऊन समस्या सोडवणं हीच खरी राजकारणाची कसोटी आहे. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे. जनता आता खूप जागरूक झाली आहे. सोशल मीडियाच्या युगात कोण काम करतंय आणि कोण फक्त बोलतंय, हे लगेच समोर येतं. त्यामुळे जाहिरातबाजी चालणार नाही, परफॉर्मन्स दाखवावा लागणार आहे. नवीन सभापतींनी घेतलेल्या घोषणा चांगल्या आहेत, अपेक्षाही मोठ्या आहेत. पण आता त्या घोषणांना कृतीची जोड देणं गरजेचं आहे. एकंदरीत, सोलापूर जिल्हा परिषदेत नवी मांडणी झाली आहे. काही जणांनी आपली ताकद दाखवली, काहींना तडजोड करावी लागली, तर काहींनी योग्य वेळी योग्य खेळी केली. आता पुढचा खेळ विकासाचा असणार आहे. जनतेची अपेक्षा एकचराजकारण कमी, काम जास्त!आता पाहायचं, ही नवी टीम त्या अपेक्षांवर कितपत खरी उतरते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# चंद्रभागा नदीचे पाणी बनले दुषित; भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ मार्च-**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागा नदीचे पाणी दुषित बनले असून भाविकांच्या दृष्टीने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे दिसून येत आहे. रविवार, २९ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या चैत्री एकादशी सोहळ्याला पंढरीत लाखो भाविक दाखल झाले आहेत. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मात्र चंद्रभागेत स्नान करताना गढूळ, शेवाळ मिश्रीत पाण्याकडे डोळेझाक किंवा दुर्लक्ष करुनच पवित्र चंद्रभागेच्या स्नानाची पर्वणी लुटावी लागत आहे.

पंढरपूर येथे आलेला भाविक हा प्रथमतः चंद्रभागा स्नान करण्यास प्राधान्य देतो, चंद्रभागा स्नान झाल्याशिवाय श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले जात नाही. त्यामुळे चंद्रभागा स्नानाला भाविकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. परंतु, चैत्री यात्रेतील एकादशी अवघ्या एका दिवसावर येऊनही प्रशासनाने अद्याप स्वच्छ पाणी नदीपात्रात सोडले नाही. त्यामुळे साचलेल्या गढूळ पाण्यातच भाविकांना चंद्रभागेच्या पवित्र स्नान उरकावे लागत असल्याचे सांगण्यात आले.

चंद्रभागेतील पाणी पातळी दोन फुटावर आली आहे. त्यामुळे नदीपात्रातील चिंध्या, फाटके कपडे, निर्माल्याचे थर साचले आहेत. स्वच्छता करण्यात येत नसल्याने साचलेल्या पाण्यात शेवाळ, किडे तयार झाल्याचेही दिसून येत आहे. यातच हिरव्यागार शेवाळाने नदीपात्रातील पाणी व्यापले आहे.

### सेबर टेक्नॉलॉजी निरुपयोगी; बॅक्टेरिया मारण्याचे काम

चंद्रभागा नदीपात्रातील पाणी शुध्द रहावे, यात्रेला आलेल्या भाविकांना स्वच्छ पाण्यात स्नान करता यावे, यासाठी शासनाकडून सेबर टेक्नॉलॉजीचा वापर करुन पाणी शुध्द केले जात आहे. यासाठी नदीपात्रात ४ ठिकाणी यंत्रे बसवण्यात आली आहेत. या शुध्दीकरण प्रकल्पातून घातक बॅक्टेरिया मारण्याचे काम केले जात आहे. याकरिता ३० कोटींचा खर्च करण्यात आलेला आहे. दररोज १५ एमएलडी पाणी शुध्द करुन पुन्हा चंद्रभागेत सोडले जात आहे. मात्र, या सेबर टेक्नॉलॉजीचा फारसा परिणाम जाणवत नसल्याचे दिसून येत आहे.

### शेवाळयुक्त पाण्यामुळे नदीपात्रात दुर्गंधी

शेवाळयुक्त पाण्यामुळे नदीपात्रात दुर्गंधी पसरली आहे. भाविकांची गर्दी असणारे पुंडलिक मंदिराला देखील शेवाळ, फाटके कपडे तसेच चिंध्या आणि निर्माल्याने वेढा दिलेला आहे. हे दुर्गंधीयुक्त चित्र पाहुन भाविकांना स्नान करावेसे वाटत नाही. तरी देखील या सर्व गोष्टींकडे डोळेझाक किंवा दुर्लक्ष करुन भाविक चंद्रभागेचे पवित्र स्नान उरकताना दिसत आहेत.



# मनपाच्या अंदाजपत्रकीय चर्चेत परिवहन, शिक्षण, युसीडी विभागाकडील विविध मुद्दे ऐरणीवर

- चेसी क्रॅक प्रकरणात तत्कालीन आयुक्तांवर कारवाई करा
- हद्दवाढीतील जि.प. शाळा मनपाकडे वर्ग करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रक चर्चेच्या पाचव्या दिवशी परिवहन, युसीडी व शिक्षण विभागाच्या तरतुदींचा आढावा घेताना अनेक गंभीर मुद्दे ऐरणीवर आले. आकृतिबंधातील मंजूर पदे आणि प्रत्यक्ष कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या यामध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आल्याने सभागृहात जोरदार चर्चा झाली.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी झोननिहाय नियुक्त कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती संबंधित झोनमधील नगरसेवकांना लेखी स्वरुपात देण्याचे निर्देश विभाग प्रमुखांना दिले. परिवहन विभागाच्या विषयावर चर्चा करताना सत्ताधारी नगरसेवक आक्रमक झाले. चेसी क्रॅक प्रकरणात दोषी कोण? याबाबत जाब विचारण्यात आला.

पूर्वीच २६ कोटींचा दंड भरला असता तर आता दुप्पट दंड भरावा लागला नसता, असे मत नगरसेवक राजू पाटील यांनी व्यक्त केले. या प्रकरणामुळे शहराची प्रतिमा मलिन झाली आहे, असे नगरसेवक अनंत जाधव यांनी सांगितले. नगरसेवकद्वय संजय कोळी, शिवाजी वाघमोडे, दीपक जमादार, रवी कय्यावाले यांनी तत्कालीन आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्यासाठी प्रशासकीय प्रस्ताव मांडण्याच्या सूचना दिल्या.

सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना अधिकारी तपन



डंके यांची मात्र कोंडी झाली. पीएम ई-बस योजनेअंतर्गत येणाऱ्या नवीन बससंदर्भातही सभागृहात चर्चा झाली. दरम्यान, शिक्षण विभागाच्या चर्चेदरम्यान मनपा शाळांमधील विद्यार्थी पटावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. नगरसेविका रोहिणी तडवळकर व संगीता जाधव यांनी विद्यार्थी पट वाढवण्यासाठी विविध सूचना मांडल्या. नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी प्रभाग क्र. २३ मधील शैक्षणिक परिस्थितीकडे लक्ष वेधले. या प्रभागात मोठ्या प्रमाणावर इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळा असून, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात डोनेशन आकारले जात असल्याने सर्वसामान्य कुटुंबांना ते परवडत नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे गुणवत्तापूर्ण व परवडणाऱ्या शिक्षणासाठी शासकीय स्तरावर आधुनिक शाळांची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# तडीपार आरोपीला राहत्या घरासमोरुन घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२८ मार्च-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हेगारीवर वचक निर्माण करण्यासाठी पोलिसांचे गस्त पथक सक्रिय असताना, एका तडीपार आरोपीला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे.

अखिल इब्राहिम सय्यद (रा. सुभाषनगर, बार्शी) असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्यावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २७ मार्च रोजी, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या आदेशानुसार पोलीस पथक शहरात पेट्रोलिंग करत होते. या पथकामध्ये पोलीस कॉन्स्टेबल प्रल्हाद अकुलवार, अजिज शेख आणि राहुल उदार यांचा समावेश होता.पेट्रोलिंग दरम्यान, एका गोपनीय बातमीदाराकडून पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, बार्शी शहरातून



तडीपार करण्यात आलेला इसम अखिल इब्राहिम सय्यद हा सध्या सुभाषनगर येथील त्याच्या राहत्या घरासमोर फिरत आहे. मिळालेल्या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलीस पथकाने तात्काळ सुभाष नगर परिसरात धाव घेतली. यावेळी अखिल सय्यद हा आपल्या घरासमोरच मिळून आला. तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करुन शहरात विनापरवाना प्रवेश केल्याप्रकरणी पोलिसांनी त्याला जागीच ताब्यात घेतले.

सदर आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल (बकल नंबर ५९५) बहिरे हे करत आहेत.

# शिष्यवृत्ती योजनांसाठी १ कोटींचा खर्च; ३० लाख रुपयांचा निधी शिल्लक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

जिल्हा परिषद सोलापूरच्या समाजकल्याण विभागाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत विविध शैक्षणिक योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च केल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूण २ कोटी ७० लाखांची तरतूद असताना आतापर्यंत १ कोटी ७० हजार ८०० रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. मात्र अद्याप सुमारे २९ लाख ९४ हजार २०० रुपये निधी शिल्लक असल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे.

विशेषतः मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेवर भर देण्यात आला आहे. इयत्ता ५ वी ते ७ वीमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी आतापर्यंत २३ लाख ७१ हजार ८०० रुपये खर्च झाले असून हजारो विद्यार्थिनींना या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्याचप्रमाणे इयत्ता ८ वी ते १० वीच्या मुलींसाठी १ कोटी ५० लाखांपैकी ४९ लाख ८८ हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत. माध्यमिक शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेतून १० लाख ६८ हजार ५०० रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क भरण्यासाठी ६ लाख ६० हजार ४०० रुपयांची मदत देण्यात आली आहे. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी देखील विशेष शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून, या अंतर्गत ४ लाख ८३ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.

### पात्र विद्यार्थ्यांपर्यंत निधी पोहोचण्याची गरज

विविध योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च झाला असला तरी अजूनही जवळपास ३० लाख रुपयांची तरतूद खर्चाविना शिल्लक आहे. हा निधी योग्य नियोजन करून अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त होत आहे.

### आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना आधार

समाजकल्याण विभागाच्या या योजनांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठा आधार मिळत आहे. मात्र शिल्लक निधीचा प्रभावी वापर करून अधिक लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळवून देणे हीच सध्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

| चालू आर्थिक वर्षाची आकडेवारी | |
|---|---|
| एकूण तरतूद | २ कोटी ७० लाख रुपये |
| एकूण खर्च | १,००,७०,८०० रुपये |
| शिल्लक निधी | २९,९४,२०० रुपये |



बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या

# उपबाजार आवारात १००० मे.टन क्षमतेचा कोल्ड स्टोअरेजची उभारणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ मार्च-**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने वैराग उपबाजार येथे उभारलेले १००० मे.टन क्षमतेचे अत्याधुनिक कोल्ड स्टोअरेज सज्ज झाले असून शेतकऱ्यांनी आपला माल कमी भावात विकण्याऐवजी किंवा फेकून देण्याऐवजी या कोल्ड स्टोरेजमध्ये साठवून ठेवावा व आपले नुकसान टाळावे, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळावा हा उद्देश आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने उभारलेले हे कोल्ड स्टोअरेज वैराग व परिसरातील शेती अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरणार आहे. वैराग येथील या कोल्ड स्टोअरेजची माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी पाहणी केली. यावेळी अध्यक्ष दीपक वैद्य, बाजार समिती सभापती विजय गरड, पंचायत समिती उपसभापती संतोष निंबाळकर, शिवाजी गायकवाड, दिलीप गांधी, झुंबर जाधव, अनिल डिसले, नगरसेवक वैजीनाथ आदमाने, डॉ.देवेंद्र डोके, संजय माळी, रामेश्वर पाटील, यशवंत माने, चेतन काशिद, तुकाराम मोरे, फुलचंद पालखे, बाजार समितीचे सचिव तुकाराम जगदाळे उपस्थित होते.

# व्यापाऱ्याच्या गाडीतून ४८ हजारांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ मार्च-**

करगणी, ता.आटपाडी, जि.सांगली येथील व्यापाऱ्याच्या गाडीतून ४८ हजार ५०० रुपये चोरीला गेल्याची घटना जुनोनी, ता.सांगोला येथे घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, तेजस चंद्रकांत यवगे (वय-२२), व्यवसाय-व्यापार, रा. करगणी, ता.आटपाडी, जि.सांगली यांच्याकडे बिस्किटाची एजन्सी असून गुरुवार दि.२६ मार्च रोजी रात्री साडेनऊ ते दहाच्या दरम्यान



जुनोनी ब्रिज खाली असलेली आरमान बेकरी येथे बिस्किट दिल्यानंतर ते त्यांच्या ब्रिजा गाडी जवळ आले असता गाडीत पाठीमागील बाजुस ठेवलेल्या ४८ हजार ५०० रुपये रोख रक्कम असलेली काळया रंगाची सॅग कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याबाबत तेजस यवगे यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोहेकॉ.भरमशेट्टी करत आहेत.



# मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाच्या अध्यक्षपदी शरणराज केंगनाळकर

- कार्याध्यक्षपदी विजय कुलथे : महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाच्या अध्यक्षपदी शरणराज केंगनाळकर तर कार्याध्यक्षपदी विजय कुलथे यांची निवड करण्यात आली. महामंडळाची बैठक शनिवारी सायंकाळी वीरशैव भवन कार्यालय येथे झाली.

प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील, सचिव बसवराज सावळगी, उपाध्यक्ष केदार वनारोटे, खजिनदार अनिल परमशेट्टी, ट्रस्टी रेवणसिद्ध आवजे, गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, सुदीप चाकोते, सिद्धेश थोबडे, माजी अध्यक्ष राजाभाऊ आलुरे,सचिन शिवशक्ती, आनंद मुस्तारे, प्रिया बसवंती, विजयकुमार बमगुंडे, प्राचार्य विद्यानंद स्वामी, नितीन कुलकर्णी, बसवराज बगले, गौरव जक्कापुरे, मनोज कलशेट्टी, गिरीश मंद्रूपकर, राम वाकसे यांची प्रमुख उपस्थिती होती. महामंडळाचे नूतन अध्यक्ष शरणराज केंगनाळकर म्हणाले, जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती सोलापुरात मोठ्या प्रमाणावर व्हावी याकरिता महामंडळाकडून यंदा अधिक जोमाने प्रयत्न करण्यात येणार आहेत.

या जयंती उत्सवात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असून सोलापूरकरांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही नूतन अध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांनी याप्रसंगी केले. नूतन कार्याध्यक्ष विजय कुलथे म्हणाले, महात्मा बसवेश्वर महाराजांचा विचार समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महामंडळाकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीची वेळ रात्री १२ पर्यंत वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही नूतन कार्याध्यक्ष विजय कुलथे यांनी सांगितले. ट्रस्टी अध्यक्ष जगदीश पाटील यांनी प्रास्ताविक तर आनंद मुस्तारे यांनी आभार प्रदर्शन केले.

# सोलापुरातील औद्योगिक वसाहतींसाठी ५६ कोटी निधी मंजूर

- मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विशेष निर्णयामुळे सोलापूरकरांना लाभ
- होटगी रोड, अक्कलकोट रोड एमआयडीसी ४४ रस्त्यांचे डांबरीकरण
- आ. देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्याला यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

राज्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी राज्य शासनाने सोलापूरमधील औद्योगिक पायाभूत सुविधांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहत आणि होटगी रोडवरील सोलापूर सहकारी औद्योगिक वसाहतीतील एकूण ४४ रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी तब्बल रु. ५५.९४ कोटींच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती आ. देवेंद्र कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती व विकास योजना अंतर्गत देण्यात ही मंजुरी देण्यात आली आहे. या निधीमुळे सोलापूरच्या औद्योगिक परिसरातील वाहतूक व्यवस्था आणि लॉजिस्टिक साखळी अधिक सक्षम होणार आहे. दि.१३ मार्च २०२६ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या १३ व्या उच्चस्तरीय समिती बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सोलापूर महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देत निधी उपलब्ध करून देण्यास हिरवा कंदील देण्यात आला. या संदर्भातील शासन निर्णय दि. २८ मार्च २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

ही मंजुरी महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा निर्मिती व विकास योजना अंतर्गत देण्यात आली असून, यामुळे सोलापूरमधील औद्योगिक वसाहतींतील रस्ते सुविधा मोठ्या प्रमाणात सुधारतील. परिणामी उद्योगांच्या वाहतुकीत सुलभता येऊन गुंतवणूक व रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे, असे आ. कोठे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच केवळ सोलापूर साठी हा ऐतिहासिक आणि विशेष निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापुरातील उद्योजकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. सोलापुरातील दोन एमआयडीसी मध्ये अनेक वर्षापासून मूलभूत सोयी सुविधांचा अभाव होता मागील वर्षी आगीची दुर्दैवी घटना ही घडली होती. यामुळे या मतदारसंघातील आमदार म्हणून मी शहरातील दोन्ही एमआयडीसीतील रस्ते आणि सोयी सुविधांसाठी निधी मिळण्याची विनंती मुख्यमंत्र्यांकडे केली होती. तांत्रिक अडचणी दूर करत मुख्यमंत्र्यांनी विशेष बाब म्हणून हा शासन निर्णय मंजूर केला आहे असे सांगत आ.कोठे यांनी मुख्यमंत्र्यांसह संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांचे आभार मानले.

या पत्रकार परिषदेस महापौर विनायक कोंड्याल, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, नगरसेवक विजय चिप्पा, सिद्धेश्वर कमटम, श्रीनिवास दायमा, सारिका खजूरगी, शैलेश कडदास आदी उपस्थित होते.

### कोणत्या कामांसाठी किती निधी ?

- अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहत
३५ रस्त्यांचे डांबरीकरण - **खर्च: ५०.२२ कोटी रुपये**
- होटगी रोड औद्योगिक वसाहत (सोलापूर सहकारी औद्योगिक वसाहत)- ९ रस्त्यांचे डांबरीकरण -
**एकूण खर्च: ५५.९४ कोटी रुपये**

### निधी वाटपाची रचना अशी

- राज्य शासन : ७५ टक्के - **४१.९५ कोटी रुपये**
- जिल्हा नियोजन : १२.५ टक्के - **६.९९ कोटी रुपये**
- महानगरपालिका : १२.५ टक्के - **६.९९ कोटी रुपये**

### महापालिकेकडे राहणार कामाची जबाबदारी

या प्रकल्पाची अंमलबजावणी सोलापूर महानगरपालिका करणार असून, सर्व कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी महापालिकेवर राहणार आहे. भविष्यातील रस्ते देखभाल व दुरुस्तीची जबाबदारीही महापालिकेलाच पार पाडावी लागणार आहे. तसेच, प्रकल्प खर्चात वाढ झाल्यास अतिरिक्त आर्थिक भार देखील महापालिकेलाच उचलावा लागणार आहे.

### औद्योगिक विकासाला चालना

या प्रकल्पामुळे औद्योगिक वसाहतींमधील रस्ते सुविधा सुधारल्याने उद्योगांना वाहतूक, कच्चा माल पुरवठा आणि उत्पादन वितरण अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, सोलापूरमध्ये गुंतवणूक वाढ, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पायाभूत सुविधा महत्त्वाची : आ. देवेंद्र कोठे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर च्या विकासासाठी भरभरून दिले आहे. आता सोलापुरातील दोन्ही एमआयडीसीसाठी मोठा निधी उपलब्ध केला आहे. विशेष बाब म्हणून हा शासन आदेश काढला आहे.या निधी मंजुरीमुळे सोलापूरच्या औद्योगिक क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार असून, उद्योगांना मोठा दिलासा मिळेल.

### उद्योग वाढीला चालना मिळेल : महापौर कोंड्याल

सोलापूर शहरातील एमआयडीसीमध्ये सुमारे ४० हजार कामगार काम करतात. ३०० एकर क्षेत्रात ही एमआयडीसी वसली आहे. याठिकाणी रस्त्यांसह विविध सोयीसुविधा कराव्यात, अशी मागणी उद्योजक, कामगार, नागरिकांची होती. आ.देवेंद्र कोठे यांनी यशस्वी पाठपुरावा केला. आमदार कोठे हे जे बोलतात ते काम तडीस नेतातच. एका वर्षात त्यांनी एमआयडीसींसाठी भरघोस निधी आणला, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# उजनी ५० टक्क्यांवर; भविष्यात पाणी संकटाचा धोका!

## ● १ जानेवारीला धरणात होता १०० टक्के साठा, तीन महिन्यात धरणातील निम्मा पाणीसाठा घटला

## ● यंदा पाऊसमान कमीचे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केले होते सुतोवा, पाणीसाठा जपून वापरणेच हिताचे

**सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणामुळे सोलापूर जिल्हा सुजलाम सुफलाम बनला आहे. शेती, कारखानदारीसह विविध मार्गातून एका उजनी धरणावर सोलापूर जिल्ह्याची वार्षिक आर्थिक उलाढाल सुमारे दोन हजार कोटींच्या आसपास आहे. दहा वर्षात उजनी धरन सरासरी सात वर्षे क्षमतेने भरते असे मानक आहे. गेल्या अनेक वर्षात पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यात होणाऱ्या मोठ्या पावसामुळे उजनी धरण सलग शंभर टक्के भरते आहे. गतवर्षी देखील उजनी धरण शंभर टक्क्यांपेक्षा अधीक क्षमतेने भरले होते. विशेष म्हणजे १ जानेवारी २०२६ रोजी देखील उजनी धरणातील पाणीसाठा शंभर टक्के होता. मार्च महिना संपण्यापूर्वीच म्हणजे अवघ्या तीन महिन्यात धरणातील पाणीसाठा ५० टक्क्यांनी घटला आहे. धरणात सध्यस्थितीला ४९.८२ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. धरणातील पाणीसाठ्याची एकूण क्षमता १२३ टीएमसी इतकी असून यात उपयुक्त पाणीसाठा केवळ ५३ टक्के इतकाच आहे. तीन महिन्यात धरणातील ५० टक्के पाणी संपले आहे. वास्तविक पाहता धरणातील पाणीसाठा सरकार, शासन, जिल्हा प्रशासन, इरिगेशन आदींनी जपून वापरणे अपेक्षित असते. यंदा पाऊसमान कमी असल्याचा अंदाज असल्याचे सूतोवा राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केले असल्याने उजनी धरणातील उर्वरित ५० टक्के पाणीसाठा तरी जपून वापरावा, अन्यथा पाऊस कमी पडल्यास सोलापूरवर पाणीसंकट ओढावणार आहे.**




सोलापूर जिल्ह्यातील शेती आणि उद्योग तर उजनी धरणातील पाण्यावर अवलंबून आहेतच पण सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील सुमारे ५० लाख लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी पूर्णतः धरणातील पाण्यावर अवलंबून असते. माणसे, पशुपक्षी यांची तहान भागविणाऱ्या उजनी धरणातील पाणीसाठा जपून वापरण्याची जबाबदारी शासन-प्रशासनाची जशी आहे, तशी शहर व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी देखील धरणातील पाणीसाठ्याचा गैरवापर होणार नाही याच्यावर लक्ष ठेवण्याची मोठी गरज आहे.

सोलापूर शहरातील बारा लाख लोकांना उजनी धरणातून पिण्याचे पाणी दिले जाते. उजनी-सोलापूर यशवंत जलवाहिनीद्वारे शहरासाठी धरणातून चोवीस तास पाणीपुरवठा सुरु असतो. आता नव्याने उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी झालेली आहे. दरम्यान भीमा नदीद्वारे सोलापूर शहरासाठी वर्षातून पाच ते सहा आवर्तने धरणातून सोडली जातात. आता आगामी एप्रिल आणि मे महिन्यात तर शहर व जिल्ह्यासाठी पाणी सोडावेच लागणार आहे. ६ मार्च रोजी शेतीसाठी धरणातून पाणी सोडण्यात आले होते, तर १७ मार्चपासून धरणातून शेतीसाठी पाणी सोडले होते. धरणातील पाणीसाठा सध्यस्थितीत ५० टक्क्यांच्या आत आलेला आहे. शहरासाठी भीमानदीद्वारे पाणी सोडण्यात आल्यानंतर धरणातील पाणीसाठा आणखीन घटणार आहे. कारण शहरासाठी प्रत्यक्ष अर्धा टीएमसी पाणी लागत असले तरी नदीद्वारे पाच टीएमसी पाणी धरणातून सोडावे लागते. सोलापूरला पाऊस सहसा जून महिन्यात पडत नाही तर जुलैपासून काही प्रमाणात पावसाला सुरुवात होते.

प्रामुख्याने पुणे, नगर जिल्ह्यात पडणाऱ्या पावसावर उजनी धरण भरण्याचे भवितव्य अवलंबून असते. पुण्यातील सर्व धरणे भरल्यानंतर खाली सोडलेल्या पाण्यावर उजनी धरणाचा पाणीसाठा वधारतो. जर का समजा यंदा वेळेवर पाऊस पडला नाही आणि धरणातील शिल्लक पाणीसाठी जपून वापरला नाही तर मात्र सोलापूर शहर आणि जिल्ह्यावर पिण्याच्या पाण्याचे मोठे संकट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हाधिकारी आणि इरिगेशन विभागाने धरणात सध्या असलेला शिल्लक पाणीसाठा काटकसरीने आणि भविष्यातील पावसाचा अंदाज घेवून वापरणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शेतीसाठी तर लांबच पण लोकांना आणि जनावरांना देखील पिण्यासाठी पाणी मिळणार नाही. पर्यायाने सोलापूर जिल्ह्यात दुष्काळसदृश्यस्थिती निर्माण होवून मोठे संकट ओढावल्यास त्याला जबाबदार कोण?

### साखर कारखानेही धरणावरच अवलंबून

सोलापूर जिल्ह्यात तब्बल ३९ साखर कारखाने असून यापैकी प्रत्यक्ष किती कारखान्यांचा सिझन चालतो हा भाग वेगळा आहे. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात कारखाने असल्याने त्यांच्यासाठी ऊस देखील मोठ्या प्रमाणात लागतो. सोलापूर शहरासाठी भीम ानदीद्वारे उजनीतून पाणी सोडण्यात आल्यानंतर शहराला पाणी लागते अर्धा टीएमसी पण प्रत्यक्ष धरणात पाच टीएमसी पाणी सोडण्यात येते. नदीद्वारे सोडलेल्या या पाण्याचा वापर शेतीला होतो आणि ऊस पिकालाही याचा लाभ मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळेच जिल्ह्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर साखर कारखाने आहेत. पाऊस कमी पडला आणि धरणातील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव राहिला तर ऊस पिकांचे नुकसान होवू शकते.



### इराण युध्दामुळे महागाई अन् भविष्यात जलसंकटाचा सावट...

महिनाभरापासून आखाती देशात अमेरिका, इस्त्रायल आणि इराण या राष्ट्रांमध्ये युध्द सुरु आहे. या युध्दामुळे पेट्रोल, डिझेल आणि गॅस याचा तुटवडा जाणवतो आहे. परंतु मोदी सरकारच्या योग्य नियोजनामुळे तूर्तास याचा परिणाम भारतावर दिसून येत नाही. पण हे युध्द जर का आणखीन काही दिवस चालले तर मात्र याचे दाट परिणाम जाणवणार आहेत. युध्द थांबले तरी वाढलेली महागाई कमी होणार नाही. युध्दाचे परिणाम गडद होत असतानाच भविष्यात वरूनराजाने ओढ दिल्यास मात्र आपल्याला मोठ्या अडचणींना तोंड देण्याची वेळ येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पेट्रोलियम पदार्थ आणि शिल्लक पाणीसाठी योग्यरित्या आणि काटकसरीने वापरणे हीच सध्या तरी काळाची गरज आहे.

### धरणातील पाण्याचे बाष्पिभवन सुरु

उन्हाचा पारा वाढत असून सोलापूरचे तापमान सध्या ४० अंशाच्यावर गेलेले आहे. आगामी काळात उन्हाचा पारा आणखीन वाढण्याची शक्यता असून दरवर्षीच्या अनुभवानुसार तापमान ४५ अंशापर्यंत जाण्याची शक्यता यंदाही नाकारता येणार नाही. बाष्पिभवनामुळे धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होतो. एकूणच सध्याची पाणीसाठी स्थिती पाहता आणि भविष्यात पावसाने ओढ दिलीत तर मात्र सोलापूर शहर व जिल्ह्यावर जलसंकट ओढावण्याची शक्यता दुणावते. सर्व परिस्थिती पाहता जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे. गेली काही वर्षे उजनी धरण सातत्याने शंभर टक्क्यांच्यावर भरत आहे.

यंदा देशातच पाऊसमान कमी असणार असून अल निनोचा परिणाम पडणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज असल्याचे सूतोवाच राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. दुर्दैवाने पाऊसमान कमी झाले तर सोलापूर शहर व जिल्ह्यावर दुष्काळ आणि पर्यायाने जलसंकट येवू नये, यासाठी आतापासून खबरदारी घेणे गरजेचे आहे. पालकमंत्री, शहर व जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार यांनी यासंदर्भात गांभीर्याने विचार करून प्रशासनाला याबाबत अवगत करणे गरजेचे आहे. धरणात पाणीसाठा पुरेसा नाही राहिला तर तीव्र टंचाई पडण्याची शक्यता आहे.

## ▶▶ थोडक्यात...

### धार्मिक स्थळांच्या परिसरात ड्रोन उडविण्यास बंदी

**सोलापूर, दि.२८ मार्च-**

चैत्रवारीच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिर यांसह सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांच्या परिसरात दि.२५ मार्च २०२६ ते दि.२ एप्रिल २०२६ या कालावधीत ड्रोन उडविण्यास कलम १६३ अन्वये बंदी घालण्याचा आदेश अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी जारी केला आहे. यात्रा कालावधीत लाखो वारकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यात्रेच्या दरम्यान संभाव्य दहशतवादी धोका व ड्रोनद्वारे घातपात होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने ही खबरदारीची उपाययोजना केली आहे. जिल्ह्यातील सर्व ड्रोन परवाना धारक व चालकांनी त्यांच्या ड्रोनची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

### शिक्षक परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी जगताप



**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी सुनील जगताप यांची एकमताने निवड करण्यात आली. अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भिकाभाई पटेल, प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे, प्रांत कार्यवाह पुरुषोत्तम काळे, उच्च शिक्षण विभागाचे प्रांताध्यक्ष डॉ.प्रा. प्रदीप खेडकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते, अनुलोमचे रामेश्वर कोरे यांच्या उपस्थितीत त्यांचा सन्मान करण्यात आला.

### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२८ मार्च-**

देवीदास गोवर्धन कोंपेल्ली (वय-५३, रा. अशोक चौक, सोलापूर) यांनी स्वतःच्या ताब्यातील दुचाकी वाहन हयगनीने, निष्काळजीपणाने चालवून रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला धडकला. यात रक्तस्त्राव होवून स्वतःच्या मृत्युस कारणीभूत ठरले. याबाबत पोलिस हेडकॉन्स्टेबल उडगी यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला.

### वल्याळ मैदान येथून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

येथील वल्याळ मैदान येथे पार्क करुन ठेवलेली एम.एच.१३ सी.सी.९८ या क्रमांकाची हिरो कंपनीची पॅशन प्रो ही दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. याबाबत लक्ष्मण बुचप्पा संगणगारी (वय-४२, रा.ब्रह्मदेव नगर, सोलापूर) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.



# डॉ. पानतावणे यांनी आंबेडकरी चळवळ निष्ठेने जोपासली : भालशंकर

## डॉ. पानतावणे यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर आंबेडकरी चळवळ रुजवण्याचे प्रयत्न ज्या विचारवंतांनी केले त्यामध्ये डॉ. गंगाधर पानतावणे यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे त्यांनी आपल्या जीवनभर आंबेडकरी विचाराशी बांधिलकी ठेवून आंबेडकरी चळवळ निष्ठेने जोपासण्याचे कार्य केले, असे विचार समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी मांडले

अस्मितादर्शकार पद्मश्री डॉ. गंगाधर पानतावणे प्रतिष्ठान सोलापूर यांच्या वतीने आयोजित डॉ. पानतावणे यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन सभेमध्ये ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमास ज्येष्ठ लेखक योगीराज वाघमारे, डॉ. एम. डी. शिंदे, डॉ. डी. आर. गायकवाड, डॉ संघप्रकाश दुड्डे हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अण्णासाहेब भालशंकर यांनी समकालीन आंबेडकरी चळवळीचा आढावा घेताना त्यामध्ये निर्माण झालेले अवरोध मांडले. मात्र यातून बाहेर पडण्यासाठी डॉ. पानतावणे यांचे विचार व कार्य आदर्श असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पानतावणे यांनी आपल्या आयुष्यात अस्मितादर्शच्या माध्यमातून चळवळ निर्माण केली. लेखकांची नवी पिढी घडवली. ज्येष्ठ लेखक योगीराज वाघमारे यांनी मिलिंद कॉलेजमधील डॉ. पानतावणे यांचे कार्य विशद केले. एक उत्तम शिक्षक मार्गदर्शक आणि संपादक असणारे डॉ. पानतावणे यांच्या अनेक आठवणी त्यांनी यानिमित्ताने मांडल्या. दलित साहित्यिकांची एक पिढी घडवण्याचे कार्य पानतावणे यांनी केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. डॉ. संघप्रकाश दुड्डे यांनी डॉ. पानतावणे यांच्या अस्मितादर्श मधील कार्याचा आढावा घेतूला. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी डॉ. पानतावणे यांच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. पानतावणे हे आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ .एम. डी. शिंदे यांनी दलित चळवळ आणि साहित्याचा पाया घालण्याचे कार्य डॉ. पानतावणे यांनी केल्याचे नमूद केले. यावेळी डॉ. शिवाजी मस्के, डॉ. दादासाहेब खांडेकर, डॉ. बापूराव राऊत, डॉ. सतीश चोपडे, अजीन तळभंडारे, बोधीप्रकाश गायकवाड, जीवक सुरवसे, कवी शेख, लक्ष्मण उपाडे, आम्रपाली गाडे, मंजुश्री खंडागळे, सुप्रिया माने, सिध्दार्थ साबळे, बाबरे यांच्यासह नालंदा नगर व सोलापूर मधील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सारीपुत्र तुपेरे यांनी केले तर आभार कवी चंद्रकांत मागाडे यांनी मानले.

# प्रा. वामसी पिंगाली यांना गणित रत्न पुरस्कार जाहीर

### मंगळवारी वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

गणित क्षेत्रातील सखोल आणि मूळ संशोधनासाठी दिला जाणारा मानाचा गणित रत्न पुरस्कार बेंगळुरु येथील आयएससी अर्थात भारतीय विज्ञान संस्थेचे प्रा.वामसी प्रिथम पिंगाली यांना प्रदान केला जाणार आहे. या पुरस्काराचे यंदाचे ५ वे वर्ष आहे. मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी सकाळी १० वाजता संगमेश्वर महाविद्यालय येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु व गणितज्ञ प्रा.डॉ.एन.के. ठाकरे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त २०१३ मध्ये त्यांच्या शिष्य, गणितप्रेमी व सहकाऱ्यांनी एकत्र येऊन प्रोफेसर ठाकरे गौरव समिती स्थापन केली. जमा झालेला निधी न स्वीकारता त्यातून आंतरराष्ट्रीय दर्जाचा गणितरत्न पुरस्कार सुरु करण्याचा आग्रह प्रा.ठाकरे यांनी धरला होता. त्यानुसार २०२१ मध्ये ट्रस्ट, २०२२ मध्ये सोसायटी म्हणून नोंदणीकृत झालेल्या प्रोफेसर ठाकरे गौरव संस्थेमार्फत सदर पुरस्कार दिले जाते.

गणित रत्न पुरस्कारासाठी उमेदवारांची निवड आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमान १० नामांकित गणितज्ज्ञांच्या समितीद्वारे केली जाते, ज्याम ध्ये परदेशातील तज्ज्ञांचाही समावेश असतो. आतापर्यंत प्रा.महेश काकडे, प्रा.नीना गुप्ता, प्रा.अपूर्व खरे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२४ मध्ये योग्य उमेदवार न मिळाल्यामुळे पुरस्कार प्रदान करण्यात आला नव्हता. १ लाख ११ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. प्रोफेसर ठाकरे गौरव संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमास पद्मश्री ॲड.उज्ज्वल निकम प्रमुख, श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांची उपस्थिती लाभणार आहे. संगमेश्वर महाविद्यालयाच्या वतीने बांधण्यात आलेल्या कै.कर्मयोगी अप्पासाहेब काडादी या नूतन सभागृहाचे उद्घाटनही पार पाडण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी गणित रत्न समिती समन्वयक प्रा.बी.एन.वाफरे, लक्ष्मी हायड्रॉलिक्सचे तांत्रिक संचालक आदित्य ठाकरे उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल पुरवठा सुरळीत; २० मार्च रोजीचा आदेश रद्द

**▶▶ कृषी व औद्योगिक वापरासाठी मुबलक प्रमाणात खरेदी**

**▶▶ पेट्रोल, डिझेलचा अवैध साठा केल्यास कठोर कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल व डिझेल पुरवठा सुरळीत आहे. त्यामुळे २० मार्च २०२६ रोजीचा आदेश रद्द करण्यात करण्यात आला आहे.जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन पेट्रोल व डिझेल विक्रीसंदर्भात आदेश जारी करण्यात आला होता.

सर्व पेट्रोल पंपचालक, मालक यांनी पेट्रोल/डिझेल हे केवळ वाहनाच्या इंधन टाकीतच वितरित करावे. कोणत्याही परिस्थितीत पेट्रोल/डिझेल खुल्या (कॅन, बाटली, डबा किंवा इतर कोणत्याही भांड्यात) विक्री/पुरवठा करु नये, असे या आदेशात नमूद करण्यात आलेले होते.

सद्यस्थितीत BPCL, IOCL व HPCL या कंपन्यांकडे जिल्ह्यात पुरेसा साठा असल्याचे प्रशासनाच्या आढाव्यात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कार्यालयाचा आदेश सदर आदेश रद्द करण्यात आला असून हा निर्णय तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे.




कृषी, औद्योगिक तसेच अन्य महत्वपूर्ण कामासाठी पेट्रोल डिझेल आवश्यक आहे. सध्या ते मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. तरी नागरिक, शेतकरी व व्यापारी यांनी पेट्रोल, डिझेलचा आवश्यकतेप्रमाणे वापर करावा, परंतु त्याचा अवैध साठा करू नये. असा इंधनाचा साठा करणाऱ्या संबंधितावर प्रशासन कठोर कारवाई करणार आहे, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# उजनी धरणात ७ टीएमसी पाणी आरक्षित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा शहर तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी उजनी धरणात ७.० टीएमसी पाणी पिण्यासाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, मे २०२६ पासून भीमा नदीमार्गे पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

जिल्हास्तरीय पिण्याचे पाणी आरक्षण समितीची बैठक ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार



गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर म हानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे, अधीक्षक अभियंता सुभिवेंद्र खांडेकर, लाभक्षेत्र विकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३९६

**हे देह क्रिया आघवी । न करवितां होय बरवी ।**
**जैसा न चलवितेनि रवी । लोकु चाले ।।**

ज्ञानी माणसाला देहासक्ती नसल्याने सुख, दु:ख जाणवत नाहीत. भेद नांवाचा प्रकार त्याच्या ठिकाणी शिल्लक नसतो. सर्व विश्वात तो एक चैतन्यच पाहतो. हया चैतन्याच्या ठिकाणी तो व्यक्त आणि अव्यक्त असे पाहत नाही. सोन्याची लगड व सोन्याचे अलंकार वेगवेगळे दिसत असले तरी मुळात ते एक सोनेच असते. त्याप्रमाणे चैतन्य हे विश्वरुपाने नटले आहे आणि विश्वाचे विश्वत्व नष्ट झाले असता ते पुन्हा चैतन्य रुपच होणार असते याची जाण ज्ञानी व्यक्तिला असते. अर्थात, चैतन्याला, जीवाला व विश्वाला ज्ञानी वेगळे पाहत नाही. पाटीवर लिहीलेली अक्षरे पुसली गेली तरी त्याचा अर्थ पुसला जात नाही. पाण्याच्या लाटा पाण्यापेक्षा वेगळ्या दिसत असल्या तरी मुळात पाणी व लाटा भिन्न नसतात. त्याप्रमाणे विश्वात व चैतन्यात भिन्नता नसते हे ज्ञानी व्यक्तिला ज्ञात असते. देहात जे चैतन्य असते ते चैतन्य कोणत्याही क्रिया करीत नाही. देहाच्या क्रीया चालूच राहतात. दहा इंद्रियांचे मार्ग अनेक क्रियांच्या रुपाने वाहत राहतात. राजा झोपला तरी देशाचा लोकव्यवहार बंद पडत नसतो. प्रजा आपल्या इच्छेनुसार व्यवहार करीतच असते. त्याप्रमाणे बुध्दीची जाणण्याची क्रिया, इंद्रियांचे व्यापार, प्राणाचे स्पंदन होणे या क्रिया चैतन्याने, परमात्म्याने न करविता देखील होत राहतात. याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले, **हे देह क्रिया आघवी । न करवितां होय बरवी । जैसा न चलवितेनि रवी । लोकु चाले ।।** अर्थात, सुर्याने न चालविताही त्याच्या प्रकाशात लोक सहज चालत राहतात.



ज्ञानी पुरुषाला या सर्व गोष्टीचे ज्ञान असते, त्यामुळे त्याच्यात मी पणा शिल्लक राहत नाही. सुर्य चालत नाही किंवा लोकांना चालवत नाही, लोकच आपोआप सुर्याच्या प्रकाशात चालत राहतात. एवढाच अर्थ इथे अपेक्षीत नाही तर माऊलींचे भौगोलीक ज्ञान आपल्या लक्षात यायला पाहिजे. सुमारे सातशे वर्षापुर्वी माऊलींनी सुर्य स्थिर असल्याचे सांगीतले आहे. त्यांना जास्तीत जास्त अध्यात्मिक स्पष्टीकरण करावयाचे असल्याने ते भौगोलिक स्पष्टीकरणाकडे गेले नसावेत. ओघा-ओघाने जेवढे भौगोलिक स्पष्टीकरण देणे भाग पडले तेवढेच त्यांनी सांगीतले आहे. सुर्य जसा लोकव्यवहारात अडकत नाही तसे एकदा आत्मसुखात तल्लीन झालेला ज्ञानी पुन्हा संसारदु:खात अडकत नाही. तापलेले पाणी थंड वा-यामुळे आपोआप थंड होते, सुर्यप्रकाश येताच अंधार आपोआप नष्ट होतो. त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाच्या समोर मोह, स्वार्थ, चिंता, आल्या तरी त्याचे अस्तित्व आपोआप नष्ट होते. अग्नीत प्रविष्ट झालेले लाकुड अग्नीच होऊन जाते, तेव्हा त्यातील लाकूडपणा प्रयत्नानेही वेगळा करता येत नाही. प्रयत्नाअंती सुध्दा साखरेचा पुन्हा रस होत नाही. परिसाच्या स्पर्शाने एकदा लोखंडाचे सोने झाले की, पुन्हा त्याचे लोखंड होत नाही. दुधाचे दही, तूप केल्यास पुन्हा त्या दही, तुपाचे दूध होत नाही. हे सर्व जसे सत्य आहे, तसे आत्मज्ञानी, आत्मसुखी माणसांचे आहे. ते एकदा या आत्मसुखाच्या, आत्मज्ञानाच्या, स्थिरतेच्या उच्चकोटी पदाला पोहचले की त्यांना कोठेही, कसलाही भेद दिसत नाही. आप-पर भाव त्यांच्या ठिकाणी शिल्लक राहत नाही. सर्वत्र सदा सम पाहण्याची त्यांची वृत्ती होऊन बसते. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# बालरंगभूमी हीच प्रगल्भ अभिनयाची पायाभरणी

## ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी; जागतिक रंगभूमी दिनानिमित्त बालकलाकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

नाटक हे समाजाचे प्रतिबिंब असते आणि बालरंगभूमी ही भविष्यातील प्रगल्भ अभिनयाची खरी पायाभरणी आहे. आजच्या बालकलाकारांमध्ये उद्याचे कसदार अभिनेते दडलेले आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी केले.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा-सोलापूर व बालरंगभूमी परिषद, जिल्हा शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक रंगभूमी दिनानिमित्त' आयोजित सत्कार समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मोदीखाना येथील नाट्य परिषदेच्या स्व. पद्माकर देव सभागृहात हा सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्य परिषदेचे सोलापूर शाखा अध्यक्ष तथा माजी आमदार प्रकाश यलगुलवार होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात यलगुलवार यांनी आपण जन्मत:च कलावंत असतो आणि विविध भूमिका पार पाडत असतो. याचाच अर्थ असा की आपल्या जगण्यातून नाट्य निर्माण होतं आणि नाट्यातून आपलं जगणं दिसत असतं. लहान वयातच नाट्यकला आपल्या आपल्यात रुजली पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

याप्रसंगी व्यासपीठावर नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी, परिषदेच्या कोषाध्यक्ष विद्या काळे, बालरंगभूमीचे प्रमुख कार्यवाहअर्चना अडसूळ यांची प्रमुख उपस्थिती होती.


कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांच्या हस्ते बालरंगभूमीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त केलेल्या डॉ.मीरा शेंडगे, संदीप जाधव, संदीप उडाणशिव, गणेश मरोड या दिग्दर्शकांचा तसेच सम्राट जौजंट, पल्लवी आठवले, वेदिका कांबळे, रुद्राक्षी इंगळे, अभिलाषा जाधव, ओंकार कांबळे, रेवती शिंगांणे, अंकिता वाघमारे, आराध्या डोळसे, हर्षवर्धन गोतसुर्वे या यशस्वी बालकलाकार व बालनाट्य दिग्दर्शकांचा भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे अरविंद जोशी पुढे म्हणाले की, सोलापूरच्या रंगभूमीला मोठी परंपरा आहे. बालपणापासूनच मुलांवर नाटयसंस्कार झाले तर त्यांची भाषिक आणि सांस्कृतिक जडणघडण उत्तम होते. आज गौरविल्या गेलेल्या कलावंतांनी ही परंपरा पुढे चालू ठेवावी. अध्यक्षीय भाषणात प्रकाश यलगुलवार यांनी नाट्य परिषदेच्या माध्यमातून सोलापुरातील नाट्य चळवळ अधिक गतिमान करण्याचा मानस व्यक्त केला. त्यांनी बालरंगभूमीच्या कार्याचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे चैतन्य निर्माण होत असल्याचे सांगितले. या सोहळ्याला नाट्य परिषदेचे सदस्य व्यंकटेश रंगम, अन्नपूर्णा साखरे, प्रशांत देशपांडे, मच्छिंद्र सपताळे, अमोल धाबळे, आदी मान्यवर तसेच सोलापूर जिल्ह्यातील नाट्य रसिक, साहित्यिक, नाट्य कलावंत आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी अत्यंत नेटकेपणाने केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्याध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले तर प्रा.जोतिबा काटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### अहंकार सोडा अन् कृतज्ञतेने जीवन जगा



श्रावकांनी मनातील अहंकार पूर्णपणे दूर ठेवला पाहिजे. जेव्हा आपण नम्र होऊन, मनापासून शरणागत होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने आत्मकल्याण साध्य होते. जीवनात नेहमी कृतज्ञतेचा भाव ठेवल्यास आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक अशा सर्व क्षेत्रांत प्रगती होणे सुलभ होते, असे मौलिक मार्गदर्शन संत शिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे सुशिष्य, निर्यापक श्रमण मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज केले. त्यांचे मंगल प्रवचन येथील महावीर सांस्कृतिक भवनमध्ये शनिवारी झाले. श्रावकांना मार्गदर्शन करताना मुनिश्रींनी भगवान महावीरांच्या संदेशाचे महत्त्व आणि अंतर्मनातील भावशुद्धीवर विशेष प्रकाश टाकला. मुनिश्री म्हणाले की, ज्या महापुरुषांनी आपले कल्याण केले, आपल्याला आणि या जगाला सर्वकाही दिले, त्यांच्यासाठी आपण काय केले? तुम्हालाही भगवान महावीरांसारखे बनायचे असेल, तर ते शक्य आहे. एखादी व्यक्ती गरीब असेल, तिच्याकडे पैसा नसेल, तरीही ती महान बनू शकते; त्यासाठी फक्त 'भाव' शुद्ध असावा लागतो. दुर्दैवाने आपण भावनेच्या बाबतीतही कमालीची कंजूषी करतो. ते पुढे म्हणाले, भगवान आणि गुरुंच्या प्रती मनात आदराचा आणि आभाराचा भाव निर्माण करा. 'देवा, तू मला सर्वकाही दिले आहेस, पण माझी क्षमता नसल्यामुळे मी काहीही करू शकत नाही, ही माझी कमजोरी आहे,' अशी प्रांजळ कबुली देऊन त्यांच्या चरणी नतमस्तक व्हा. माझ्याकडे इतरांना सांभाळण्याइतकी शक्ती नसेल, तरीही मी भगवान आणि गुरुंच्या प्रती कृतज्ञ राहून सदैव नम्र राहीन, हा भावच तुम्हाला मोठे बनवतो. भक्ताने स्वत:चे सामर्थ्य ओळखून इतरांशी तुलना करणे थांबवावे. जे लोक आपली आर्थिक शक्ती आणि उत्पन्न लपवून ठेवतात अन् दानधर्म करत नाहीत, ते चुकीचे आहे. प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार आणि शुद्ध इच्छाशक्तीने समाजासाठी व धर्मासाठी दान केले पाहिजे. तसेच श्रावकांनी मन, वचन आणि कायेद्वारे धर्माला संमती द्यावी, खोटे बोलणे टाळावे आणि प्राप्त झालेल्या ज्ञानाचा सदुपयोग करून परोपकारासाठी सदैव तत्पर राहावे.

# जागतिक क्षयरोग दिनी रेल्वे विभागाच्यावतीने जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २४ मार्च २०२६ रोजी 'जागतिक क्षयरोग दिन' डॉ. कोटणीस स्मृती विभागीय रेल्वे रुग्णालय आणि वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्ये विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा केला. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याच्या राष्ट्रीय प्रयत्नांना पूरक ठरेल अशा प्रकारे, लाभार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाविषयी लक्षणे, प्रतिबंध, वेळेवर निदान आणि प्रभावी उपचार जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित असलेल्या देगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली महिंद्रकर यांनी एक अत्यंत माहितीपूर्ण आणि ओघवते व्याख्यान दिले. त्यांनी क्षयरोगाची कारणे, लक्षणे आणि तो पसरण्याची माध्यमे कोणती आहेत ?



यांविषयी सविस्तर माहिती दिली; तसेच, पूर्णपणे बरे होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, रोगाचे लवकर निदान आणि डॉक्टरांनी सुचवलेल्या उपचार पद्धतीचे काटेकोर पालन करणे किती महत्त्वाचे आहे, यावर विशेष भर दिला.

वाडी येथील पॉलीक्लिनिकमध्येही विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ. रघुनंदन आणि डॉ. श्रवण यांनी अशाच प्रकारचे एक जनजागृती सत्र आयोजित केले; ज्यामुळे या विभागातील रेल्वे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा हा उपक्रम अधिक व्यापक झाला. एकूण मिळून, या सत्रांमध्ये सुमारे १३० लाभार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.



# 'चिमणी वाचवा' संदेश देत मुलांनी राबविला कृत्रिम घरटे निर्मिती उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी कार्यशाळा पार पडली. 'वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन' आणि संस्कार संजीवनी फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हगलूर, सोलापूर येथील अनाथाश्रमात सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे मुलांचा उत्स्फूर्त सहभाग. वाढत्या सिमेंटच्या जंगलामुळे चिमण्यांचा अधिवास धोक्यात येत असताना, त्यांना पुन्हा आपल्या अंगणात बोलावण्यासाठी कृत्रिम घरटी कशी तयार करावीत, याचे प्रात्यक्षिक यावेळी देण्यात आले. केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण रक्षण कसे करता येते, हा संदेश या कार्यशाळेतून मुलांपर्यंत पोहोचला.

सूत्रसंचालन प्रा. विक्रमसिंह बायस यांनी केले तर आभार परमेश्वर काळे यांनी मानले याप्रसंगी अजित चौहान, संतोष धाकपाडे, तुषार राठोड यांनी या उपक्रमात घरटे निर्मिती प्रात्यक्षिकाद्वारे मुलांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत सरवदे, रोहित गदगे, शिवराज जगदाळे, नागराज बिराजदार, देवेंद्र दंतकाळे यांनी सहभाग घेतला.

## जाब विचारण्यासाठी गेले असता मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

अंगावर कुत्रे येत आहेत म्हणून दि. २७ मार्च रोजी प्रशांत दिलीप जाधव वय ३९, रा. १६३ पडघाजी नगर सोलापूर यांनी आरोपी विनोद महापुरे, मनीषा विनोद महापुरे, रा. पडघाजी नगर, सोलापूर यांना प्रशांत जाधव यांचे वडील जाब विचारण्यासाठी गेले असता विनोद व मनीषा महापुरे यांनी प्रशांत जाधव यांच्या पत्नीस हाताने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी दिली. तसेच विनोद महापुरे यांनी मागून येऊन डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून प्रशांत जाधव यांना दुखापत केली. याबाबत दि. २७ मार्च रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मुजावर करत आहेत.

## रामनामाच्या गजरात गुलालाचे कीर्तन; अयोध्या प्रतिष्ठानतर्फे रामजन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त अयोध्या प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हभप बळीराम जांभळे महाराज यांचे गुलालाचे कीर्तन भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमात रामनामाच्या गजरात आणि गुलाल उधळून भक्तांनी अनोख्या भक्तिभावाने सहभाग नोंदविला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून नगरसेविका श्रीदेवी फुलारे, स्वीकृत नगरसेवक मनीष केत, उत्तरा बचुटे बर्डे आदींची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेची आरती करण्यात आली.

दरम्यान, कीर्तनात महाराजांनी धर्माचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, धर्म म्हणजे प्रत्येकाने नीतिमत्तेने वागणे, सत्य बोलणे



आणि समाजाप्रती जबाबदारीने आचरण करणे होय. जेव्हा सम ाजात अधर्म वाढतो, तेव्हा त्या अधर्माचा नाश करण्यासाठी प्रभू श्रीरामांना अवतार घ्यावा लागतो. संत आणि देव हे अशाच काळात मार्गदर्शनासाठी अवतरतात, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला हिंदू रक्षक मित्र मंडळाचे संस्थापक शेखर फंड आदींसह मंडळाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार, | दिनविशेष : १८५७: मंगल पांडे यांनी बॅरकपूरमध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांवर गोळीबार करून १८५७ च्या उठावाची ठिणगी टाकली. |
| दि. २९ मार्च २०२६ | १९६८: राहुरी, अहमदनगर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठाची स्थापना. |
| विक्रम संवत् २०८३ । | १९२९: प्रसिद्ध भारतीय रंगभूमी आणि चित्रपट कलाकार 'उत्पल दत्त' यांचा जन्म. |
| शके -१९४८ | |
| संवत्सर - रौद्र | |
| मास - फाल्गुन शु. एकादशी | |
| ऋतु - वसंत । | |
| नक्षत्र- अश्लेषा (१४.३७) | |
| योग - धृती (१८.१९) | |
| करण - बव (१९.२५) | |
| राहू काल : रविवार स. ४.३० ते ६.०० | |

# देऋब्रा पाठांतर स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सोलापूर शहरातील एकूण १४ शाळांमधून १५० विद्यार्थ्यांनी पाठांतर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता, यापैकी ३१ विद्यार्थी पारितोषिक प्राप्त ठरले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर उपस्थित होते.

सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने दासनवमी निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या पाठांतर स्पर्धेतील बक्षीसांचे वितरण डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते संस्थेच्या सभागृहात झाले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली.

यावेळी उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, सहकार्यवाह नभा काकडे, महिला शाखा अध्यक्षा हेमा चिंचोळकर, युवक अध्यक्ष तथा स्पर्धा प्रमुख सुशांत कुलकर्णी उपस्थित होते. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र तर सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. सुशांत कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

**बक्षिस पात्र विद्यार्थी असे :**

**लहान गट :**

प्रथम क्रमांक - अभय कल्हाळीकर (गोपाबाई भै.दमाणी बालक मंदिर), द्वितीय - राही कुलकर्णी (शि.प्र.मंडळी, शिशु शाळा, जुळे सोलापूर), तृतीय - सुरश्री कुलकर्णी (संस्कार शिशु विहार), उत्तेजनार्थ - शुभ्रा गिरीधर मंठाळकर (गोपाबाई भै. दमणी बालक मंदिर), आदिश्री अशोक उदगिरी (जडावबाई रामसुख चंडक बालक मंदिर)



**मोठागट :**

प्रथम क्रमांक विभागून - दादस शिवमूर्ती (शि.प्र.मंडळी, शिशु शाळा, जुळे सोलापूर), समर्थ कुलकर्णी (श्री चतुरबाई श्राविका बालमंदिर), द्वितीय क्रमांक विभागून -संनिधी हत्तुरे (शि.प्र.मंडळी, शिशु शाळा, जुळे सोलापूर), इरा कुलकर्णी (गोपाबाई भै. दमाणी बालक मंदिर), तृतीय क्रमांक विभागून - रोहित कोरे (श्री सिद्धेश्वर पूर्व प्राथमिक शाळा सोलापूर), राधेय रत्नपारखी (शि.प्र.मंडळी, शिशु शाळा, जुळे सोलापूर), उत्तेजनार्थ - आदित्य बुधडकर (जडावबाई रामसुख चंडक बालक मंदिर), सान्वी आराध्ये (शि.प्र.मंडळी, शिशु शाळा, जुळे सोलापूर)

**पहिली :** प्रथम क्रमांक - आकांक्षा अभिजीत बापट (नुमवि मराठी शाळा), द्वितीय क्रमांक - श्लोक लक्ष्मण मुळे, तृतीय क्रमांक - ऋत्विक ऋषिकेश कडगंची, उत्तेजनार्थ - अद्विका मार्कंडेय आडम, मनस्वी अशितोष इंगवले (श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा) दुसरी : प्रथम क्रमांक - जान्हवी कोरुलकर, द्वितीय- अदिती जाधव, तृतीय - आयुष गायकवाड, उत्तेजनार्थ - स्वराली कस्तुरे (श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा), भूषणा शिंदे (श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळा सोलापूर) तिसरी : प्रथम - श्रेयस किणगी, द्वितीय - संस्कृती मुळे (श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा), तृतीय - पृथ्वीराज हुंडेकरी (श्री वीरतपस्वी मराठी प्राथमिक शाळा), उत्तेजनार्थ वेदिका वाडीकर (श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा), श्रेयस कुंभार (श्री वीरतपस्वी मराठी प्राथमिक शाळा) चौथी : प्रथम क्रमांक - वेदांत वरेकर, द्वितीय - ओजस कुलकर्णी (कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा, जुळे सोलापूर), तृतीय - विवान वांढरे (श्री दिगंबर जैन गुरुकुल प्राथमिक शाळा)

## ८३० घरकुलांचा ताबा ९ ऑगस्ट क्रांतीदिनी देणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

माँ साहेब विडी कामगार गृहनिर्माण संस्थेची प्रलंबित ८३० घरे ९ ऑगस्ट २०२६ या क्रांतीदिनी लाभार्थी कामगारांना देणार असल्याची माहिती माँ साहेब गृहनिर्माण संस्थेचे संस्थापक चेअरमन विष्णू कारमपुरी यांनी दिली. माँ साहेब विडी कामगार गृहनिर्माण संस्थेचे घरकुले वाटप करण्यास नागरिक सुविधा पूर्ण करण्यास अनंत अडचणी आल्या होत्या. शासनाकडूनही मूलभूत गरजा पूर्ण करण्यास सहकार्य मिळत नाही तसेच नैसर्गिक आपत्ती आचारसंहिता इतर कारणास्तव ८३० घरकुलांचा ताबा देण्यास विलंब झाला परंतु नागरिक सुविधा आणि मूलभूत गरजा पूर्ण करण्यास संस्थेचे पदाधिकारी व लाभार्थी विडी कामगारांचा अथक प्रयत्नांमुळे लवकरच पूर्ण होऊन ९ ऑगस्ट २०२६च्या क्रांतीदिनी विडी कामगारांना ताबा देण्यात येणार आहे.



# अनिल मंद्रूपकर यांना अटल राष्ट्र सेवा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सामाजिक कार्यकर्ते लायन अनिल मंद्रूपकर यांना भारतभरातील ६ राजात ४७ वर्षांच्या सामाजिक सेवेसाठी राष्ट्रीय स्तरावर अटल राष्ट्र सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार तालकटोरा स्टेडियम, नवी दिल्ली येथे माजी केंद्रीय मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. देशभरातील विविध क्षेत्रातील ५० पुरस्कार विजेत्यांना हा पुरस्कार देण्यात आला. राष्ट्रकवी दिवंगत रामधर सिंह दिनकर स्मृती न्यास, नवी दिल्ली यांच्याद्वारे दिवंगत प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार स्थापित करण्यात आला आहे.

४७ वर्षांच्या सामाजिक सेवेत त्यांनी युवक बिरादरी, लायन्स पुणे इको फ्रेंड्स, लायन्स इंटरनॅशनल, फाईव्ह लायन्स डिस्ट्रिक्ट, वनराई, एनएससीसी, अलर्ट, व्हाया इंटरनॅशनल, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन, कमिन्स इंडिया फाउंडेशन, विश्वेश्वर एम्पॉवरमेंट ऑर्ग., आशीर्वाद वृद्धाश्रम, स्नेहक्षितिज मेंटल रिहॅबिलिटेशन, एकलव्य, लेक टाऊन सोसायटी इत्यादी विविध सामाजिक मंचांवर काम केले आहे.

## दुचाकीच्या धडकेत पायाचे हाड फ्रॅक्चर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

भाचा समर्थ इंगळे याला शाळेत सोडून दि. १८ मार्च रोजी ब्रह्मदेव प्रकाश व्यवहारे, वय ४५, रा. मुरारजी पेठ, सोलापूर हा मोटरसायकल क्रमांक एम एच १३ ए एस ६४१८ यावरून दोड्डी गावी वसुली करीता शेळगी, मित्र नगर, सोलापूर या ठिकाणी दहिटणे मार्गे गावाकडून हैदराबाद हायवे कडे वळण घेत असताना पाठीमागून सुरज सिद्धेश्वर जमादार, वय २८, रा. सास्तुर, ता. लोहारा, जि. धाराशिव याची मोटरसायकल क्रमांक एम एच २५ बीजी ९५६४ याने त्याचे वाहन भरधाव वेगाने चालवून, रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून ब्रह्मदेव व्यवहारे यांच्या मोटरसायकलला उजव्या बाजूने जोरात धडक दिली. त्यात त्यांच्या पायाच्या नडगीचे हाड फ्रॅक्चर झाले व डोक्यास मुक्का मार लागून मोटरसायकलचे नुकसान झाले. याबाबत दि. २७ मार्च रोजी जोडबावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाडीकर करत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### वटवृक्ष मंदिरात अजयसिंहराजे निंबाळकर, राणीसाहेब महागांवकर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.२८ मार्च-**

सर्व स्वामी भक्तांना अत्यंत जलद गतीने सुलभ स्वामी दर्शनाचा लाभ करून देत असल्याने मंदिर समितीचे स्वामी समर्थांचे सुलभ दर्शन व्यवस्थेचे नियोजन म्हणजे भाविकांच्या श्रध्देचा सन्मान असल्याचे मनोगत फलटण संस्थानचे अजयसिंहराजे संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी व्यक्त केले. ते नुकतच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी राणीसाहेब उमादेवी महागांवकर, अजयसिंहराजे संजीवराजे नाईक निंबाळकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी अजयसिंहराजे नाईक निंबाळकर बोलत होते. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, अविनाश सुरवसे, विपूल जाधव, सागर गोंडाळ उपस्थित होते.



### वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य किट वाटप

**वळसंग, दि. २८ मार्च-**

वळसंग ग्रामपंचायत सदस्या जाई सिध्दाराम वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाची स्वच्छता राखणाऱ्या महिला सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य अंत्यंत महत्वाचे आहे त्यांच्या साठी म्हणून आरोग्य हितासाठी त्यांना हातमोजे सेनी टायझर, सनकोट जाई वाघम रे यांच्याकडून आरोग्य साहित्य देण्यात आले. यावेळी उपसरपंच समीर कटरे व ग्रामविकास अधिकारी राजकुमार जाधव व ग्रामपंचायत सदस्य शालम अमलिचुंगे, मलकप्पा कोडले, अनिल बर्वे, सिध्दाराम वाघमारे उपस्थित होते.



### राजू जंगम यांच्या स्मृती दिनानिमित ९२ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

दरवर्षीप्रमाणे यंदाही जिझस ख्राईस्ट गॉस्पल सोसायटी यांच्या वतीने ख्रि.पा. राजू जंगम यांच्या स्मृती दिनानिमित या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून नगरसेवक चेतन नरोटे, नगरसेवक प्रा. नरसिंग असादे, संजय हेमगड्डी, हणमंतू सायबोलू, समर्थ मोठे उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला रक्तदात्याचा व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात तब्बल ९२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत मानवतेचा संदेश दिला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनेक सेवक, पदाधिकारी व स्वयंसेवकांनी मोठे योगदान दिले. अशोक तंबोळू, संजीव मोरे, जॉन दिनकर, निरंजन उजागरे, सुरेश चर्च पदाधिकाऱ्यांमध्ये सागर तंबोळू, अशोक तंबोळू, परेश कुणशीकर, लाजर सातलोलू, देवपुत्र सायबोलू, बाळू मोटपेरोलू, संदेश जंगम यांचे विशेष सहकार्य लाभले.



### रानमसले येथे आरोग्य तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय वडाळा आणि ग्राम पंचायत रानमसले यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या माध्यमातून लोकमंगल समृद्ध गाव योजना आणि राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत मौजे रानमसले, (ता. उत्तर सोलापूर) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच मनोहर क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार, लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, लोकमंगल जीवन वेदा आयुर्वेदिक हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. आशिष सरकाळे तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. शिबिरात गावातील ज्येष्ठ नागरिकांनी उल्लेखनीय प्रतिसाद नोंदवून शिबिर आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले. शिबिरामध्ये ४० नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या संपन्नतेसाठी लोकमंगल जीवनवेदा हॉस्पिटलचे डॉ. अमजद बिजापुरे, मीनाक्षी इंगळे, नंदा पवार आणि रमेश पवार यांचे सहकार्य लाभले.

# पाणी-वीज नसलेल्या शाळांत डिजिटल शिक्षणाचा फज्जा

## राज्यात ४ हजार शाळा पाण्याविना; ५ हजार शाळांना वीज नाही, संगणक असूनही इंटरनेट ठप्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात शिक्षण क्षेत्रातील मूलभूत सुविधांचा अभाव पुन्हा एकदा समोर आला आहे. राज्यातील ४ हजारांहून अधिक शाळांमध्ये अजूनही विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. तर सुमारे ५ हजार शाळांमध्ये वीज जोडणीच नसल्याने हजारो विद्यार्थी डिजिटल युगातही अंधारात शिक्षण घेत असल्याचे वास्तव उघड झाले आहे. नुकत्याच सादर झालेल्या आर्थिक अहवालातून ही बाब स्पष्ट झाली असून, डिजिटल शिक्षण हा केवळ कागदोपत्रीच राहिल्याची टीका व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, करमाळा आणि माढा तालुक्यांतील वाड्या-वस्त्या, तांडे तसेच साखरशाळांमध्ये वीज व संगणक सुविधांचा मोठा अभाव आहे. कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषद शाळांमध्येही ही समस्या प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात येण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

अनेक शाळांमध्ये संगणक उपलब्ध असले तरी इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे त्यांचा उपयोग होत नाही. ग्रामीण व दुर्गम भागात ही समस्या अधिक तीव्र असून अनेक शाळा



संग्रहीत

अजूनही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. शिक्षण क्षेत्रात मोठ्या घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्षात पाणी, वीज, संगणक आणि खेळाचे मैदान यांसारख्या मूलभूत सुविधा अजूनही अनेक शाळांमध्ये उपलब्ध नाहीत.

डिजिटल इंडियाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये मोठी दरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता तरी शासनाने ठोस पावले उचलून विद्यार्थ्यांना मूलभूत व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त होत आहे.

**शिक्षणातील मूलभूत प्रश्न अजूनही अनुत्तरित**

राज्यातील हजारो शाळांमध्ये अद्याप संगणक व डिजिटल सुविधा नाहीत. डिजिटल आणि भौतिक सुविधांची कमतरता असल्याने विद्यार्थी मागे पडत आहेत. शासनाने तातडीने सर्व शाळांना वीज, इंटरनेट आणि अत्याधुनिक शैक्षणिक साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी. मराठी माध्यमांच्या शाळा टिकवणे अत्यावश्यक आहे.उपलब्ध शाळांच्या तुलनेत विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने शाळांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. परिणामी, शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**प्रशांत शिरगुर,** राज्य उपाध्यक्ष स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असो. संघटना

**यु-डायस २०२४-२५ अहवाल काय सांगतो?**

| | |
|---|---|
| राज्यातील एकूण शाळा : | १,०८,२५० पेक्षा अधिक |
| विद्यार्थी संख्या : | २ कोटी १२ लाख ७२ हजार ६११ पेक्षा अधिक |
| संगणक नसलेल्या शाळा : | ८,११८ |
| खेळाचे मैदान नसलेल्या शाळा : | १३,१७१ पेक्षा अधिक |




# जड वाहतुकीमुळे सोलापुरात मृत्यू होतोय 'स्वस्त'

### जुना बोरामणी नाका येथे तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर शहरात उड्डाणपुलाचा प्रश्न आणि जड वाहतुकीमुळे होणारे अपघात ही चिंतेची बाब आहे. या गंभीर प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते निरंजन बोध्दूल यांच्या नेतृत्वाखाली जुना बोरामणी नाका येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

आंदोलकांनी आपल्या मागण्या मांडण्यासाठी विविध घोषवाक्यांचा वापर केला. यामध्ये सावधान! पुढे सोलापूर आहे... येथे मृत्यू 'स्वस्त' मिळतो!, आमचे लोकप्रतिनिधी झोपलेत, म्हणून यम राजांचे काम सोपे झाले!, उड्डाणपूल नाही तर मत नाही! अजून किती बळी घेणार? या घोषवाक्यांचा समावेश होता. आंदोलनाच्या वेळी बोलताना निरंजन बोध्दूल म्हणाले, सोलापूर शहरासाठी उड्डाणपूल मंजूर होऊन १० वर्ष झाले आहेत, तरीही काम का होत नाही? निवडणूक आली की उड्डाणपुलाचे गाजर दाखवले जाते आणि निवडणुका संपल्या की पुन्हा शांतता असते. आंदोलनात अपघातात मृत्यू पावलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. आंदोलकांकडून प्रशासनाला निवेदन देऊन आपल्या मागण्या मांडण्यात आल्या. याप्रसंगी तुषार खंदारे, बालाजी नल्ला उपस्थित होते.

# प्रिसिजनतर्फे कासेगांवमध्ये क्रीडा साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

कासेगाव येथील भोसले हायस्कूलमध्ये प्रिसिजन फाउंडेशन आणि सेवावर्धिनी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने समृद्धी ग्रामविकास अभियान अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी क्रीडा साहित्य वितरणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर, प्रिसिजन फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, नितीन फलटणकर, वैशाली बनसोडे, सेवावर्धिनीचे प्रकल्प व्यवस्थापक विद्यागौरी कुलकर्णी, वरिष्ठ प्रकल्प अधिकारी चन्नवीर बंकुर, शिरीष तेरखेडकर तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण प्रसारक मंडळ, कासेगाव संस्थेचे सचिव चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना रेश्मा कदम यांनी केली. माधव देशपांडे यांनी आपल्या मनोगतात खेळाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्म



विश्वास वाढतो. तसेच खेळामुळे मैत्री वृद्धिंगत होते, पराभव स्वीकारण्याची ताकद मिळते आणि जिंकण्याची जिद्द निर्माण होते, असेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना बुद्धिबळ, क्रिकेट साहित्य, कॅरम बोर्ड, व्हॉलीबॉल, टेनिस साहित्य, गोळाफेक संच, बॅडमिंटन आदी विविध क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले.

या साहित्यामुळे मुलींना शाळा व गाव पातळीवर नियमित सराव करण्यासाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपली बौद्धिक क्षमता दाखवून दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी सच्चिदानंद चौगुले यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी प्रकल्प समन्वयक प्रदीप माने, संस्थेचे विश्वस्त अमोल चौगुले, कोळी सर, क्रीडा शिक्षक जाधव, राऊत, संतोष चौगुले, मते, आस्टे, चौगुले उपस्थित होते.

### उद्या ईद मिलन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

राष्ट्रीय एकात्मतेला मजबूत करण्यासाठी व गैर समज दूर करण्यासाठी जमाअते इस्लामी हिंद सोलापूरच्या वतीने आज दि. २८ मार्च रोजी रविवारी सायंकाळी ७ वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे ईद मिलनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. यावेळी संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सय्यद रफिक (पारनेर) व बसव तत्वचिंतक कन्नड वक्ते प्रा डॉ. जे. एस. पाटील हे धर्म आणि सामाजिक सलोखा या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी या कार्यक्रमास सर्व जाती जमातीचे लोक उपस्थित रहावे व शिरखुरमाचा आस्वाद ही घ्यावा असे आवाहन अशोक आगवाने व शफीक काझी यांनी केले आहे.

# स्वच्छतेसाठी महिलांनी घेतला पुढाकार



**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२८ मार्च-**

महिला जेष्ठ नागरिक संघ मंगळवेढा यांच्या वतीने एक दिवस गावासाठी मोहिमेअंतर्गत संत दामाजी पुतळा परिसराची शनिवारी सकाळी ७ ते ८ या वेळेत स्वच्छता करण्यात आली.

श्री संत दामाजी पुतळा चौकात आहे व वाहतूक जास्त असल्यामुळे धुळीचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे संपूर्ण परिसर स्वच्छ करून पाण्याने पुतळा स्वच्छ करून परिसरात रांगोळी काढण्यात आली.

सदर परीसरात वाढदिवसानिमित्त झाडांच्या कुंड्या भेट देऊन सुशोभीकरण करण्यात येत आहे. मंगळवेढे भूमी संतांची असून शहरातील प्रत्येक संतांच्या मंदिर परिसराची स्वच्छता करणे गरजेचे आहे. मंगळवेढ्यात दर शनिवार व रविवार राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये वेगवेगळ्या संघटनांनी सहभाग नोंदवावा व स्वच्छ मंगळवेढा सुंदर मंगळवेढा करण्यासाठी प्रयत्न करावा.यासाठी समस्त मंगळवेढकरांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन देखील यावेळी महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी अध्यक्षा सुनंदा कलुबर्मे, माजी नगसेविका भागीरथी नागणे, जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्षा इंदुमती जाधव, जिजामाता पतसंस्थेच्या चेअरमन आशा नागणे, माजी चेअरमन जसवंती जमदाडे, संचालिका सोमदळे, सुलक्षणी शिंदे, विजया सावंत, नीला दवले, छाया क्षीरसागर, पद्मावती भुसे, सुजाता माने, जयश्री मेटकरी, सुरेखा ढवळे, मंगल जाधव यांनी सहभाग नोंदवला



# माढा येथे दिव्यांगांसाठी शिबीर

## शिबिरात ३७६ दिव्यांगांची नोंदणी, शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी होणार फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २८ मार्च-**

ध्येय प्रतिष्ठान माढा यांच्या वतीने दिव्यांगांसाठी मार्गदर्शन व शासनाच्या योजना लाभ शिबिराचे आयोजन माढ्यातील ग्रामीण रुग्णालय येथे करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली तसेच स्वयंरोजगारासाठी आवश्यक साधनसामग्री घेण्यासाठी मिळणाऱ्या १५ हजारांच्या आर्थिक सहाय्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व फॉर्म भरण्याबाबत प्रत्यक्ष मदतही करण्यात आली. कार्यक्रमासाठी जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, झुंजार भांगे, ध्येय प्रतिष्ठानचे संस्थापक तथा नगरसेवक दिनेश गाडेकर, नगरसेविका संजीवनी भांगे, नगरसेवक राजू गोटे, शहाजी चवरे, सचिन चवरे, औदुंबर चवरे, समर्थ भांगे, बाळासाहेब चव्हाण, अनिकेत चवरे, दर्शन कदम, रणजीत देवकुळे, दत्ता आंबुरे, संतोष पाडुळे उपस्थित होते. शिबिरामध्ये ३७६ दिव्यांग बांधवांची नोंदणी करण्यात आली. या शिबिराचे आयोजन नगरसेवक दिनेश गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ध्येय बहुउद्देशीय समाजसेवी संस्था माढा यांच्यावतीने करण्यात आले.

# आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व ती वृद्धिंगत व्हावी. तसेच वाचनातून मिळालेले अनुभव त्यांना शब्दबद्ध करता यावेत, या हेतूने ज्ञानप्रबोधिनीतर्फे आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा घेण्याचे हे पंधरावे वर्ष आहे. तसेच अध्यापकांकरिताही आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धा आयोजित करण्याचे हे अकरावे वर्ष आहे.

या दोन्ही स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ वंदना कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावर्षी इयत्ता पाचवी ते सातवीच्या गटातून ८६ तर इयत्ता आठवी ते दहावीच्या गटातून १०९ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. १४ शाळांमधून एकूण १९५ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. अध्यापक गटात नऊ शाळांमधून वीस अध्यापकांचा सहभाग होता. यांच्या लेखनाचे एकूण सहा परीक्षकांनी परीक्षण केले. विद्यार्थी व अध्यापकांना प्रशस्तिपत्र व पुस्तक असे पारितोषकाचे स्वरूप होते. यावेळी मुख्याध्यापिका प्रवीणा काळे व पर्यवेक्षिका उज्ज्वला अलकुंटे उपस्थित होते.



**पारितोषिक विद्यार्थ्यांची यादी - २०२५ २६**

**✲ गट - इयत्ता पाचवी ते सातवी**

**प्रथम क्रमांक** - मृणाल महामुरे (सहिने प्रशाला)

द्वितीय क्रमांक विभागून
जोया पटेल (मॉडर्न हायस्कूल)
खुशिकुमारी देवासी (सुरवसे हायस्कूल)

तृतीय क्रमांक विभागून
केदार जाधव (संभाजी शिंदे विद्या मंदिर)
ऐश्वर्या बिंगी (मॉडर्न हायस्कूल, सोलापूर)

उत्तेजनार्थ विभागून -
आरुषी कोळी (दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला)
भक्ती कोळी (मॉडर्न हायस्कूल.

**✲ गट - इयत्ता आठवी ते दहावी**

प्रथम श्रुती माने (वि.मो. मेहता प्रशाला)

द्वितीय क्रमांक विभागून -
मानसी थोरात (एस.व्ही.सी.एस. हायस्कूल)
वैष्णवी देशमुख (सेवासदन हायस्कूल)

तृतीय क्रमांक विभागून -
अक्षया बिंगी (मॉडर्न हायस्कूल, सोलापूर)
जान्हवी पाटील (वि.मो. मेहता प्रशाला, सोलापूर)

**✲ उत्तेजनार्थ विभागून -**
आर्या करंटे (वि.मो. मेहता प्रशाला)
राधिका बंडगर (दयानंद काशिनाथ आसावा हायस्कूल)

**✲ गट-अध्यापक पारितोषिक -५-**

तृतीय क्रमांक विभागून -
अक्षया बिंगी (मॉडर्न हायस्कूल)
जान्हवी पाटील (वि.मो. मेहता प्रशाला)

**✲ उत्तेजनार्थ विभागून -**
आर्या करंटे (वि.मो. मेहता प्रशाला, सोलापूर)
राधिका बंडगर (दयानंद काशिनाथ आसावा हायस्कूल)

**✲ गट-अध्यापक पारितोषिक -५-**

प्रथम - अपर्णा रास्ते (सुरवसे हायस्कूल)
द्वितीय - अंकिता माळगे (सहिने प्रशाला)
तृतीय - सारिका पंडित (छत्रपती शिवाजी हायस्कूल)

**उत्तेजनार्थ** - स्मिता कोर्टीकर (सेवासदन प्रशाला)

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सांगोल्यात श्रीराम नवमी निमित्त शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २८ मार्च-**

श्रीराम प्रतिष्ठान व सकल हिंदू समाज बांधव सांगोला तालुका यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमी निमित्त शोभायात्रेचे आयोजन केले होते.

सदर शोभा यात्रेमध्ये प्रभू श्रीरामांची भव्य मूर्ती, छत्रपती संभाजी महाराज व बजरंगबली यांची भव्य अशी १२ फूट मूर्ती यांचे खास आकर्षण होते. तसेच इचलकरंजीचे भव्य लाईट शो आणि साउंड शो याच्याकडे नागरिकांचे लक्ष वेधले होते. याप्रसंगी जय श्रीराम या घोषणेने वातावरण भक्तीमय झाले होते. सर्व श्रीराम भक्तांनी ही मिरवणुक पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.





## महत्त्वाचे

### मयत मुलाच्या बंद सिमकार्डचा वापर; शेतकऱ्याची अडीच लाखांची फसवणूक

**बार्शी, दि. २८ मार्च-**

कळंबवाडी (आ) येथील एका वृद्ध शेतकऱ्याच्या मयत मुलाचे बंद पडलेले सिमकार्ड वापरून, बँक खात्यातून तब्बल २,५०,००० रुपये परस्पर काढून घेतल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी समाधान काशीनाथ भिल्ल नावाच्या व्यक्तीविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी परमेश्वर नामदेव रणदिवे (वय ६५, रा. कळंबवाडी) हे शेती करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे आगळगाव येथील आय.डी.बी.आय. बँकेत २०१७ पासून खाते आहे. खाते उघडताना त्यांच्याकडे स्वतःचा मोबाईल नसल्याने, त्यांनी त्यांचा मुलगा सौरभ याचा ९०२२०९८०८६ हा क्रमांक बँकेत नोंदवला होता. दुर्दैवाने, सौरभचे ४ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले, त्यानंतर तो मोबाईल क्रमांक कोणाकडूनही वापरला जात नव्हता. ६ ऑगस्ट २०२५ रोजी फिर्यादी रणदिवे हे घरगुती कामासाठी पैसे काढण्याकरिता बँकेत गेले होते. त्यावेळी बँक अधिकाऱ्यांनी त्यांच्या खात्यात पैसे नसल्याचे सांगितले. खात्याचे स्टेटमेंट तपासले असता, धक्कादायक माहिती समोर आली की, मुलाचा जो मोबाईल नंबर बंद होता, तो टेलिकॉम कंपनीने नियमानुसार दुसऱ्या व्यक्तीला म्हणजेच समाधान काशीनाथ भिल्ल याला दिला होता. संशयित आरोपी समाधान भिल्ल याने या नंबरचा ताबा मिळाल्यावर, तो क्रमांक बँक खात्याशी लिंक असल्याचे ओळखून त्यावर फोन पे आणि गुगल पे सारखी ॲप्स सक्रिय केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रणदिवे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला होता. पोलीस चौकशीत समाधान काशीनाथ भिल्ल यानेच ही रक्कम काढल्याची खात्री पटल्यानंतर, २७ मार्च २०२६ रोजी त्याच्याविरुद्ध रीतसर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



### आवाटी येथे उद्या उर्स कलंदर कार्यक्रम

**करमाळा, दि. २८ मार्च-**

करमाळा तालुक्यातील आवाटी येथील हजरत चांद पाशा वली बाबा यांच्या दर्गाह मध्ये येत्या ३० मार्च (उर्दू १० तारीख शवाल १४४७) हिजरी सोमवारी पानीपत येथील हजरत बु अलीशाह कलंदर रह. यांच्या स्मरणार्थ उर्स कलंदर कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती दर्गाह कमिटीचे अध्यक्ष हाजी कादर भाई तांबोळी तसेच बाबाचे खादिम गुलाम नबी कादरी तसेच इरफान कादरी यांनी बोलताना दिली. आवाटी येथील वली बाबा दर्गाह या ठिकाणी ऊर्स मुबारक निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे यामध्ये बु अलीशाह कलंदर यांची गिलाफ चादर दर्शनासाठी सकाळी नऊ वाजल्यापासून ते संध्याकाळी नऊ वाजेपर्यंत राहणार आहे याशिवाय संध्याकाळी ईशा नमाज नंतर महफिले समाचा कार्यक्रम होणार असल्याचे दर्गाह ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले आहे सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने दर्गाहवर विविध रंगाची रोषणाई करण्यात आली असून आलेल्या भक्त गणांना पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे दर्गाह वर आलेल्या भक्तगणांना महाप्रसाद लंगर खाना वाटपाचे कार्यक्रम ट्रस्टच्या वतीने करण्यात येणार आहे याशिवाय या दर्गाहावर वर्षभरातून तीन धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. सदर धार्मिक कार्यक्रमाचा लाभ भक्तगणांनी घ्यावा असे आवाहन दर्गाह ट्रस्टच्या वतीने सुफी हसनैन कादरी (सज्जादा नशिन) तसेच आवाटी ग्रामस्थाच्या वतीने करण्यात आले आहे

### सिव्हिल चौक येथून दुचाकी चोरीला

**सोलापूर, दि. २८ मार्च-**

निळ्या रंगाची होंडा कंपनीची ॲक्टिवा दि. ७ मार्च रोजी शशिकुमार कृष्णाजी सोनकांबळे, वय ६३, रा. घर नंबर २८७ उत्तर सदर बाजार, सोलापूर, यांची ३० हजार रुपयांची मोटरसायकल क्रमांक एम एच १३ सी डब्ल्यू ३५३३ ही सिविल चौक येथे ठेवली असता अज्ञात चोरट्याने मोटरसायकलचे हँडल लॉक तोडून चोरून नेली आहे. याबाबत दि. २७ मार्च रोजी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास गायकवाड करत आहेत.

## बालकाच्या हातावर चुकीची शस्त्रक्रिया डॉक्टरांचा निष्काळजीपणा

### पंढरपूर उपजिल्हा रूग्णालयातील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये एका बालकाच्या हातावर चुकीची शस्त्रक्रिया करण्यात आली. यामुळे पालकातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.



येथील सुनील दंडाडे यांच्या मुलाच्या उजव्या हातावरील खराब झालेल्या करंगळीची शस्त्रक्रिया करण्यासाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आले होते. मात्र डॉ. काणे यांनी उजव्या हातावी करंगळी काढण्या ऐवजी संबंधित मुलाच्या डाव्या हाताची करंगळी काढली. डॉ. काणे यांनी निष्काळजीपणा करून चुकीची शत्रक्रिया केली. या घटनेची गंभीर दखल वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली असून डॉ.काणे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांकडून उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे करण्यात आली आहे. दरम्यान चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर हा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येणार असून त्यानंतर डॉ.काणे यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. अगोदरच उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना सोयी सुविधा मिळत नराल्यामुळे रुग्णातून संताप व्यक्त होत असतानाच आता चुकीच्या शस्त्रक्रिया होऊ लागल्यामुळे गोरगरीब रुग्णांमध्ये भीती पसरली आहे.

### या प्रकरणी चौकशी समिती गठीत

या प्रकरणाची दखल उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. विजयकुमार सरडे यांनी घेतली असून शस्त्रक्रिया प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन डॉक्टरांची समिती गठीत करण्यात आली आहे.

संबंधित सहा वर्षाच्या लहान मुलाच्या उजव्या आणि डाव्या अशी दोन्ही हाताला सहा बोटे आहेत. दोन्ही हातावर शस्त्रक्रिया करावयाची होती. मात्र दोन्ही हातावर ती एकदम न करता थोड्या दिवसाच्या अंतराने करावयाची होती. सुरुवातील डाव्या हाताची करंगळी काढली आणि त्या नंतर संबंधित मुलाच्या उजव्या हाताची करंगळी काढण्यात येणार आहे. यामध्ये कोणतीही चुकीची गोष्ट झालेली नाही. संबंधित मुलाच्या वडिलांनी देखील आम्हाला लेखी पत्र देवून या संदर्भात आपली कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले आहे.

**- डॉ.वर्षा काणे**
**(शस्त्रक्रिया करणारे वैद्यकीय अधिकारी )**

## सोलापूर जिल्हा परिषदेचा मुंबईत डंका

### ● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सीईओ कुलदीप जंगम यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरलेली घटना म्हणजे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कुलदीप जंगम यांचा मुंबईत आयोजित कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रशासकीय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला आहे. याकार्यक्रमाला राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी, प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्याच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला.



मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण विकास, स्वच्छता अभियान, पाणीपुरवठा, शिक्षण आणि विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक उपक्रम राबवून ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न झाला आहे. दरम्यान, विशेषतः स्वच्छता अभियान आणि गावपातळीवरील विकास योजनांमध्ये त्यांनी घेतलेली पुढाकार भूमिका लक्षणीय ठरली आहे. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यशैलीमुळे विविध योजना वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यात यश आले आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची राज्यस्तरावर दखल घेतली गेल्याने हा सन्मान जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरला आहे. या पुरस्कारामुळे केवळ जंगम यांचाच नव्हे, तर संपूर्ण जिल्हा प्रशासनाचा गौरव झाला आहे. याकार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी जंगम यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या नेतृत्वगुणांची प्रशंसा केली. सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने केलेले काम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### जिल्हा प्रशासनात उत्साह

या सन्मानामुळे सोलापूर जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. भविष्यात जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. कुलदीप जंगम यांच्या कार्याचा सन्मान म्हणजे सोलापूर जिल्ह्याच्या विकासाची पोचपावती असून, यामुळे आगामी काळात जिल्ह्याच्या प्रगतीला अधिक वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चैत्री वारीसाठी १ हजार पोलिसांचा फौजफाटा

**यंत्रणा सज्ज : बॉम्बशोधक पथकासह, दंगा नियंत्रण पथकाचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २८ मार्च-**

चैत्र शुद्ध एकादशी २९ मार्च रोजी असून, या चैत्री यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात येतात. वारीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षितपणे पार पडण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

यासाठी १ हजार ३७१ पोलिसांचा फौजफाटा तैनात केला आहे. यामध्ये पाच बॉम्ब शोधक, नाशक पथके, दंगा नियंत्रण पथकासह आवश्यक बंदोबस्त तैनात ठेवला आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी दिली.

चैत्री वारीत पोलिस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतूक नियंत्रणासाठी १ हजार ३७१ पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये दोन उपविभागीय पोलिस अधिकारी, १२ पोलिस निरीक्षक, ६२ सहायक पोलिस निरीक्षक, ५५५ पोलिस कर्मचारी, ११० वाहतूक पोलिस, ६०० होमगार्ड, १ आरसीबी पथक, ५ बॉम्बशोधक पथके, १ क्यूआरटी पथकाचा समावेश आहे. तसेच वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये, भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी ११० पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

वारीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सहा ठिकाणी वॉच टॉवर व १२० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्याचबरोबर खासगी वाहनांना थांबण्यासाठी विविध ठिकाणी वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली असल्याचेही वाघमोडे यांनी सांगितले.

## आज 'फाउंडेशन कोर्स' सेमिनार

### स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना योग्य दिशा, नियोजन आणि दर्जेदार मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने सोलापूरातील वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स सोलापूर येथे 'फाउंडेशन कोर्स' संदर्भात आज विशेष सेमिनारचे आयोजन रविवार, २९ मार्च रोजी सकाळी १० वाजता वालचंद सभागृहात हा सेमिनार होणार आहे. दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी www.wcassolapur.org या संकेतस्थळावर निःशुल्क ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध आहे.



सेमिनारसाठी नोंदणी व अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थी व पालकांनी पीसिएम (जेईई) गटासाठी ९६८९६९४३९३ व ८७०५१७२४, तसेच PCB (नीट) गटासाठी ८६०५३९४९५९ व ७५६७६१९३ या क्रमांकांवर संपर्क साधावा, तसेच समन्वयासाठी ९४०३८८३३४४ या क्रमांकावरही संपर्क साधावा.

## सोलापूर जिल्ह्यात २०० शिक्षक अतिरिक्त; कमी पटसंख्येचा परिणाम

### ▸▸ एप्रिलमध्ये समायोजन प्रक्रिया; ३१ मेपूर्वी १५०० शिक्षकांच्या बदल्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षक व्यवस्थापनात मोठे बदल घडणार असून, पटसंख्येअभावी सुमारे २०० शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासन निर्णयानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ही स्थिती स्पष्ट झाली आहे.

जिल्ह्यातील एकूण २,७७५ जिल्हा परिषद शाळांमध्ये सध्या सुमारे १.८४ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. या अतिरिक्त शिक्षकांचे एप्रिल महिन्यात तालुकास्तरावर समायोजन करण्यात येणार आहे.

समायोजन प्रक्रियेपूर्वी अतिरिक्त शिक्षकांची यादी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने ही प्रक्रिया राबवली जाईल. प्रथम तालुकास्तरावर समायोजन होईल, त्यानंतर उर्वरित शिक्षकांचे जिल्हास्तरावर व पुढे विभागीय स्तरावर समायोजन करण्यात येईल.या प्रक्रियेनंतर जिल्हाअंतर्गत बदलीपात्र शिक्षकांच्या बदल्या केल्या जाणार आहेत. सुमारे १५०० शिक्षक बदलीस पात्र ठरले असून, त्यांच्या बदल्या ३१ मेपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शेवटच्या टप्प्यात आंतरजिल्हा बदल्या होणार असून, त्यानंतर रिक्त पदे भरली जाणार आहेत.

अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठीची प्रस्तावित फाइल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे. त्यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर एप्रिलमध्ये प्रत्यक्ष समायोजन प्रक्रिया सुरू होईल. या संपूर्ण प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील शिक्षकांचे संतुलित वितरण होऊन शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**- कादर शेख,**
प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद

| शैक्षणिक स्थिती | |
|---|---|
| एकूण शाळा | २,७७५ |
| एकूण विद्यार्थी | १.८४ लाख |
| अतिरिक्त शिक्षक | २०० |
| बदलीपात्र शिक्षक | १,५०० |

दरम्यान, पूर्वीप्रमाणे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर बदल्या न करता, यंदा नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच ही प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे येणार नाहीत आणि गुणवत्तेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाल्यानंतरही जिल्हा परिषद शाळांमध्ये सुमारे २५० शिक्षक पदे रिक्त राहणार आहेत.

त्यापैकी ८० टक्के पदांची भरती 'पवित्र पोर्टल'द्वारे १५ जूनपूर्वी करण्यात येणार आहे. या भरतीमधून सोलापूर जिल्हा परिषदेला सुमारे १७५ नवीन शिक्षक मिळण्याची शक्यता आहे.गतवर्षीच्या तुलनेत यंदा जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या साडेतीन ते चार हजारांनी वाढली असली तरी संचमान्यतेनुसार काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत.

## 'सामाजिक एकोप्यानेच समाजाची प्रगती'

### ▸▸ छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने ईद मिलन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मार्च-**

सर्वधर्मीय प्रमुखांसह हा कार्यक्रम म्हणजे एकतेचे प्रतिक असून नाउमेद नसलेल्या शेतकऱ्यांच सन्मान, धार्मिक प्रबोधन या सारख्या कार्यक्रमाची आवश्यकता असून याच सामाजिक एकोप्यानेच समाजाची प्रगती होते. तसेच आजच्या युवकांना स्वयंरोजगारासोबत प्रबोधनाची सुध्दा आवश्यकता आहे, असे मत पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी व्यक्त केले.



मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूर आयोजित ईद मिलन आणि शेतकरी सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार हे होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शहर काझी सय्यद अमजदअली काझी, शिवधर्म समन्वयक नेताजी गोरे, गुरूद्वार प्रमुख रमेश सिंघ वतवाणी, सिध्देश्वर देवस्थान मुख्य पुजारी राजशेखर हिरेहब्बू, फर्स्ट चर्चचे फादर रेव्ह. सुपर्ण कुमार घाटे, भारतीय बौद्ध महासभेचे अण्णासाहेब वाघमारे या धर्मगुरुंची उपस्थिती होती.

कार्यक्रमास माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी महापौर अरिफ शेख, राजन जाधव, के. बी. नदाफ, शिवसेना गटनेते अमोल शिंदे, नगरसेवक प्रथमेश कोठे, बिज्जू प्रधाने, तौफिक शेख, नईम सालार, बाबा अड्डेवाले, युवराज पवार, शिवाजी वाघमोडे, रियाज हुंडेकरी, माजी प्राचार्य महेबूब दलाल, मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष डॉ. जी. के. देशमुख, रियाज खैरदी, ॲड. रियाज शेख, महेश धाराशिवकर, विजय पुकाळे, मझहर पठाण, राजा बागवान, मुजीब खलिफा, समीऊल्ला शेख, सैफोद्दिन मनियार, फैज बागवान, एजाज आदिल, बाळासाहेब वाघमारे, प्रशांत पाटील, नगरसेविका वाहेदा भंडाले, अकिला भागानगरी, जयवंत सलगर, पोपट भोसले, श्रीकांत डांगे, प्रकाश शिंदे म.शफीक कॅप्टन, इम्तियाज कमिशनर, अलिम सय्यद, गदवाल सर, समीर सय्यद, अल्ताफ लिंबूवाले, जिल्हाप्रमुख अमर पाटील, प्रताप ढेंगळे, मसरोद्दीन चौधरी, संजय जाधव, रमेश जाधव, सौरभ भांड, मोहन चटके, ॲड. अनुराग गोरे उपस्थित होते. सूत्रसंचालन राम गायकवाड यांनी तर आभार आयोजक मतीन बागवान यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यात जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, बशीर सय्यद, तन्वीर गुलजार ,जावेद बद्दी, राजू हुंडेकरी, हारुण शेख, कादर भागानगरी, रिजवान शेख, शब्बीर फुलमामडी, रिजवान दंडोती, रियाज पैलवान, वाहिद शेख, बशीर मडकी, रुस्तुम शेख, वाहिद तांबोळी, शेरु उस्ताद, कय्युम मोहळकर, मोहसीन शेख, हारिस शेख, ॲड. वसीम शेख, उजेर बागवान, सादिक मुजावर यांनी परिश्रम घेतले.

**या शेतकऱ्यांचा झाला सन्मान**

मराठा सेवा संघाचे प्रदेश महासचिव इंजि. चंद्रशेखर शिखरे यांच्या हस्ते या शेतकरी बांधव श्री.भागवत वाघ (टरबूज), वैभव मोरे (डाळिंब), प्रशांत म्हमाणे (द्राक्षे), बालाजी गायकवाड (कलिंगड), बालाजी कोकाटे (पेरू), सुधाकर गरड (ड्रॅगन), सचिन लवंडे (अंजीर), ज्ञानेश्वर सावंत (सीताफळ) यांचा सत्कार करण्यात आला.